भारत-भ्रमण

२

श्रीपाद जोशी



चेतक पुस्तक

भारत भ्रमण

भाग दुसरा

पूर्व भारत : २

लेखक
श्रीपाद जोशी

किंमत अडीच रुपये

चेतक पुस्तकें
गिरगाव, मुंबई २

पहिली
आवृत्ति
२२
मे
१९६९

मुद्रक
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाव वाडी
मुंबई ४

प्रकाशक
बा. ग. ढवळे
चेतक पुस्तकें
गिरगाव
मुंबई २

एकमेव विक्रेते
साहित्य सहकार संघ लि.
नायगांव क्रॉस रोड
दादर, मुंबई १४

मित्रवर्य
श्रीयुत
विनायकराव
आठल्ये
आणि
सौभाग्यवती
शकुंतलाताई
आठल्ये
ह्यांना
स्नेहपूर्वक ....

भ्रमणाची संधि

सन १९४९ पासून १९६० पर्यंत सतत बारा वर्षें दरसाल सर्वोदय संमेलनाच्या निमित्तानें भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशांत भ्रमण करण्याची संधि मला मिळाली. तत्पूर्वीही सन १९३८ पासून ह्या-ना-त्या कारणानें मी भारतांत भटकलों. अशा प्रकारें गेल्या दोन-अडीच तपांतील भारत-भ्रमणाचा हा अहवाल वाचकांसमोर ठेवतांना मला आनंद होत आहे. ह्यांतील बहुतेक लेख त्या-त्या वेळीं वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. कांहीं लेख 'माझा देश माझे लोक' ह्या पुस्तकाच्या दोन खंडांत प्रसिद्ध झाले होते. आतां या सर्व लेखांचें नीट वर्गीकरण करून नेटक्या स्वरूपांत वाचकांसमोर ठेवण्याचें स्वप्न साकार होत आहे.

माझीं प्रवास-वर्णनें मुख्यतः माहिती देण्याच्या हेतूनें लिहिलेलीं असतात. आजकालचीं प्रवास-वर्णनें ही लघुनिबंधाच्या स्वरूपाचीं असतात. त्यामुळें कांहीं टीकाकार माझ्या प्रवास-वर्णनांना नाकें मुरडतात. परंतु सर्वसामान्य वाचकांनीं माझ्या प्रवासलेखांचें नेहमींच स्वागत केलें आहे. त्यांच्या ह्या आत्मीयतेमुळेंच मी हे लेख पुस्तकरूपानें प्रकाशित करण्यास तयार झालों.

ह्यांतील कांहीं लेखांत तत्कालीन व्यक्तींचे व घटनांचे उल्लेख आलेले आहेत. त्यामुळें ते कालबाह्य वाटण्याची शक्यता आहे. परंतु त्या संदर्भांत जी माहिती देण्यांत आली आहे व जी चर्चा करण्यांत आली आहे, तिचें ऐतिहासिक महत्त्व लक्षांत घेऊन ते लेख तसेच ठेवले आहेत.

कांहीं स्थळांना मीं एकाहून अधिक वेळां भेटी दिल्या आणि त्या-त्या वेळीं यांच्यासंबंधीं लिहिलें. ह्यामुळें एकाच स्थानासंबंधीं अधिक लेखही ह्या संग्रहांतून

आढळतील. त्यांत क्वचित् कोठें पुनरुक्ति झाली असली, तरी प्रत्येक लेखाची भूमिका व त्यांतील माहिती ह्यांत खूपच फरक आहे. म्हणून ते तसेच राहूं दिले आहेत.

भारताच्या भावनात्मक ऐक्याला हातभार लावावा हाही हे लेख लिहिण्यांतील एक हेतु. सारा भारत एक असल्याचें आपण बोलतों खरें, परंतु ह्या भारतांतील विभिन्न प्रदेश व तेथील रहिवासी ह्यांच्याविषयीं आपल्याला किती थोडी माहिती असते! ही माहिती नसेल, तर आपण आपल्या देशबांधवांवर प्रेम तरी कसें करणार? तेव्हां अशी माहिती आपल्या वाचकांना मिळवून द्यावी, ह्या हेतूनें मीं देशभर हिंडतांना जें निरीक्षण केलें, त्याचें चित्र ह्या लेखांतून पाहायला मिळेल. क्वचित् एखाद्या ठिकाणीं स्थानिक लोकांचे दोषही मीं दाखविले आहेत; परंतु ते तिरस्काराच्या, हेटाळणीच्या भावनेनें नसून वाचकांसमोर सत्यचित्र मांडलें जावें, एवढ्याच हेतूनें. त्यावरून कोणी गैरसमज करून घेणार नाहीं, अशी आशा आहे.

साऱ्या भारतांतील महत्त्वाचीं स्थळें व लोकांच्या रीतीभाती ह्यांसंबंधींची ही माहिती संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडावी. ह्या मालेच्या वाचनानें भारताची व भारतीय लोकसमूहांची थोडीबहुत ओळख वाचकांना होऊं शकली, तर माझें उद्दिष्ट साध्य झालें, असें मी समजेन.

श्रीपाद जोशी

'श्रीरघुवंश', पुणें ४
स्वातंत्र्यदिन, १५ ऑगस्ट, १९६५

अनुक्रमणिका

जय-राजेंद्रांच्या कर्मभूमींत

भगवान् बुद्ध-महावीरांची तपोभूमि

भारताच्या इतिहासांत व भूगोलांत बिहारचा जो उल्लेख येतो, तो वाचून लहानपणीं ह्या प्रदेशाबद्दल मनामध्यें एक प्रकारचें कुतूहल व आदराची भावना निर्माण झाली होती. भगवान् गौतम बुद्धांना ह्याच प्रदेशांत बोधिगयेला ज्ञानप्राप्ति झाली आणि बौद्ध धर्मानुयायांच्या मठविहारांमुळेंच ह्या प्रांताला बिहार असें अभिधान प्राप्त झालें. जैनांचे चोविसावे तीर्थंकर भगवान् महावीर ह्यांचीही कर्मभूमि व निर्वाणभूमि (पावापुरी) येथेंच आहे. ह्यामुळें जरी कोठल्याही विशिष्ट धर्माबद्दल मनांत विशेष प्रीति अथवा अप्रीति नसली, तरी या दोन धर्मसंस्थापकांनीं भारतीय समाजाच्या सुधारणेसाठीं व उन्नतीसाठीं जे परिश्रम घेतले, त्यांची छाप मनावर कायमच राहिली आहे. अशा ह्या महापुरुषांची तपोभूमि इतक्या स्वस्थपणें पाहतां येईल, अशी कल्पना कधीं मनांत आली नव्हती. ह्यामुळें जेव्हां अशी संधि मिळाली, तेव्हां डोळे, कान व हृदय खुलें ठेवून ह्या भूमीचें मीं दर्शन घेतलें. वस्तुतः मीं फक्त दक्षिण बिहारचाच कांहीं भाग पाहिला आणि तोही फार थोड्या अवधीमध्यें. ह्यामुळें ह्या प्रांतासंबंधीं कांहीं लिहिणें धाष्टर्यचेंच समजलें जाईल. परंतु ह्या ओझरत्या दर्शनांत मला बिहारच्या सद्यःस्थितीची जी माहिती मिळाली, ती नमूद करून ठेवावी म्हणूनच हा लेख लिहिला आहे.

जय-राजेन्द्रांची कर्मभूमि

मी मुख्यतः विधायक कार्यकर्त्यांच्या सहवासांतच राहिलों. हे विधायक कार्यकर्ते राजकारणाशीं संबंध असणारे व एके काळीं राजकारणांत भाग घेतलेले असेच आहेत. ह्यामुळें बिहारच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीविषयीं त्यांच्याकडून

मिळालेली माहिती पुष्कळच जबाबदारीची व वस्तुस्थितीची निदर्शक अशी समजण्यास हरकत नाहीं. बिहारमध्यें हिंडल्यानंतर एक गोष्ट चटकन् लक्ष्यांत येते, कीं ह्या प्रान्तावर भारताचे पहिले राष्ट्रपति राजेन्द्रप्रसाद आणि सर्वोदयी नेते बाबू जयप्रकाश नारायण या दोघांचीही विलक्षण छाप पडलेली आहे. आज हे दोन महापुरुष वेग-वेगळ्या राजकीय गोटांत असले, तरी दोघांबद्दलही सामान्य जनतेला सारखीच आपुलकी व आदर वाटतो. राजेन्द्रबाबू व जयप्रकाश हे एकाच कायस्थ जातीचे आहेत इतकेंच नव्हे, तर एक-मेकांचे नातेवाईकही आहेत. ही गोष्ट जेव्हां मला कळली, तेव्हां ह्या योगायोगाची मला मोठी गंमत वाटली. बुद्ध-महावीरांच्या ह्या भूमींतील लोकांवर धर्माचा व आध्यात्मिकतेचा पगडा असणें स्वाभाविकच आहे. ह्यामुळें राजेंद्रबाबूंची धार्मिक व आध्यात्मिक प्रवृत्ति पाहून आश्चर्य वाटत नव्हतें. परंतु एके काळीं मार्क्सवाद व भौतिकवाद यांचे कट्टे पुरस्कर्ते व अनुयायी असलेले जयप्रकाश जेव्हां आध्यात्मिकतेच्या गोष्टी बोलूं लागले, तेव्हां अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. बिहारची परंपरागत पार्श्वभूमि माहित असणाऱ्यांना मात्र ह्याचें आश्चर्य वाटणार नाहीं. कारण येथील व्यक्तींचा पिंडच धर्म व अध्यात्म ह्यांच्या खुराकावर पोसला व वाढला जातो. ह्यामुळें सर्वसामान्य बिहारी माणूस अखेर धर्म व अध्यात्म यांचीच कास धरतो.

शेंडी व जानवें

परंतु त्याचें हें धर्मप्रेम कधीं-कधीं आत्यंतिक टोंकाला जाऊन पोहोंचतें. राजेंद्रबाबूंचा हिंदु कोड बिलाला असलेला विरोध सर्वश्रुतच आहे. परंतु त्यापेक्षांही आश्चर्याची गोष्ट म्हणजे शेंडी व जानवें यांबद्दल बिहारी लोकांत असलेली आसक्ति होय. बिहारमध्यें व उत्तर प्रदेशांत सामान्य लोकच नव्हे, तर सोशालिस्ट व कम्युनिस्ट लोकही शेंडी ठेवितात व जानवें घालतात! मग बिचारे काँग्रेसवादी व विधायक कार्यकर्ते यांची काय कथा! आधुनिक पद्धतीनें केंस ठेवून भांग पाडणारे तरुणही लहानशी स्वतंत्र शेंडी ठेवितातच. येथील लोक जानवें नुसतें घालूनच थांबत नाहींत, तर त्याचा कानावर अडकविण्यासाठीं उपयोगही करितात. जानवें घालणारे लोक

ब्राह्मणच असतात असें नव्हे, तर भूमिहार, रजपूत, कायस्थ, वगैरे जातींचे लोकही आपण ब्राह्मणांपेक्षां कांहीं कमी नाहीं हें दाखविण्यासाठीं जानवें वापरतात. महाराष्ट्रांतील हिंदुधर्माभिमानी तरुणही शेंडी-जानव्याची फारशी पर्वा करीत नाहींत असें जेव्हां मीं येथील मित्रांना सांगितलें, तेव्हां त्यांना आश्चर्य वाटलें. शेंडीशिवाय संस्कृतिसंरक्षण होऊं शकतें ह्यावर बहुधा तिकडील कम्युनिस्टांचाही विश्वास नसावा !

सामान्य रंगरूप

सर्वसामान्य बिहारी लोकांचा रंग काळा असून रूप सामान्य प्रतीचें असतें. उत्तर प्रदेशांतील लोक त्या मानानें अधिक रूपवान् आणि गोरे असतात. राजेंद्रबाबूंचें रंगरूप हें बिहारचें प्रातिनिधिक रंगरूप समजण्यास हरकत नाहीं. पुरुषांच्या मानानें स्त्रियांमध्यें सौंदर्याचा अभाव विशेष जाणवतो. अर्थात् पडद्याची पद्धति असल्यामुळें तेथें स्त्रियांचें दर्शन होणेंच दुर्लभ असतें. आपल्याकडील खानदेशी माणसाशीं इकडील लोकांचें रूप व स्वभाव या बाबतींत खूपच साम्य आहे.

बिहारी लोकांसंबंधीं विचार करूं लागलों कीं मला त्यांच्या प्रेमळपणाची व गबाळेपणाची प्रथम आठवण होते. जितके आतिथ्यशील तितकेच आळशी, जितके सहृदय तितकेच सुस्त. ‘ यह काम अभी तुरत हो जाता है ’ असें एखाद्या बिहारी माणसानें सांगितलें, कीं खात्रीनें दोन तास लागणार असें समजावें. ह्यामुळें कोणीं ‘तुरत’ (ताबडतोब) शब्द वापला, कीं छातींत धडकीच भरे. येथील लोकांच्या मनांत एक प्रकारची न्यूनमनोगंडाची वृत्ति आहे आणि हा न्यूनमनोगंड लपविण्यासाठीं आपण फार मोठे आहोंत असें दाखविण्याची धडपड ते एकसारखी करीत असतात; त्यामुळें उलट त्यांच्यांतील न्यूनमनोगंडच ज्यास्त उठून दिसतो. आजपर्यंत येथें दोनच वर्ग होते. वरचा आणि खालचा. श्रीमंत व जमीनदार एका बाजूस, आणि गरीब शेतमजूर दुसऱ्या बाजूस. मध्यम वर्गाचें अस्तित्व जवळ-जवळ नव्हतेंच. गेल्या कांहीं वर्षांत हा मध्यम वर्ग उदयास येऊं लागला आहे आणि त्याच्यामुळेंच या लोकांमध्यें अस्मिता निर्माण झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

'चमचा' संस्कृतीचा गंध नाहीं

बिहारी लोकांच्या गबाळेपणाचें एक ठळक उदाहरण द्यावयाचें तर असें सांगतां येईल, कीं तेथें चमचा नांवाची वस्तु पाहावयास सांपडत नाहीं. भात, भाजी, वगैरे जेवणाचे पदार्थ वाढतांना भसकन् हात घालून ते वाढूं लागले, कीं माझ्यासारख्याला संवय नसल्यामुळें मळमळूं लागे. येथें दगडासारखें घट्ट व पांढरें शुभ्र दहीं बाजारांत विकत मिळतें. (घरीं विरजण लावण्याची प्रथा जवळ-जवळ नाहींच.) परंतु आमचा आचारी जेव्हां भांड्यांत हात घालून बोटांनीं दहीं वाढी, तेव्हां तें दहीं खाण्याची इच्छाच मनांतून नाहींशी होई. परंतु हें तर कांहींच नव्हे. खेड्यांमध्यें पातळ केलेलें तूपही हाताच्या पंज्याचा चमच्यासारखा उपयोग करून वाढण्यांत येतें असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हां त्या कल्पनेनें मला कसेंसेंच वाटलें. अर्थात् ही गोष्ट कमी-अधिक प्रमाणांत सर्वच प्रांतांतील ग्रामीण विभागांना लागू आहे असें म्हणतां येईल. चमच्याचा वापर हा मुख्यतः इंग्रजांच्या आगमनानंतरच सुरू झालेला आहे. बिहारमध्यें भात हेंच मुख्य अन्न आहे; परंतु तेथें खडे नसलेला भात कधींच खावयास मिळणार नाहीं. कधीं-कधीं तर असें वाटे, कीं कोंवळ्या कोंवळ्या दगडांचाच भात केलेला असून त्यांत चुकून अधून-मधून शितें आलेलीं आहेत. येथें मोठीं भांडींही मिळणार नाहींत. दहा-वीस लोकांचा भात करावयाचा असल्यास एका लहानशा भांड्यांत चार-पांच वेळां भात करितील. पहिला भात उकरून फडक्यावर पसरून ठेवितील आणि त्यावर नंतर तयार झालेला भात ओततील. भात हा पदार्थ गरम स्थितींत खावयाचा असतो हें तत्त्व जणूं यांना मान्य नसावें असें वाटतें.

एकीकडून बंगाल, दुसरीकडून उत्तर प्रदेश

बिहारी लोक आपल्या मागासलेपणाचें खापर मुख्यतः बंगाली व त्यांच्या खालोखाल उत्तर-प्रदेशीय लोकांच्या आक्रमक वृत्तीवर फोडितात. कांहीं वर्षांपूर्वी बंगाल, बिहार व ओरिसा हे प्रांत एकत्रच होते. त्या वेळीं बंगाली लोक सर्वांत अधिक सुशिक्षित व इंग्रजाळलेले असल्यामुळें या तिन्ही प्रांतांवर त्यांचेंच वर्चस्व प्रस्थापित झालें. त्यांतून त्यांच्या ठिकाणीं एक अहंकार उत्पन्न झाला आणि त्यामुळें बंगालेतर

प्रांतांना त्यांच्याबद्दल हेवा, ईर्ष्या व द्वेष वाटूं लागला. त्याचे अवशेष आजही या तिन्ही प्रांतांत सांपडतात. वस्तुतः कोणत्याही विशिष्ट प्रांताचा माणूस मंदबुद्धीचा अथवा तैलबुद्धीचा आहे असा शिक्का ,मारणें अशास्त्रीय ठरेल. साऱ्या भारतवर्षाचें नेतृत्व करूं शकतील असे डॉक्टर राजेन्द्रप्रसाद व जयप्रकाशजी ज्या लोकांतून निर्माण होतात, ते निर्बुद्ध आहेत असें म्हणणेंच निर्बुद्धपणाचें ठरेल; परंतु बुद्धीचा वापर करण्याच्या बाबतींत आळस केल्यामुळें त्यांच्यावर असा आरोप केला जातो. बिहारमध्यें अगदीं परवां-परवांपर्यंत मोठ-मोठ्या हुद्द्यांच्या जागांवर व शिक्षणक्षेत्रांत बंगाली लोकांचेंच प्राबल्य होतें आणि व्यापारामध्यें व साहित्यिक क्षेत्रांत उत्तरप्रदेशीयांची गर्दी होती. एवढ्या मोठ्या प्रांतामध्यें विद्यापतीनंतर एकही भारतीय कीर्तीचा हिंदी साहित्यिक निर्माण होऊं नये हें आश्चर्यच नव्हे काय? हल्लींदेखील श्रीरामवृक्ष बेनीपुरी, श्री. दिनकर, श्री. नागार्जुन, आचार्य शिवपूजन सहाय, श्री. गोपालसिंह नेपाली, श्री. आरसी-प्रसाद सिंह, वगैरे अगदीं बोटांवर मोजण्याइतकेच मोठे साहित्यिक ह्या प्रांतांत दिसतात. कांहीं वर्षांपूर्वी बिहारच्या शाळा-कॉलेजांतून चालणारीं पुस्तकें प्रयाग-बनारसला प्रसिद्ध होत आणि उत्तरप्रदेशीय लेखकच तीं तयार करीत असत. ह्या एका गोष्टीवरून साहित्यक्षेत्रामध्यें हा प्रांत किती मागासलेला होता ह्याची कल्पना येईल. आतां मात्र बिहारी लेखक व प्रकाशक पुढें सरसावले आहेत आणि त्यांनीं बिहारच्या बाहेरही आपला प्रभाव पाडण्यास सुरवात केली आहे. व्यापार व उद्योग-धंदे यांच्या बाबतींत मात्र अद्यापि मारवाडी, पंजाबी व उत्तरप्रदेशीय लोकांचेंच वर्चस्व तेथें दिसून येतें आणि त्याबद्दल बिहारी लोक मनांतून व जाहीरपणें जळफळतांना आढळतात. अर्थात् ह्या बाबतीत आपणां महाराष्ट्रीयांशीं त्यांचें पुष्कळच साम्य आहे; कारण महाराष्ट्राचा व्यापार-उदीमही आज गुजराती व मारवाडी लोकांच्या हातांत आहे. आतांपर्यंत सरकारी व स्थानिक स्वराज्य-संस्थांचीं ठेक्याचीं कामें बहुधा पंजाबी व बोहरी लोकांनाच मिळत असत. परंतु आतां तेथें प्रांताभिमान जागृत झाल्यापासून ज्यास्त दराचीं टेंडरें देणाऱ्या स्थानिक बिहारी लोकांनाही कंत्राटें मिळूं लागलीं आहेत.

चुकीची नमुनेदार हिंदी

हिन्दी साहित्याच्या क्षेत्रांत बिहारी लोक जे मागें राहिले ह्याचें मुख्य कारण त्यांची चुकीची अथवा अशुद्ध हिन्दी हेंच असावें. बिहारमध्यें कांटेकोर शुद्ध हिंदीचें ज्ञान असणारे फार थोडे लोक सांपडतील आणि जे शुद्ध हिंदी बोलूं शकतात असे लोक तर त्याहूनही फार थोडे. इतरांची गोष्ट जाऊं द्या. खुद्द मीं बिहारमध्यें १५-२० दिवस राहिलों, तर तेवढ्या अवधींत बिहारी हिंदीनें मजवर पगडा बसविला आणि एकदां न कळत पुल्लिंगी दहीं शब्दाला मीं स्त्रीलिंगी बनवून टाकिलें. ह्याचें कारण असें कीं अष्टौप्रहर ज्या लोकांशीं संबंध येतो, त्यांच्यामध्यें शुद्ध हिंदीचा आग्रह धरणारे कोणी नसतात. आपोआप तोंडांतून जशीं-जशीं वाक्यें निसटून जातील तशीं जाऊं देणें, त्यासाठीं मुळींच प्रयत्न न करणें, हा येथील लोकांचा स्वभावच आहे.

अर्थात् ह्याबद्दल बिहारी लोकांना दोष देणें योग्य होणार नाहीं. कारण बिहारमध्यें कोणाचीही मातृभाषा हिंदी नाहीं. जिला 'खडी बोली' असें नांव आहे आणि जी पुस्तकें, वर्तमानपत्रें, वगैरेंच्या द्वारें छापील स्वरूपांत आपल्यासमोर येते व आंतरप्रांतीय संबंधासाठीं 'भारतीय घटना समिति'नें राजभाषा म्हणून जिला मान्यता दिलेली आहे, अशी हिंदी येथील कोणतेंही कुटुंब आपल्या घरांत वापरीत नाहीं. येथील लोक आपापल्या घरीं मगधी, भोजपुरी, मैथिली, वगैरे भाषा बोलतात. या भाषांमध्यें बंगालीप्रमाणें लिंगभेद नसल्यामुळें जेव्हां हे लोक हिंदी बोलतात, तेव्हां त्यांना लिंगाचें भान राहत नाहीं आणि 'बडा अच्छा रोटी खिलायी' अशासारखी एकाच वाक्यांत अनेक लिंगप्रयोग असलेली भाषा ते वापरतात. क्रियापदाचे नियमही कोणी पाळीत नाहींत. कर्तरी प्रयोगांत कर्ता एकवचनी व क्रियापद अनेकवचनी आल्यास ऐकणाराच्या कानांत तें खुपत नाहीं.

मराठीला जवळचे शब्द

बिहारी लोकांच्या हिंदीमध्यें येणारे कित्येक शब्द हिंदीपेक्षां मराठीलाच ज्यास्त जवळचे असे वाटतात. उदाहरणार्थ किराया (भाडें) ह्या शब्दाऐवजीं

तेथें सर्रास 'भाडा' हा शब्द वापरला जातो. 'बाल' (केंस)च्या ऐवजीं 'केश', 'चावल' (भात)च्या ऐवजीं 'भात', 'बक्सा'च्या ऐवजीं 'पेटी', वगैरे अनेक परिचित शब्द कानांवर पडले. इतकेंच नव्हे तर एकदां खादी-भांडारांतील विक्रेता जेव्हां मला म्हणाला कीं "इतना कपडा आपको पुरेगा नही", तेव्हां मला मोठी गंमत वाटली; कारण 'पुरणें' ह्या अर्थी 'पूरना' ह्या क्रियापदाचा प्रयोग ह्यापूर्वी मीं कधीं ऐकला अथवा वाचला नव्हता.

येथील अशुद्ध हिंदीच्या संसर्गांतून वर्तमानपत्रें व रेल्वेसुद्धां सुटलेल्या नाहींत. बिहारमधून प्रवास करितांना आगगाडीच्या डब्यांत जर पुढीलप्रमाणें पाट्या दृष्टीस पडल्या, तर आश्चर्य वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. खालील सूचना गयेहून रांँचीला जातांना आम्ही ज्या डब्यांत बसलों होतों त्यांतील आहेत. "४० आदमि बैठेगा। आगको फैलनेसे रोकनेको सावधानी, कमरेके अंदर सिगारेट व बीडीके तुकडे फेकना विपदजनक है। यदि अन्य यात्रियोंको आपत्ति हो तो कृपया धूम्रपान न करिये।"

महान् अभिशाप : पडदा

बिहारला मिळालेला सर्वांत भयंकर अभिशाप कोणता –असें जर कोणी मला विचारील, तर मीं तेथील पडदा-पद्धतीकडे बोट दाखवीन. ह्या घातक प्रथेमुळें बिहारला जणू अर्धांग झाला आहे. सर्व बिहारमध्यें कोणी हिंडला तरी त्याला हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याही स्त्रिया पाहावयास मिळणार नाहींत. ज्या थोड्या स्त्रिया किंवा तरुणी दिसतील त्या बंगाली असतील किंवा ख्रिश्चन तरी असतील अथवा अगदीं खालच्या वर्गांतील कामकरी बाया तरी असतील. खेड्यांची गोष्ट तर राहोच, पण शहरांतूनही सुंदरी-मुखदर्शन हें उंबराच्या फुलाइतकेंच दुर्लभ आहे. रांँची कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर आचार्य दादा धर्माधिकारी ह्यांचें व्याख्यान झालें, त्या वेळची गोष्ट. सबंध सभागृह विद्यार्थी, प्राध्यापक व शहरांतील प्रतिष्ठित मंडळी यांनीं भरून गेलेलें होतें; परंतु विद्यार्थिनी मात्र तीन-चारच होत्या. शहरांतील मोठ-मोठ्या सभांना फक्त पुरुषच हजर राहातात. स्त्रियांसाठीं

स्वतंत्र कॉलेजें आहेत. जेथें अशीं कॉलेजें नाहींत, तेथें विद्यार्थिनी जवळ-जवळ नसतातच. रॉंची कॉलेजच्या हजार-बाराशें विद्यार्थ्यांमध्यें सुमारें चाळीस विद्यार्थिनी आहेत. त्यांपैकीं सुमारें पस्तीस मुली बंगाली अथवा ख्रिश्चन जमातीच्या आहेत. ह्या पडदा-पद्धतीमुळें आधुनिक जग व विचार यांच्याशीं स्त्रियांचा फारसा संबंधच येत नाहीं. शेकडों वर्षांपूर्वीच्या जमान्यांतच त्या वावरत आहेत. ह्यामुळें जेव्हां एखादी परप्रांतीय स्त्री निर्भयपणें त्यांची सेवा करण्यास जाते, तेव्हां त्या आश्चर्यानें थक्क होतात आणि अजबखान्यामधील एखाद्या विचित्र प्राण्याकडे पाहावें तश्या त्या तिच्याकडे पाहूं लागतात. भूदानयज्ञाचा प्रचार करण्यासाठीं वर्ध्याच्या महिलाश्रमांतील कांहीं शिक्षिका, विद्यार्थिनी व कार्यकर्त्या कांहीं महिने बिहारमध्यें हिंडत होत्या. त्यांना असा अनुभव आला, कीं जोंपर्यंत तेथील पडदा-पद्धति नष्ट होणार नाहीं, तोंपर्यंत तेथें कोणतेंही स्थायी स्वरूपाचें कार्य होणार नाहीं. पडदा-पद्धतीमुळें हुंड्याचें वर्चस्व कायम राहिलें आहे. सामान्य वर्गांतील मुलींनाही पांच-सहा हजार रुपये हुंडा दिल्याशिवाय वर मिळत नाहीं. त्यासाठीं मुलीच्या बापाला आपला जमीन-जुमला विकावा लागतो. येथील कित्येक लोक भूदान-प्रचारकांना असें म्हणाले, कीं “आम्हीं तुम्हांला आमच्या जमिनी देऊन टाकिल्या, तर आमच्या मुलींचीं लग्नं कशीं होतील? तेव्हां तुम्ही जर हुंड्याची (त्याला इकडे तिलकप्रथा म्हणतात) चाल बंद कराल, तर आमच्याजवळ असलेली ज्यास्तींत ज्यास्त जमीन आम्ही भूदानयज्ञांत देऊन टाकूं.”

बिहारी राजकारणांतील जातीयवाद

महाराष्ट्रांतील जातीयवादानें संत्रस्त झालेल्या निराश मनाला भगवान् बुद्ध आणि महावीर यांचा पुनीत बिहार निश्चितपणें शांति देईल अशी अपेक्षा करणें निरर्थक आहे. तेथील जातीयवादाचें किळसवाणें व ओंगळ स्वरूप पाहून त्यांच्यापेक्षां आम्ही कितीतरी बरे असें वाटतें. आपल्याकडे सामान्यतः ब्राह्मण व ब्राह्मणेतर असें जातीयवादाचें स्वरूप आहे आणि जेथें-जेथें ब्राह्मणांनीं राजकीय सत्तास्पर्धेतून मानाच्या स्थानांवरून अंग काढून घेतलें आहे, तेथें-तेथें हा वाद जवळ-जवळ संपुष्टांत आला आहे आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतरांच्या नव्या पिढींत

जातीयवादापेक्षां सामाजिक व आर्थिक प्रश्नांसंबंधींचा जिव्हाळा वाढत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत.

बिहारमधील जातीयवादांत ब्राह्मण समाजाला मुळींच स्थान नाहीं. असलेंच तर सत्तेचा समतोल (बॅलन्स ऑफ् पॉवर) ठरविणारा एक अल्पसंख्य गट, एवढेंच त्याचें महत्त्व आहे. विधिमंडळांतून हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच ब्राह्मण सभासद आहेत; परंतु त्यांच्या ह्या विशिष्ट स्थानामुळें सध्यांच्या मंत्रिमंडळांतही एका ब्राह्मणाची वर्णी लागलेली आहे. आजपर्यंत बिहारमध्यें कायस्थ जमातीचें वर्चस्व होतें, ह्यामुळें कांहीं वर्षांपूर्वी येथील जातीयवादाचें स्वरूप कायस्थ व कायस्थेतर अशा स्वरूपाचें होतें. परंतु बहुसंख्येची लोकशाही देशामध्यें सुरू होतांच ज्यांची संख्या ज्यास्त त्यांचें राज्य अशी स्थिति निर्माण झाली आणि बहुसंख्य जमातींना महत्त्व प्राप्त झालें. आपल्याकडील मराठ्यांप्रमाणें येथें भूमिहार ही जमात आहे. ह्या जमातीचे पुढारी बिहारचे मुख्य मंत्री श्री. श्रीकृष्णसिंह (श्रीबाबू) हे आहेत. परंतु नुसत्या भूमिहार जातीच्या पाठिंब्यावर मुख्य मंत्रिपदाची जागा टिकविणें त्यांना शक्य नाहीं. त्यामुळें त्यांनीं ब्राह्मणांचा व इतर अल्पसंख्य जमातींचा पाठिंबा मिळविलेला आहे. बिहारमधील दुसरी महत्त्वाची जात म्हणजे रजपूत ही होय. ह्या जमातीचे पुढारी श्री. अनुग्रह नारायणसिंह हे बिहारच्या काँग्रेस मंत्रिमंडळांत अर्थमंत्री आहेत. श्रीबाबू आणि अनुग्रहबाबू यांच्यांत सत्तेसाठीं चाललेली झटापट आतां सर्वश्रुत आहे. वस्तुतः हें भांडण या दोघां व्यक्तींमधील आहे, परंतु त्याला व्यापक स्वरूप देण्यासाठीं त्यांनीं आपापल्या जमातींना राबविलें आहे. एका काँग्रेस पक्षाच्या हुकमतीखालीं काम करीत असूनही त्यांच्यांत अहि-नकुलवत् संबंध निर्माण झाले आहेत. तरी पण त्यांच्या भांडणामुळें तेथील काँग्रेसपक्षीय मंत्रिमंडळ कोसळलेलें नाहीं ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. आपल्या महाराष्ट्रांत काँग्रेसमधून 'शेतकरी कामकरी पक्ष' फुटून बाहेर पडला नसता, तर कदाचित् येथेंही असेंच मजेदार दृश्य पाहावयास मिळालें असतें. बिहारच्या परिस्थितीवरून महाराष्ट्रांतील जातीयवादी ब्राह्मणेतरांना एक धडा घेतां येण्यासारखा आहे; तो असा– कीं सत्तास्पर्धेतून ब्राह्मण समाज बाहेर पडला कीं

मग ब्राह्मणेतरांमध्येंच सत्तेसाठीं कलह सुरू होतात आणि तेथेंही मग त्यांत जी ब्राह्मणेतर जमात बहुसंख्य असते, तिचें वर्चस्व प्रस्थापित होऊन अल्पसंख्य ब्राह्मणेतर जमातीचें नुकसान होतें. बिहारमधील 'समाजवादी पक्षा'ला ह्या जातीयवादापासून दूर ठेवण्याचा पुष्कळच यशःस्वी प्रयत्न श्री. जयप्रकाश नारायण ह्यांनीं केलेला आहे. परंतु त्यामुळेंच जनतेमध्यें ते स्वतः अत्यंत लोकप्रिय असूनही त्यांच्या पक्षाला तिकडे बहुमत मिळवितां आलें नाहीं. जातीयवादानें पोंखरलेल्या ह्या देशांत बहुसंख्यांकांची लोकशाहीदेखील प्रसंगीं कशी अपयशी ठरते, ह्याचें बिहार हें एक उदाहरण आहे.

उज्वल भविष्याची आशा

इतकें असूनही बिहारच्या भवितव्याबद्दल मीं निराश नाहीं. बिहारी जीवनांतील सारें किल्मिष धुवून काढण्यास समर्थ असलेला असा एक महापुरुष आज तेथें जाऊन पोहोंचलेला आहे आणि बिहारची भूमिसमस्या यशःस्वीपणें सोडविण्याचा त्यानें चंग बांधलेला आहे. तो महापुरुष म्हणजे श्री. विनोबाजी भावे हे होत. बिहारबाहेरील व विशेषतः महाराष्ट्रांतील स्त्री-पुरुष कार्यकर्ते आज बिहारमध्यें हिंडून भूदान-यज्ञाचें कार्य करीत आहेत. त्यांच्यापैकीं स्त्री-कार्यकर्त्यांचा उपयोग करून घेऊन बिहारमधील पडद्याच्या प्रथेला मूठमाती देण्याची जयप्रकाशजींची इच्छा आहे. ती सफळ झाल्यास 'बिहारचा पुनर्जन्म' होईल आणि भगवान् बुद्धाच्या व भगवान् महावीराच्या काळचें सांस्कृतिक वैभव त्या प्रदेशाला पुन्हां प्राप्त होऊं शकेल.

बिहारची राजधानी : पटना

शहरवाढीला वावच नाहीं

जगांत आणि विशेषतः हिंदुस्थानांत जीं कांहीं अजब शहरें आहेत, त्यांत बिहारची राजधानी असलेलें 'पाटलीपुत्र' अथवा 'पटना' शहर ह्याची गणना अवश्य करितां येईल. राजधानीचें शहर ऐस-पैस पसरलेलें आणि चोहों-बाजूंनीं ज्याची वाटेल तशी वाढ होऊं शकेल असें असलें पाहिजे. परंतु पटना शहराचें वैशिष्ट्यच असें, कीं रेषेप्रमाणें त्याला लांबी आहे, परंतु रुंदी जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. त्याची लांबी वीस मैलांहूनही ज्यास्त आहे आणि रुंदी मात्र एक-दीड मैल आणि कांहीं जागीं त्याहूनही कमी आहे. ह्याचें कारण असें कीं हें शहर गंगानदीच्या कांठीं उंचावर वसलेलें आहे. ह्याची उंची इतकी आहे, कीं गंगेला कितीही भयंकर महापूर आला, तरी ह्या शहरांत पाणी शिरत नाहीं. नदी व शहर यांत मुळींच अंतर नाहीं. गंगेला जावयाचें म्हणजे तीन मजली माडी उतरून खालीं यावयाचें असेंच वाटतें. म्हणजे अगदीं नदीला लागूनच शहराची रचना करण्यांत आलेली आहे. शहराच्या मुख्य रस्त्यांतून जातांना अनेकदां नदीचें पात्र आपल्या दृष्टीस पडतें. शहराच्या दुसऱ्या बाजूचा भाग इतका सखल आहे कीं पावसाळ्यांत तो सर्व पाण्यानें भरून जातो. ह्यामुळें त्या बाजूस शहर वाढविण्याचा प्रयत्न करितांच येत नाहीं. पश्चिमेच्या बाजूस जवळच एक नदी आहे. तिला महापूर आला म्हणजे मात्र पटन्याला पाण्यांत बुडावें लागतें. म्हणून त्या बाजूनेंही शहराला वाढण्यास मार्ग नाहीं.

बोगद्यांतून चालल्यासारखें वाटतें

ह्या शहराचें आणखी एक वैशिष्ट्य असें कीं एका मोठ्या राजमार्गाच्या दोन कडांना सारें शहर वसलेलें आहे. शहराच्या ह्या टोंकापासून त्या

टोंकापर्यंत जाणारा ‘ अशोक पथ ’ एवढाच येथील महत्त्वाचा रस्ता होय. ‘ एका रस्त्याचें शहर ’ असें ह्या शहराला अभिधान देण्यास हरकत नाहीं. ह्या एकाच रस्त्यानें सारी वाहतूक होते. देवळें, मशिदी, शाळा, युनिव्हर्सिटी, वगैरे सर्व प्रकारचीं ठिकाणें ह्या रस्त्यावरच आहेत. मुंबई, कलकत्ता, मद्रास दिल्ली, वगैरे शहरांची लांबीही वीस मैल किंवा वीस मैलांहून अधिक आहे. परंतु तीं शहरें म्हणजे लहान-लहान उपनगरांचा समुदाय आहेत आणि एका उपनगरापासून दुसरें उपनगर अनेक मैल दूर असूं शकतें व त्यांमधील जागा पुष्कळ वेळां अगदीं रिकामी असूं शकते. परंतु ‘ अशोक पथा ’वरील घरें एक-मेकांना चिकटलेलीं आहेत. ह्या वीस मैलांच्या अंतरांत मध्यें मोकळी जागा नांवालाही आढळत नाहीं. मग उद्यानें अथवा मैदानें दिसण्याचा संभवच कोठला ? गांवाच्या एका टोंकाला ‘ गांधी मैदान ’ नांवाचें प्रचंड मैदान आहे, तेवढेंच काय तें. बाकी सर्व शहर हें एखाद्या बोगद्यासारखें वाटतें. मैलन् मैल गेलें तरी घरें संपत नाहींत, रस्ता फुटत नाहीं किंवा चौक लागत नाहीं. माझ्यासारख्या कमजोर स्मरणशक्ति असणाऱ्याला हें शहर फार सोयीचें वाटतें ; कारण फक्त एकच रस्ता असल्यामुळें रस्ता चुकण्याची भीति ह्या शहरांत मुळींच नाहीं.

एका वेळीं दोन मोटारी जाणें अशक्य

बरें, हा रस्ता तरी चांगला ऐस-पैस रुंद असावा ! मुळींच नाहीं. शहराप्रमाणें ह्या रस्त्यालाही रुंदी नाहीं. ह्यामुळें बोगद्याची उपमा अगदीं सार्थ वाटते. हा रस्ता इतका अरुंद आहे कीं एका वेळीं एस. टी. ची एकच मोटार व्यवस्थितपणें जाऊं शकते. ह्यामुळें आगगाडीच्या रुळांप्रमाणें ह्या रस्त्याचा वापर करावा लागतो. ‘ सिटी बस सर्व्हिस ’च्या वेळा ठरलेल्या असल्यामुळें आगगाडीप्रमाणें त्यांचें क्रॉसिंग रस्त्याच्या त्यांतल्या त्यांत रुंद भागांत होऊं शकेल अशी खबरदारी घेण्यांत येते. परंतु परगांवीं जाणाऱ्या मोटारीही शहराच्या एका टोंकापासून सुटत असल्यामुळें फार घोंटाळा होतो. समोर एखादी बैलगाडी, रिक्षा किंवा हातगाडी चालत असली आणि त्याच वेळीं दोन मोटारी समोरासमोर आल्या कीं अर्धा-पाऊण तासाची निश्चिती झालीच म्हणून समजावें. लग्नसराईच्या दिवसांत तर मोटारींतून

प्रवास करणाऱ्यांची कुचंबणा पराकोटीला जाऊन पोहोंचते. समोर एखादी वरात जात असली म्हणजे मागून येणारी मोटरही त्या वरातींतीलच एक भाग बनते आणि वाटेंत देऊळ अथवा घर लागून त्या वरातीची पांगापांग होईपर्यंत त्या मोटारीलाही मुंगीच्या पावलानें वरातीचें अनुसरण करावें लागतें. ह्यामुळेंच तुम्ही अमुक एका क्षणीं अमक्या ठिकाणीं जावयाचें ठरवून घरांतून बाहेर पडलांत, तर त्या क्षणीं तेथें पोहोंचालच अशी शाश्वती मुळींच देतां येत नाहीं. मीं भारतांतील अनेक शहरें पाहिलीं आहेत, परंतु इतका अरुंद व इतका दाट रहदारीचा रस्ता अद्यापि माझ्या पाहण्यांत नाहीं.

मनांत सतत अपघाताची भीति

बरें, हा रस्ता सरळ नाकासमोर जाणारा असता, तरी फारशी अडचण भासली नसती. परंतु ह्या रस्त्याला अत्यंत धोक्याचीं अशीं भयंकर वळणें आहेत. कांहीं वळणांवर पुढून कोण येत आहे किंवा कोणतें वाहन चाललें आहे ह्याची मुळींच कल्पना येत नाहीं. ह्यामुळें अपघात घडण्याची टांगती तलवार सतत मानेवर असते; म्हणून मोटारींत बसल्यापासून उतरेपर्यंत ड्रायव्हरला सारखा हॉर्न वाजत ठेवावा लागतो. कोणी म्हणेल, इतकीं भयंकर वळणें अजून कां चालू ठेविलीं आहेत? त्याला उत्तर असें कीं गंगा नदीच्या कांठानें वसत जाण्याचा निर्णय ह्या शहरानें घेतला असल्यामुळें ती नदी जशी वेडी-वांकडी वाहात जाईल, तसें त्या शहरालाही अठरावक्र स्वरूप धारण करावें लागलें आहे. ह्यामुळें हीं वळणें कधींकाळीं नाहींशीं करितां येतील कीं नाहीं ह्याविषयीं शंकाच आहे.

सर्वत्र उघडीं गटारें, अस्वच्छता

उत्तर-भारतांतील शहरें सामान्यतः अस्वच्छता आणि गलिच्छपणा यांचीं आगरेंच असतात. त्या मानानें दक्षिण भारतांत स्वच्छता व नीट-नेटकेपणा अधिक आढळतो. ही गोष्ट घरें व रस्ते या दोहोंनाही लागू आहे. ह्या विधानाचा उत्कृष्ट पुरावा म्हणून भारताची राजधानी असलेल्या दिल्ली शहराच्या जुन्या वस्तीकडे बोट दाखवितां येईल. प्रयाग आणि काशी या शहरांतील गलिच्छपणाही दिल्लीपेक्षां कांहीं

कमी नाहीं. परंतु पटन्याची अस्वच्छता कांहीं औरच आहे. जागेच्या टंचाईमुळें ह्या गलिच्छपणास एक मोठी सबब मिळाल्यासारखी झाली आहे. परंतु जेथें जागा भरपूर आहे, अशा कदमकुआँ भागांतही गलिच्छपणाला कांहीं तुटवडा नाहीं. बिहारचे सुप्रसिद्ध कवि श्री. आरसीप्रसाद सिंह जेथें राहतात, त्या घराच्या दारांतच घाणेरड्या पाण्याचा एवढा मोठा नाला आहे कीं अपरिचित माणूस रात्रीं-अपरात्रीं गेल्यास त्यांत बुडून जावयाचा. सबंध पटना शहरांत उघडीं गटारें आहेत. 'अशोक पथा'च्या दोन्ही बाजूंस गांवांतील सांडपाणी व मलमूत्र घेऊन वाहणारीं उघडीं गटारें पाहिलीं, कीं आपण अजून सोळाव्या शतकांतच वावरत आहोंत असें वाटतें. ह्या घाणीमुळें मलेरिया, क्षय, वगैरे रोगांनीं येथें कायमचें ठाणें दिलें आहे. वस्तुतः शहराच्या मर्यादित जागेचा फायदा घेऊन म्युनिसिपालिटीला तें ज्यास्त स्वच्छ ठेवितां आलें असतें. कारण रांचीप्रमाणें जेथें पांच-पन्नास मैलांच्या रस्त्यांची निगा ठेवावी लागते, तेथें इतर सुख-सोयींकडे लक्ष्य देणें नगरपालिकेला परवडत नाहीं. परंतु येथें फक्त एकाच रस्त्याची स्वच्छता पाहावयाची असल्यामुळें जमिनीखालचें गटार तयार करणें नगरपालिकेला खर्चाचें वाटण्याचें कारण नाहीं. ह्या बाबतींत एक अडचण पुढें येऊं शकेल. ती म्हणजे गटारासाठीं रस्ता उकरल्यास साऱ्या शहराचें व बाहेरगांवचेंही दळण-वळण कांहीं दिवस तहकूब ठेवावें लागेल. परंतु आधुनिक विज्ञानाच्या युगांत रात्रींतून थोडा-थोडा रस्ता उकरून काम करणें अशक्य समजण्याचें कारण नाहीं. गंगेच्या उंच-सखलपणाप्रमाणें गांवांतही उंच-सखल भाग आहे ह्यामुळें जमिनीखालचें गटार काढितां येत नाहीं असेंही म्हणतात. परंतु शास्त्रज्ञांची मदत घेतल्यास ह्यांतूनहि मार्ग निघूं शकेल ह्यांत शंका नाहीं.

गंगा नदीचें एक मैल रुंद पात्र

विपुल पाण्यानें तुडुंब भरलेली गंगा नदी शहराला घासून वाहत असल्यामुळें येथें पाण्याचा तुटवडा मात्र मुळींच भासत नाहीं. विहिरींनाही पाणी भरपूर असतें व नळांचीही व्यवस्था चांगली आहे. परंतु ह्या पाण्याच्या सुबत्तेमुळें डांस, चिलटें,

अस्वच्छता व रोगराई यांचीच वाढ झालेली आहे. ह्या ठिकाणीं गंगानदीचें पात्र कमींत कमी एक मैल रुंद आहे ; ह्यामुळें जवानांना पोहण्याची हौस उत्तम प्रकारें भागवितां येते. रोज नियमितपणें भाविक अंतःकरणानें गंगास्नान करणारे लहान-थोर स्त्री-पुरुष पुष्कळ दृष्टीस पडतात. नदीमध्यें नौकाविहाराचीही सोय आहे. परंतु येथील अव्यवस्थितपणामुळें पद्धतशीर वागणाऱ्यांना फार त्रास होतो. आम्ही कांहीं मंडळी महेंद्र घाटावर होडींत बसण्यासाठीं गेलों होतों. अडीच रुपयांना अर्धा-पाऊण तासासाठीं आम्हीं एक होडी ठरविली. परंतु होडीवाल्याला वरच्या कमिशनचा लोभ आवरेना. त्यानें इतरही अनेक लोक होडींत भरले आणि नाव चालवावयाला ह्याची आवश्यकता आहे अशी बतावणी केली. त्याची लबाडी लक्ष्यांत येतांच आम्ही नावेंतून बाहेर पडलों व पुन्हां त्याच्या वाटेला जावयाचें नाहीं असें ठरविलें.

धान्याचें प्रेक्षणीय कोठार

पटना शहराची रचनाच अशी कांहीं विचित्र आहे कीं तेथें प्रेक्षणीय स्थळांचें अस्तित्वच संभवत नाहीं. वस्तुतः गौतम बुद्धाच्या व अशोकाच्या काळापासून हें शहर अत्यंत भरभराटीला आलेलें होतें व नंतरही त्याला वाईट दिवस आल्याचें दिसत नाहीं. ह्यामुळें येथें कांहींतरी प्रेक्षणीय स्थळें असावयास हवीं होतीं. परंतु त्यासंबंधीं चौकशी करितां तीन गोष्टींचीं नांवें सांगण्यांत आलीं. एक म्यूझियम अथवा पदार्थसंग्रहालय. बिहारमध्यें ठिक-ठिकाणीं जें खोदकाम झालें आहे त्यांत सांपडलेल्या वस्तू ह्या अजबघरांत ठेवण्यांत आल्या आहेत. परंतु देशांत इतर ठिकाणीं जीं वस्तुसंग्रहालयें आहेत, त्या मानानें येथील म्युझियम अगदींच सामान्य आहे. दुसरें स्थळ म्हणजे अगमकुआँ नांवाची विहीर. ह्या विहिरीचा अंत लागत नाहीं असें म्हणतात. तिसरी वस्तु म्हणजे येथील गोलघर. हें गोलघर म्हणजे धान्याचें एक कोठार आहे. नेहमीं पडणाऱ्या दुष्काळाच्या तरतुदीसाठीं इंग्रजांनीं हें प्रचंड कोठार १७७४ सालीं बांधलें. तें १७७६ सालीं पुरें झालें. ह्यांत हजारों खंडी धान्य मावतें. परंतु त्या वेळीं ह्या कोठाराचा उपयोग करण्याची पाळीच आली नाहीं. पुढें १९४२ नंतर रेशनिंग सुरू झालें आणि ह्या

कोठाराचा उपयोग धान्यसांठा ठेवण्यासाठीं होऊं लागला. सध्यां तेथें धान्यसांठा व कांहीं कचेऱ्या आहेत. त्याच्या बाहेरील बाजूनें वर चढण्यासाठीं पायऱ्या आहेत. तळापासून वरपर्यंत दीडशें पायऱ्या आहेत, ह्यावरून ह्या कोठाराच्या उंचीची कल्पना येईल. १९३० सालीं सरकारला झुकांडी देऊन ह्या गोलघरावर तिरंगी झेंडा फडकविण्यांत येत असे. येथून पटना शहराचें विहंगम दृश्य फार छान दिसतें. ह्या गोलधराचा आकार पालथ्या हॅटसारखा किंवा स्तूपासारखा आहे.

गुरुद्वारांतील प्रसन्नता, स्वच्छता

परंतु सर्वांत महत्त्वाचें स्थान म्हणजे येथील शिखांचा गुरुद्वारा होय. शिखांचे दहावे गुरु गुरुगोविंदसिंह ह्यांचें जन्मस्थान पटना आहे. त्यांच्या जन्मस्थानीं भव्य गुरुद्वारा बांधण्यांत आला आहे. शिखांचे गुरुद्वारे स्वच्छता व टाप-टीप ह्यांविषयीं प्रसिद्ध आहेत. तेथील शिस्तही मोठी कडक असते. पटन्याच्या गुरुद्वारांत प्रवेश करतांच मन प्रसन्न होतें. तेथें उघड्या डोक्यांनीं जातां येत नाहीं, म्हणून आम्हीं आमच्याबरोबर टॉवेल व हातरुमाल ठेविले होते. परधर्मीय लोकांच्या सोयीसाठीं तेथें टोप्याही ठेवण्यांत आल्या आहेत. गुरुद्वाराच्या आवारांत कोठेंही थुंकावयाचें नाहीं अशी सक्त ताकीद आहे. मंदिरांत प्रवेश करण्यापूर्वीं पाय धुवावे लागतात. त्याप्रमाणें पाय धुतल्यावर नेहमींच्या संवयीप्रमाणें मीं चूळ भरली, त्याबरोबर तेथील रक्षक पुढें आला आणि त्यानें मला सांगितलें कीं– "इथें थुंकण्याची जी मनाई आहे, ती चूळ भरण्यालाही लागू आहे. पुन्हां अशी चूक करूं नका." त्या वेळीं तेथें शीख भजन चालू होतें. परंतु बाजाच्या पेटीवर चाललेलें तें भजन इतकें भडक वाटत होतें, कीं त्यामुळें भक्तिभाव जागृत होत असेल अशी शंका मनांत आली नाहीं. तेथें गुरुग्रंथसाहेबावर चवऱ्या ढाळण्याचा कार्यक्रम चालू होता. एका मूर्तिपूजेंतून गुरु नानकांनीं शिखांना बाहेर काढिलें, तर त्यांनीं पुस्तकाचीच पूजा करण्यास सुरुवात केली. भारतीय मन किती मूर्तिपूजक आहे ह्याचा हा पुरावाच म्हणावयास हरकत नाहीं. येथील मुसुलमान व ख्रिश्चनही वेगवेगळ्या स्वरूपांत मूर्तिपूजकच आहेत असें दिसून येतें.

शैक्षणिक केंद्र, दोन विद्यापीठें

पटना हें बिहारचें शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्र आहे. येथें ' पटना विश्वविद्यालय ' व ' बिहार विश्वविद्यालय ' अशीं दोन विद्यापीठें असून सध्यां त्यांचीं आप-आपसांत भांडणें सुरू आहेत. येथें 'सर्चलाईट' व ' इंडियन नेशन ' हीं दोन इंग्रजी दैनिकें उत्तम प्रकारें चालू आहेत. ह्यावरून इंग्रजीचें प्रस्थ अजून बरेंच असल्याचें दिसतें. 'नवराष्ट्र' व 'आर्यावर्त' हीं हिंदी व कांहीं उर्दू दैनिकेंही येथें चालतात. 'अवंतिका', 'पाटल', 'नई धारा', वगैरे भारदस्त हिंदी मासिकें येथून निघतात आणि श्रीरामवक्ष, बेनीपुरी, श्री. दिनकर, श्री. नागार्जुन, श्री. लक्ष्मीनारायण सुधांशु, श्री. आचार्य शिवपूजन सहाय, श्री. अनूपशर्मा मंडल, वगैरे अनेक प्रसिद्ध व महत्त्वाचे साहित्यिक येथेंच राहतात. हिंदीचा विकास व प्रचार करणारी ' राष्ट्रभाषा परिषद् ' ही संस्थाही येथेंच आहे. ह्यामुळें साहित्यिक व सांस्कृतिक दृष्ट्या ह्या शहराला फार महत्त्व आहे. प्रदेशाची राजधानी असल्यामुळें राजकीय महत्त्व आहे हें वेगळें सांगावयास नकोच. श्री. राजेंद्रप्रसाद व श्री. जयप्रकाश नारायण यांचें मुख्य ठाणें हेंच आहे. एवढें सर्व पाहिल्यानंतर असें वाटतें कीं इतकें महत्त्व पेलण्याचें सामर्थ्य ह्या शहरांत मुळींच नाहीं. एक तर सारी शक्ति-बुद्धि खर्च करून ह्या शहराचें बाह्य स्वरूप पालटण्यांत आलें पाहिजे, किंवा तें शक्य नसेल, तर बिहारनें दुसरें एखादें केंद्र स्वतःसाठीं निर्माण केलें पाहिजे.

गया आणि बोधगया

चांडिल (बिहार)चें 'सर्वोदय संमेलन' आटोपल्यानंतर आचार्य दादा धर्माधिकारी ह्यांच्याबरोबर बिहारची राजधानी पटना (पाटणा) ह्या शहरीं जाण्याची संधि मला मिळाली. तेथें दोन दिवस राहून संमेलनाचा अधिकृत अहवाल तयार करण्यासाठीं आम्हांला रांँची ह्या थंड हवेच्या ठिकाणीं जावयाचें होतें. पटन्याहून रांँचीला जातांना वाटेंत गया लागत होती. सुदैवानें माझे माता-पिता हयात असल्यामुळें गयेशीं मला कांहीं कर्तव्य नव्हतें आणि धार्मिक रूढी व कर्मकांड यांच्या बाबतींत विशेष आस्था नसल्यामुळें गयेच्या यात्रेबद्दल कांहींच ओढ माझ्या ठिकाणीं नव्हती. राजकुमार गौतमाला ज्या ठिकाणीं 'सम्मसंबोधि' अथवा ज्ञान प्राप्त झालें व तो गौतमबुद्ध बनला, त्या बोधिगयेचें दर्शन घेण्याची अभिलाषा मात्र मनांत अनेक वर्षांपासून होती. ह्यामुळें बोधिगयेला जातां आल्यास ती संधि दवडावयाची नाहीं असें मीं ठरविलें होतें.

माझ्या दृष्टीनें गयेला धार्मिक महत्त्व उरलें नसलें, तरी गेल्या कांहीं महिन्यांपासून ह्या शहराला व गया जिल्ह्याला एक वेगळेंच महत्त्व प्राप्त झालेलें आहे. भूदानयज्ञाचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे ह्यांनीं भगवान् बुद्धांच्या निवासानें पुनीत झालेल्या ह्या तीर्थक्षेत्रीं फार महत्त्वाचे व चिरपरिणामकारी असे निर्णय गेल्या कांहीं महिन्यांत केले. त्यांपैकीं एक निर्णय असा, कीं भारतांतील भूमिसमस्या सुटल्याखेरीज स्वस्थानीं –वर्ध्याजवळील पवनार ह्या गांवीं– परत न जाण्याचें त्यांनीं ठरविलें. ह्यामुळें आतां एक तर ह्या प्रश्नाचा निकाल लागेल किंवा विनोबांचाच निकाल लागेल, अशी स्थिति निर्माण झाली आहे. उत्तर-प्रदेशाच्या मानानें बिहारमध्यें विनोबांना ज्यास्त खडकाळ जमीन लागली. परंतु दगडा-धोंड्यांच्या महाराष्ट्रांतून निर्माण झालेला हा वीरपुरुष असल्या खडकांना थोडीच भीक

घालणार ? त्यांनीं असा निर्धार केला, कीं ह्या बिहार प्रदेशांतील जमिनीचा प्रश्न तरी सुटेल, नाहीं तर माझीं हाडें तरी ह्या ठिकाणीं पडतील. बिहारचा भूप्रश्न सुटल्याखेरीज ह्या प्रदेशांतून बाहेर पडावयाचें नाहीं असें विनोबांनीं ठरविलें आहे आणि बिहारचा प्रश्न सोडविण्याची एक पायरी म्हणून गया जिल्ह्याचा प्रश्न सोडविण्याचा त्यांनीं निश्चय केला आहे. गया जिल्ह्यांत तीन लाख एकर जमीन मिळाल्यास कायद्याच्या मदतीशिवाय ह्या जिल्ह्यांतील भूमिहीनांचा प्रश्न सोडवितां येईल असें त्यांना वाटतें व बाबू जयप्रकाश नारायण ह्यांचीही तशीच खात्री झालेली आहे. वर्ध्याच्या महिलाश्रम, ग्रामोद्योग संघ, वगैरे विधायक कार्य करणाऱ्या संस्थांतील कार्यकर्ते ह्या जिल्ह्यांत अनेक दिवसांपासून काम करीत आहेत आणि विनोबांनीं आपले पुत्रवत् चिटणीस श्री. दामोदरदास मूँधडा ह्यांना त्या जिल्ह्यासाठीं खास नेमिलें आहे. अशा प्रकारें गांधीजींच्या चळवळींत दांडीला व बार्डोलीला जें महत्त्व प्राप्त झालेलें होतें, तें गयेला व गया जिल्ह्याला सध्यां प्राप्त झालेलें आहे. ह्यामुळें तेथें काम करणाऱ्या मित्रांना भेटण्यासाठीं आम्हीं गयेला उतरावयाचें ठरविलें.

प्रथम बोधिगया, नंतर गया

येथील डाकबंगल्यांत गया जिल्हा भूदानयज्ञाची कचेरी व कार्यकर्त्यांचा मुक्काम असल्यामुळें आम्ही सरळ डाकबंगल्यांत गेलों. श्री. दादा धर्माधिकारी हे बिहारी लोकांचे फार आवडते वक्ते आहेत. त्यांनीं बिहारमध्यें जितके दौरे काढिले व जितकीं व्याख्यानें दिलीं, तितकीं कदाचित् महाराष्ट्रांतही दिलीं नसतील. ह्यामुळें त्यांच्याबरोबर बिहारमध्यें हिंडतांना आपण आपल्या प्रांतांत हिंडत आहोंत इतकी आत्मीयता व जिव्हाळा प्रत्ययास येतो. बहुतेक सर्व मोठ-मोठ्या ठिकाणीं ते अनेकदां गेलेले आहेत, ह्यामुळें त्यांच्या वक्तृत्वानें व प्रेमानें भारावून गेलेले अनेक लहान-थोर कार्यकर्ते बिहारमध्यें सर्वत्र पसरलेले आहेत. दादा आले आहेत असें कळतांच अनेक लोक येऊन त्यांच्या भोंवतीं गोळा होतात. गयेलाहि तशीच स्थिति झाली. ह्यामुळें गयेंतील व बोधिगयेंतील मुख्य-मुख्य ठिकाणें पाहतांना दादांचें सांनिध्य लाभणार कीं नाहीं अशी शंका निर्माण झाली. कोणी म्हणेल, कीं प्रसिद्ध स्थळें पाहण्यासाठीं

दादांना राबविण्याची काय गरज ? परंतु दादांच्या संगतींत महान् ऐतिहासिक व धार्मिक स्थळें पाहण्याचें भाग्य ज्यांना एकदां लाभलें आहे, त्यांना त्यांच्या सहवासाचा मोह टाळणें अशक्य होतें. आचार्य काकासाहेब कालेलकर ह्यांच्याबरोबर प्रसिद्ध ठिकाणें पाहण्यामध्येंहि असाच आनंद मिळतो. परंतु त्या दोघांच्या व्यक्तिमत्त्वांत जसा जमीन-अस्मानाचा फरक आहे, तसाच त्यांच्या उपस्थितीचाही अगदीं वेग-वेगळा परिणाम होतो. काकासाहेब हे अव्वल दर्जाचे कलारसिक व सर्वसंग्रही वृत्तीचे आहेत. लहानश्या वस्तूंतीलही सौंदर्य उलगडून दाखवावें काकांनींच. त्यांच्याजवळील माहितीचा सांठा तर सिंदबादला सांपडलेल्या हिऱ्या-मोत्यांच्या राशींसारखा 'अखूट', कधींही न संपणारा असतो. ह्यामुळेंच कै. महादेवभाई देसाई त्यांना चालता-बोलता ज्ञानकोश म्हणत असत. दादांच्या बाबतींत असें म्हणतां येणार नाहीं. परंतु ते संबंध देशभर अनेकदां फिरले आहेत, ह्यामुळें कोठें काय पाहण्यासारखें आहे ह्याची त्यांना अचूक कल्पना आहे आणि आपल्याबरोबर असणाऱ्यांना आपल्याजवळ असलेली सर्व माहिती मोठ्या प्रेमानें द्यावयाची व स्वतःला कितीही कष्ट पडले तरी जातीनें सर्व दाखवावयाचें ह्या त्यांच्या तळमळी-मुळें व्यक्तिशः त्यांना जरी त्रास होत असला, तरी त्यांच्या समवेत हिंडणाऱ्यांना एक अनिर्वचनीय सुख लाभत असतें. म्हणून गयेंतील व बोधिगयेंतील स्थानें दादांनीं स्वतःच मला दाखविलीं पाहिजेत असा मीं हट्ट घेतला आणि त्यांनींही तो आनंदानें मान्य केला.

प्रत्यक्ष गयेमध्यें पाहण्यासारखें कांहीं नाहीं व आम्हांला कोणतेंच धार्मिक कृत्य करावयाचें नव्हतें, म्हणून गयेपासून सात मैलांवर असलेल्या बोधिगयेला प्रथम जाऊन येण्याचें आम्हीं ठरविलें. आमच्या बरोबर श्री. त्रिलोकीनाथ त्रिपाठी नांवाचे एक उत्तरप्रदेशीय पत्रकार होते. ह्यामुळें बोधिगयेपर्यंतचा आमचा टमटममधील प्रवास मोठ्या मजेचा झाला. टमटम हें बिहारचें खास वाहन आहे. उत्तर प्रदेशांतील एक्क्यासारखेंच हें असतें. पुढचा भाग टांग्यासारखा असून त्याला घोडा जोडलेला असतो ; मात्र मागचा भाग एक्क्यासारखा असतो. ह्या टमटममध्यें चार उतारूंनीं बसावें असा सरकारी नियम आहे ; परंतु कमींत कमी सहा उतारू तरी

(टांगेवाल्याखेरीज) टमटममध्यें कोंबले जातातच. त्यांची ज्यास्तींत ज्यास्त संख्या वाटेल तितकी असूं शकते. आमच्या डोळ्यांदेखत आठ उतारू किंवा स्वाऱ्या असलेली टमटम भरवेगांत निघून गेलेली आम्हीं पाहिली. इतके उतारू व ओझें तुफान वेगानें वाहून नेणारीं घोडीं मात्र कृष्णाकांठच्या तट्टांप्रमाणें लहानसर व टुणटुणीत असतात आणि ह्यामुळेंच बहुधा सात मैलांचें अंतर चालून जाण्यासाठीं माणशीं सहा आणे भाडें घेणें टमटमवाल्यांना परवडत असावें. आम्ही एक तासांत बोधिगयेला जाऊन पोहोंचलों.

फल्गूचें रेताड पात्र

गयेहून बोधिगयेपर्यंतचा रस्ता पक्का डांबरी असून तो फल्गु नदीच्या कांठा-कांठानें जातो. ह्यामुळें फल्गूच्या रेताड पात्राची शोभा सहजच दृष्टीस पडते. फल्गु नदी अन्तःसलिला आहे. वर्षातून दोन-तीन महिने ह्या नदीला पाणी असतें आणि हिचें पात्र जरी जवळ-जवळ पांच-सहा फर्लांग रुंद असलें, तरी त्याला खोली मुळींच नाहीं ; ह्यामुळें नदीला पाणी असतें, तेव्हांहि तें गुडघाभर अथवा ज्यास्तींत ज्यास्त कंबरेइतकें खोल असतें. मला वाटतें हिंदुस्थानांत फल्गु ही एकच प्रसिद्ध नदी असावी कीं जिच्यामध्यें बुडून मरण्याची अथवा जीव देण्याची सुळींच सोय नाहीं. आम्ही गेलों त्या वेळीं नदींत पाण्याचें एक टिपूसही नव्हतें. परंतु पांढऱ्या शुभ्र रेतीचा तो लहानसा सागरही कांहीं कमी आकर्षक वाटत नव्हता. नदीच्या कांठानें ताडाचीं उंच-उंच झाडें होतीं व त्यांना ताडी काढण्यासाठीं मडकीं लाविलेलीं होतीं. ह्यामुळें कोंकणांतील समुद्रकांठच्या प्रदेशाचा भास होत होता. नदीला पूर आला कीं ह्या सडकेवरही पाणी येतें; परंतु तें तास-दोन तासांपेक्षां ज्यास्त वेळ टिकत नाहीं. नदीच्या पुराच्या वेळीं हीं ताडाचीं झाडें कशीं सुंदर दिसत असतील आणि आतां रखरखीत वाटणारें हें मैदान कसें हिरवें-गार होऊन जात असेल, ह्या कल्पनेनें मन उल्हसित झालें आणि गरम वारे वाहत असतांही मनाला त्यांची बाधा झाली नाहीं. बौद्ध साहित्यांत ह्या नदीला नेरंजरा असें नांव आहे, तें बहुधा निर्जला–निर्जरा–निरंजरा–नेरंजरा ह्या क्रमानें बदललें असावें.

फल्गु नदीचें एक वैशिष्ट्य आहे. तुम्हांला तहान लागली असल्यास ती तुम्हांला तसेंच परत पाठविणार नाहीं. तुम्ही नुसत्या हातानें वीतभर खणा, कीं थंड-गार मधुर पाणी तुमच्या सेवेसी हजर. ह्यामुळें जागो-जागीं अशीं लहान-मोठीं कुंडें तयार झालेलीं आपल्याला दिसतील. अर्थात् ह्या नदींत दगड किंवा खडक मुळींच नसल्यामुळें हीं कुंडें फार वेळ टिकत नाहींत. जोराची वावटळ आली कीं तीं रेतीनें भरून जातात. परंतु तीं खोदण्यास मुळींच श्रम पडत नसल्यामुळें लोकांना त्याचें कांहीं वाटत नाहीं. नदीकांठीं चरत असलेल्या जनावरांकडे पाहून मीं टमटमवाल्याला विचारिलें– " गुरांना प्यायला पाणी कुठलं ? " त्यावर त्यानें सांगितलें– " आम्हीं गांवचे /सर्व लोक सामुदायिक मेहेनतीनें गुरांसाठीं मोठ-मोठीं डबकीं खणतों. त्यांतच हीं पाणी पितात. " तो टांगेवाला मुसुलमान होता. परंतु त्याला त्या कोरड्या नदीचाही फार अभिमान वाटत होता. पावसाळ्यांत नदीला पूर आला, म्हणजे आपण कश्या गंमती करतों, किती श्रद्धेनें गंगास्नान करतों, वगैरे गोष्टींचें मोठें रसभरित वर्णन तो करूं लागला आणि तें वर्णन ऐकून सीतेच्या शापानें कोरड्या पडलेल्या त्या नदीचें अदृश्य सौंदर्य आमच्याही डोळ्यांसमोर साकार बनूं लागलें.

महंताच्या गढीची सलामी

बोधिगयेच्या परिसरांत प्रवेश करितांच डाव्या हाताला एक भला मोठा व लांब-लचक तट लागतो. त्याच्यासंबंधीं चौकशी करितां तो ह्या ठिकाणच्या महंताच्या गढीचा भुईकोट किल्ल्यासारख्या राजवाड्याचा बाहेरील तट असल्याचें समजलें. हा महंत म्हणजे येथील एक फार बडें प्रस्थ आहे. बोधिगयेच्या मुख्य मंदिराची मालकी त्याच्याकडे आहे. वस्तुतः बौद्धधर्मीय मंदिराची मालकी एका हिंदु महंताकडे असणें अन्यायाचें आहे. परंतु बौद्धधर्मीयांनीं हें प्रकरण न्यायालयांत नेलें असतां त्यांचा पराभव झाला आणि मंदिराची मालकी सदर महंताकडेच राहिली. मंदिराजवळ लाखों रुपयांची मालमत्ता आहे. त्या पैशावर महंतमहाराज आणि त्यांचे चेले चैन करीत अससात ; त्यामुळें त्यांच्याविरुद्ध बौद्धांप्रमाणें इतरांचीही तक्रार आहे असें समजलें.

खड्ड्यांत पडलेलें बुद्धमंदिर

महंताच्या गढीसमोर झाडांच्या सांवलींत टमटम सोडून देऊन आम्ही पुढें गेलों. उजव्या बाजूस किंचित् चढून गेलें म्हणजे डाव्या बाजूस एक खोल व ऐस-पैस खड्डा दृष्टीस पडतो. त्यांतच बुद्धगयेचें इतिहासप्रसिद्ध मंदिर आहे. त्याच्या एकूण स्थितीवरूनच आपल्या लक्ष्यांत येतें कीं ह्या ठिकाणीं हें मंदिर मातीमध्यें गाडलें गेलें असलें पाहिजे. सुमारें ऐंशीं वर्षांपूर्वी (इ. स. १८७० सालीं) भारत सरकारनें सर अलेक्झांडर कनिंगहॅम व डॉ. राजेंद्रलाल मित्र यांच्या देखरेखीखालीं हें मंदिर ऊर्जितावस्थेस आणिलें. तेव्हांपासून भारतांतील व जगांतील बौद्धधर्मानुयायांचें लक्ष्य त्याच्याकडे वेधलें. मंदिरापर्यंत पोहोंचण्यासाठीं अरुंद घाटासारख्या पायऱ्या आहेत. त्याच्या प्रवेशद्वाराजवळ सांचीच्या पद्धतीची दगडी चौकट आहे. तिच्यावरील बारीक नक्षीकाम व कारागिरी प्रेक्षणीय आहे. मंदिराच्या भोंवतीं सुंदर दगडी कठडा असल्याचे अवशेष सध्यां पाहावयास मिळतात. ह्या मंदिराच्या संरक्षणाची जबाबदारी इतिहास-संशोधन खात्याकडे नसून पी. डब्ल्यू. डी. कडे आहे ही एक आश्चर्याची गोष्ट आहे.

मामुली स्थापत्य

उत्तर-भारताच्या मानानें हें बोधिगयेचें मंदिर पुष्कळच भव्य व नीट-नीटकें आहे. परंतु दक्षिण-भारतांतील मदुरेचें मीनाक्षीमंदिर किंवा तिरुवअनंतपुरम् (त्रिवेंद्रम्) चें अनंतशयनम् मंदिर ज्यानें पाहिलें असेल, त्याला हें मंदिर अगदींच सामान्य प्रतीचें वाटेल. फाहियान व ह्युएनत्संग ह्यांच्या प्रवासवर्णनांवरून हें मंदिर इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत बांधिलें गेलें असावें असें दिसतें. परंतु अमरसिंह नांवाच्या पुरुषानें इसवी सनाच्या पांचव्या शतकांत हें मंदिर बांधिलें असावें असा विद्वानांचा तर्क आहे. ह्याचा अर्थ भारताच्या स्थापत्यकलेला उतरती कळा लागल्यानंतर हें मंदिर बांधिलें गेलें आहे. ह्यामुळें त्यांत महान् गुण आढळत नाहींत. त्याचा एकच गुण चटकन् डोळ्यांत भरतो आणि तो म्हणजे त्याचा साधेपणा.

सुमारें १७० फूट उंच असलेलें हें मंदिर कला-कुसरीच्या बाबतींत इतकें साधें आहे कीं त्याचा साधेपणाही दोष वाटावा.

भगवी छाटी घातलेली बुद्धमूर्ति

मंदिराच्या विशाल गाभाऱ्यांत प्रवेश करितांच पूर्वेस तोंड असलेली, गळ्यांत भगवी छाटी अडकविलेली, भूमिस्पर्शमुद्रेंतील भगवान् बुद्धाची सुबक, रेखींव व भव्य मूर्ति दृष्टीस पडली. आम्ही गेलों होतों त्या वेळीं हें मंदिर हिंदु पुजाऱ्यांच्या ताब्यांत होतें. ह्यामुळें बुद्धाच्या मूर्तीला कपडे पेहरवून आणि गंध लावून ते त्याला हिंदु बनवीत असत आणि त्याच्या समोरच महादेवाची पिंडी स्थापून तिच्यावर अभिषेकही करीत. ह्याला आळा घालणें इंग्रजी अमदानींत शक्य नव्हतें. परंतु आतां तें देऊळ बौद्धांकडे देण्यांत आल्यामुळें बुद्धाच्या मूर्तीची पूजा बौद्ध पद्धतीनें होऊं लागली आहे.

मूर्तीचें दर्शन घेऊन बाजूच्या जिन्यानें वर चढून गेलें कीं गौतमबुद्धाच्या पूर्वजन्मांपैकीं दोन बोधिसत्त्वांचें दर्शन घडतें. त्यांनाही भगव्या कफन्या घालून त्यांची 'शुद्धि' करण्यांत आली होती. मंदिराच्या गच्चीवरून खालील परिसराची शोभा फार छान दिसते. मंदिराला प्रदक्षिणा घालीत मागच्या बाजूस गेलें, कीं त्या ठिकाणीं बोधिवृक्ष नांवाचें एक लहानसें पिंपळाचें झाड आहे व त्याच्या खालींच वज्रासन नांवाची एक मोठी शिळा आहे. हें वज्रासन ७$\frac{१}{२}$ फूट लांब, ५$\frac{५}{६}$ फूट रुंद व ३ फूट उंच आहे. मंदिर आणि बोधिवृक्ष यांच्या मधोमध हें वज्रासन आहे. ह्या झाडाखालीं व ह्या शिळेवर बसून भगवान् गौतम बुद्धांनीं साधना केली व येथेंच त्यांना वैशाखी पौर्णिमेस ज्ञानप्राप्ति झाली असें समजलें जातें. ह्या भागाला त्या काळीं उरुवेला असें नांव होतें. अर्थात् ह्या शिळेवर बसून सिद्धार्थाला ज्ञान झालें असण्याची शक्यता आहे; परंतु ज्या वृक्षाखालीं तो बसला होता, तो वृक्ष मात्र कधींच नाश पावला आहे. खुद्द अशोकानेंच बौद्ध धर्म स्वीकारण्यापूर्वीं त्या वृक्षाचा नाश केल्याचें इतिहास सांगतो, तर कांहीं लोकांच्या मतें अशोकाच्या पट्टराणीनें हें झाड तोडून टाकिलें होतें व अशोकानें त्याचें पुनरुज्जीवन केलें होतें.

त्यानंतरही अनेक हिंदु राजांच्या रोषाला बळी पडण्याचें ह्या वृक्षाच्या नशिबीं लिहिलें होतें. अखेर जेव्हां इंग्रज सरकारनें १८७० सालीं ह्या मंदिराचा जीर्णोद्धार केला, तेव्हां येथें पिंपळाचें झाड नव्हतें म्हणून जें झाड लावण्यांत आलें तेंच सध्यां अस्तित्वांत आहे. मूळ झाडाची एक फांदी सम्राट् अशोकाची कन्या संघमित्रा हिनें पूर्वी सिलोनमध्यें नेली होती. ती अनुराधापुर येथें आज दोन हजार वर्षांनंतरही जिवंत आहे असें म्हणतात.

ह्या मुख्य मंदिरापासून जवळच तिबेटी लोकांचें एक बौद्ध मंदिर आहे. त्या मंदिरासमोर ब्रह्मी, चिनी, तिबेटी, वगैरे बौद्धधर्मीय देशांच्या धार्मिक पताका फडक्त होत्या. आपल्याकडे 'रामनाम' छापलेलीं धोतरें व उपरणीं असतात, तश्या त्या पताका दिसत होत्या. तिबेटी मंदिर माडीवर आहे. आम्ही तेथें गेलों तेव्हां बारीक डोळ्यांचे, चपट्या चेहऱ्यांचे व तांबूस वर्णाचे तिबेटी लोक समोर काव्यासारखा काळा-मिट्ट चहा ठेवून अधून-मधून त्याचे घुटके घेत-घेत वेदपठण केल्याप्रमाणें कांहीं मंत्र जपत होते. मधमाश्यांच्या गुंजारवासारखा त्यांचा आवाज कानांना सुखवीत होता. त्यांना पाहून मला आपल्याकडील जुन्या संस्कृत पाठशाळांची आठवण झाली. त्या ठिकाणीं गौतम बुद्धांची एक नवीन झोंकदार कापडी मूर्ति तयार केली जात होती. तिच्यावरील रंग भयंकर भडक होते, परंतु ते डोळ्यांना खुपत नव्हते. तिबेटी साधु ती मूर्ति रंगविण्यांत दंग झालेले होते. मूर्तीसमोरील व आस-पासची आरास तिबेटी पद्धतीची आहे. मूर्तीच्या समोर एका भल्या मोठ्या हौदांत तूप भरून ठेविलेलें होतें व त्या तुपांत मोठ्या फुलवातीसारखा दिवा अखंड तेवत होता. मंदिराच्या दारावर अशुद्ध व बेढब अक्षरांत संगमरवरी दगडांत कोरिलेली पुढील पाटी आहे :

तिब्बीतियन महायाना
बुद्धीस्ट मंदिर बुद्धा गया
स्थापित १९४५

तिबेटी लोकांनीं नागरी अक्षरांत लिहिलेली पाटी ह्या दृष्टीनें ह्या पाटीचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. परंतु हें कोरींव काम करण्यापूर्वी भाषेचें

शुद्धलेखन व अक्षरांचें वळण या बाबतींत त्यांनीं स्थानिक हिंदी-भाषिकांचा सल्ला घेतला असता, तर अधिक बरें झालें असतें हा विचार मनांत आल्यावांचून राहिला नाहीं.

गयेंतील विष्णुपद

तिबेटी मंदिर पाहून आम्ही जवळच असलेल्या ' महाबोधि सोसायटी 'च्या पुस्तक-भांडारांत गेलों आणि तेथें कांहीं पुस्तकें व चित्रें खरेदी करून परतलों. परत येतांना आम्हांला टमटम मिळाली नाहीं, ह्यामुळें सायकल-रिक्षा करावा लागला. समोरचें उलटें वारें सुरू झालेलें असल्यामुळें रिक्षावाल्याला खूपच त्रास होत होता. तो न बघवल्यामुळें आम्ही थोडा वेळ पायीं चाललों आणि बऱ्याच वेळानें स्वस्थानीं पोहोंचलों. रात्रीच्या गाडीनें पुढें रांचीस जावयाचें असल्यामुळें गयेंतील मुख्य ठिकाण जें विष्णुपदाचें मंदिर तें पाहून घेण्याचें आम्हीं ठरविलें आणि लगलींच बाहेर पडलों. आमच्या बरोबर गयेंतील एक कॉंग्रेस पुढारी व बिहारच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद श्री. कुमार झा हे होते. ते गयेचेच असल्यामुळें त्यांना सर्व पंडे लोक ओळखीत होते, ह्यामुळें आम्हांला पंड्यांचा मुळींच त्रास झाला नाहीं आणि निर्वेधपणें व झटझट सर्व पाहून घेतां आलें.

गयासुराची कथा मोठी हृदयद्रावक आणि देवांच्या आसुरी वृत्तीवर प्रकाश टाकणारी आहे. वस्तुतः हा गयासुर बळिराजाप्रमाणें अत्यंत भगवद्भक्त व पापभीरु होता; परंतु त्याच्या तपस्तेजाला घाबरून देवांनीं त्याचा नाश करण्याचा चंग बांधला आणि त्यासाठीं जंग-जंग पछाडले. त्यांनीं त्याच्याकडून यज्ञासाठीं त्याचें शरीर मागून घेतलें आणि त्यावर मोठा यज्ञ केला व त्याचें शरीर सरोवरांत टाकून दिलें. परंतु अशा प्रकारें त्याला मारून टाकल्यानंतरही त्याचें मस्तक हलूं लागलें, तेव्हां देवांनीं स्वर्गांतील देवरूपिणी धर्मशिला त्याच्या डोक्यावर आणून टाकली. तरीही गयासुर निश्चळ झाला नाहीं. अखेर स्वतः विष्णु, गायत्री, सावित्री, सरस्वती, लक्ष्मी, सीता, यक्ष, गंधर्व, इंद्र, बृहस्पति, वगैरे सर्व देव-देवता त्या शिळेवर येऊन उभ्या राहिल्या. तेव्हां गयासुरानें त्यांच्याकडून असा वर मागून घेतला, कीं

" आतां तुम्ही येथून हलूं नका. ह्या ठिकाणीं जे कोणी स्नान आणि पूर्वजांचं तर्पण करितील, त्यांच्या हजार पिढ्यांचा उद्धार होईल असा वर मला द्या. " त्याप्रमाणें देवांनीं त्याला तसा वर दिला. तेव्हांपासून पूर्वजांना मुक्ति मिळवून देण्याचें स्थान म्हणून गयेला प्रसिद्धि लाभली.

ह्या ठिकाणीं येतांना श्रीविष्णु आपल्याबरोबर आपली गदा घेऊन आले होते, म्हणून ह्या मंदिराला गदाधराचें मंदिर असें म्हणतात. फल्गु नदीच्या कांठावर अगदीं उंच जागीं हें देऊळ आहे. ह्यामुळें येथून नदीची शोभा छान दिसते. आम्ही गेलों त्या वेळीं देऊळ धुण्याचा कार्यक्रम चालला होता. त्यामुळें काशी-विश्वेश्वराच्या देवळापेक्षां हें देऊळ कमी गलिच्छ आहे असा आमचा समज झाला. तो खरा कीं खोटा, गदाधर जाणे! सर्वांत उंच ठिकाणीं धर्मशिला आहे. तिच्यावर एक भलें मोठें पाऊल आहे. श्रीविष्णु प्रथम येथें अवतरले त्या वेळीं त्यांच्या पावलाचा जो ठसा उमटला, तेंच हें पाऊल. ह्यालाच विष्णुपद असें म्हणतात. ह्या विष्णुपदावर लोक पिंड ठेवितात आणि गायी येऊन ते पिंड खाऊन जातात. हा कार्यक्रम दिवसभर चाललेला असतो. ती गंमत थोडा वेळ पाहून आम्हीं मंदिराला रामराम ठोकला आणि बाजारांत गेलों. ह्या ठिकाणीं तिलकूट नांवाची एक उत्कृष्ट मिठाई मिळते. तीळ व गूळ किंवा साखर एके ठिकाणीं कुटून ही बनविली जाते. थंडीच्या दिवसांत ही पौष्टिक व रुचकर मिठाई सर्वजण आवडीनें खात असतात. राजगिऱ्यासारख्या खोबी नांवाच्या एका तृणधान्याची मिठाईही येथें मिळते. ही पचावयाला अत्यंत हलकी व उन्हाळ्यांत थंड असते. ह्यामुळें आम्हीं थोडेंसें तिलकूट व बरीचशी खोबी खरेदी केली आणि घरीं परतलों. गया शहराची रचना इतर तीर्थक्षेत्रांप्रमाणेंच दाट, कोंदट व आरोग्याला विघातक आहे. परंतु कांहीं-कांहीं रस्ते चांगलेच रुंद दिसले. रात्रीं एका मारवाडी मित्राकडे मिष्टान्न-भोजन करून आम्हीं गयासुराच्या ह्या राजधानीचा घाई-घाईनें निरोप घेतला.

पुनः एकदां बोधगया

वैशाखी पौर्णिमेची महान् घटना

बौद्ध धर्मामध्यें वैशाखी पौर्णिमेस फार महत्त्व आहे. ज्या धर्मानें व तत्त्वज्ञानानें एके काळीं सारें आशिया खंड व्यापिलें होतें व आजही चीन, जपान, ब्रह्मदेश व सिलोन या देशांतील जनतेच्या अंतःकरणांत प्रेमादराचें स्थान मिळविलेलें आहे, त्या धर्माचें व तत्त्वज्ञानाचें ज्ञान (बोधि) शाक्यसिंह सिद्धार्थ ऊर्फ गौतम ह्यांना वैशाखी पौर्णिमेस प्राप्त झालें. म्हणून ह्या दिवसाला बोधिजयंती असें म्हणण्यांत येतें. ह्या महान् घटनेची स्मृति म्हणून दर वैशाखी पौर्णिमेस बौद्धधर्मीय लोक मोठा उत्सव करितात आणि तत्त्वचिंतनामध्यें तो दिवस घालवितात. ज्या ठिकाणीं भगवान् गौतमांना हें ज्ञान (बोधि) प्राप्त होऊन बुद्ध (ज्ञानी) ही संज्ञा त्यांना प्राप्त झाली, तें बुद्धगयेचें स्थान बौद्ध धर्मामध्यें अत्यंत पवित्र क्षेत्र मानिलें जातें. ही बुद्धगया अथवा बोधगया बिहारमधील सुप्रसिद्ध गया स्टेशनपासून सात मैल दूर फल्गु नदीच्या कांठीं आहे. तेथपर्यंत जाण्यास उत्तम डांबरी सडक असून अगदीं अल्प भाड्यांत जाणारी बस, रिक्शा (सायकल रिक्शा), टांगा, वगैरे वाहनें तेथें मिळतात. बौद्धांप्रमाणेंच हिंदूही ह्या स्थानाला पवित्र मानितात आणि येथें पिंडदान, वगैरे करितात.

वैशाखी पौर्णिमेस बुद्धजयंती असेंही म्हणण्यांत येतें. ह्याच दिवशीं बुद्धचरित्राशीं संबंध असलेल्या ज्या अनेक गोष्टींचा जन्म झाला, त्यांत बुद्धगयेंतील सुप्रसिद्ध पिंपळाचें झाडही होतें. ह्या झाडाखालीं बसून गौतमाला 'बोधि' (ज्ञान) प्राप्त झाली, म्हणून ह्या झाडाला 'बोधिवृक्ष' असें म्हणतात. ह्या बोधिवृक्षामुळेंच ह्या स्थानाला इतकें महत्त्व प्राप्त झालेलें आहे. वस्तुतः सारा

बिहार प्रदेश म्हणजे बुद्ध व महावीर यांच्या धर्मचक्रप्रवर्तनाची कर्मभूमि आहे. येथें ठिक-ठिकाणीं बुद्ध व महावीर यांच्या निवासस्थानाचीं ऐतिहासिक चिन्हें आढळतात. परंतु बुद्धगयेपासून कोट्यवधि लोकांच्या मनाला व आत्म्याला समाधान मिळवून देणाऱ्या ज्ञानाची ज्योत उजळल्यामुळें आजही हें स्थान अत्यंत पवित्र मानिलें जातें.

२८ मे, १९५३ रोजीं –म्हणजे गौतमाला बोधिप्राप्ति झाल्याच्या २४७९ व्या जयंतीच्या दिवशीं– एक अत्यंत महत्त्वाची घटना भारतांत घडली आणि तिच्या योगें बौद्ध जगतामध्यें भारताचें नांव अधिक उज्ज्वल झालें. ती घटना अशी कीं ह्या दिवशीं भारत सरकारनें १९४९च्या बुद्धगया मंदिराच्या खास कायद्यानुसार एका मोठ्या सरकारी अधिकाऱ्याच्या अध्यक्षपदाखालीं नेमिलेल्या चार हिंदु व चार बौद्ध लोकांच्या एका समितीकडे हें बुद्धगयेचें इतिहासप्रसिद्ध मंदिर सोंपविलें. आणि अशा प्रकारें गेलीं कित्येक शतकें चालत आलेल्या अन्यायाचें परिमार्जन केलें. त्या सुमारास आपण इंग्लंडच्या राणीच्या राज्यारोहणांत इतके धुंद होऊन गेलों होतों कीं प्रत्यक्ष आपल्या देशांत घडणाऱ्या ह्या महान् ऐतिहासिक घटनेकडे आपल्यापैकीं कोणाचेंच लक्ष्य गेलें नाहीं; मग तिचें महत्त्व कळणें तर दूरच राहिलें.

बोधगयेजवळ सम्राट् अशोकानें सुमारें २२०० वर्षांपूर्वी एक मंदिर बांधिलें होतें. ५०० वर्षांनंतर तें मंदिर पुनः बांधण्यांत आलें. इतिहास-तज्ज्ञांच्या मतें सध्यां बोध-गयेमध्यें जें बुद्धमंदिर आहे, तें हें १७०० वर्षांपूर्वी पुनः बांधिलेलें मंदिर होय. कांहीं शतकांपूर्वीं चिनी प्रवासी ह्युएनत्संग ह्या देशांत आला होता, त्या वेळीं त्यानें ह्या मंदिराचें जें वर्णन लिहून ठेविलें आहे, तें सध्यांच्या मंदिराशीं तंतोतंत जुळणारेंच असल्यामुळें ह्या विधानास पाठिंबा मिळतो.

हिंदु महंताचा कबजा

तेव्हांपासून ह्या ठिकाणीं देशांतून व परदेशांतून बौद्धधर्मानुयायी नेहमीं येत असत व कांहीं भिक्षू येथें निवासही करीत. परंतु ह्या भागांत मुसुलमानांचें राज्य स्थापन झाल्यानंतर बौद्ध लोक निघून गेले. पुढें सुमारें तीन-चारशें वर्षेंपर्यंत ह्या

मंदिराकडे कोणीं लक्ष्य दिलें नाहीं. त्याच्याभोंवतीं जंगल वाढलें आणि त्या जंगलामध्यें तें लुप्त झालें. त्यानंतर सुमारें चारशें वर्षांपूर्वी एक संन्यासी तेथें गेला आणि त्यानें तेथील जंगल साफ-सूफ करून तेथें बोधगया मठाची स्थापना केली व तो तेथें राहूं लागला. हळू-हळू त्या मठाच्या अध्यक्षानें –महंतानें– मंदिराच्या आस-पासची पुष्कळशी जमीन-जायदाद बळकाविली आणि मंदिरावरही कब्जा केला.

इंग्रज लेखकानें प्रथम लक्ष्य वेधिलें

पुढें-पुढें त्या मंदिरावरील आपली पकड घट्ट करण्यासाठीं तेथील बुद्धमूर्तीला संपूर्ण हिंदु मूर्ति बनविण्याचा प्रयत्न महंतानें सुरू केला. मीं कांहीं दिवसांपूर्वी तेथें जाऊन हें मंदिर पाहून आलों. त्या वेळीं गौतम बुद्धाच्या सुंदर मूर्तीच्या गळ्यांत भगवी कफनी अडकविलेली होती, त्याच्या कपाळावर गंधाचा टिळा लाविला होता आणि हिंदु पद्धतीनें त्याची षोडशोपचारयुक्त पूजा करण्यांत आलेली होती. ह्यामुळें त्या मूर्तीचें खरें सौंदर्य जवळ-जवळ नाहींसें झालें होतें. शिवाय इतर हिंदु मंदिरांतून आढळणारी अव्यवस्था व गलिच्छपणाही तेथें दिसत होता. बौद्धधर्मीय लोक बुद्धाच्या मूर्तीसमोर बसून त्याचें ध्यान करीत असतात, तीच त्यांची उपासना. परंतु त्या देवळाची स्थिति अशी कीं कोणालाही शांतपणें पांच मिनिटेंही बसवणार नाहीं. शिवाय ध्यान करण्यापूर्वी बौद्धधर्मीयांना मूर्तीच्या गळ्यांतील कफनी आणि कपाळाला लाविलेलें गंध, वगैरे काढून टाकून तिला नैसर्गिक अवस्था प्राप्त करून द्यावी लागे. ह्यामुळें बौद्ध लोक अत्यंत बेजार होऊन गेले होते. शिवाय तेथें ऐतिहासिक दृष्ट्या अनेक महत्त्वाचीं शिल्पें व भग्नावशेष पडलेले होते, त्यांकडे कोणाचेंच लक्ष्य नव्हतें.

ह्या खेदजनक परिस्थितीकडे ' दि लाईट ऑफ़ एशिया ' ह्या काव्याचे सुप्रसिद्ध इंग्रज लेखक सर एडविन् आर्नोल्ड् ह्यांनीं १८८५ सालीं त्या वेळच्या भारत सरकारचें लक्ष्य वेधण्याचा प्रयत्न केला. परंतु सरकारनें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. पुढें सर एडविन् ह्यांनीं ब्रिटिश वर्तमानपत्रांत अनेक लेख ह्यासंबंधीं लिहिले. त्यांचा परिणाम होऊन १८९१ सालीं 'महाबोधि सोसायटी' स्थापन करण्यांत

आली. बुद्धगयेच्या पवित्र तीर्थस्थानाचा पुनरुद्धार करणें हें ह्या सोसायटीचें मुख्य ध्येय होतें. सुप्रसिद्ध सिलोनी बौद्ध भिक्षु श्री.अनगारिक धर्मपाल हे ह्या संस्थेचे आधारतंभ होते. ह्या मंदिराची व्यवस्था बौद्धधर्मीय लोकांच्या ताब्यांत आल्याशिवाय त्याचा पुनरुद्धार होणें शक्य नाहीं, ही गोष्ट श्री. अनगारिक धर्मपाल ह्यांनीं बौद्ध व हिंदु लोकांना पटवून देण्याचा अहर्निश प्रयत्न केला. हा प्रश्न न्यायालयांतही नेण्यांत आला. परंतु मालकी हक्काच्या रूढ कायद्यामुळें त्यांत मठाच्या महंताचाच जय झाला. तरीही श्री. धर्मपाल ह्यांनीं आपली खटपट चालूच ठेविली.

स्वतंत्र भारतानें कायदा केला

गया काँग्रेसच्या वेळीं झालेल्या ठरावाप्रमाणें डॉ. राजेन्द्रप्रसाद ह्यांनीं ह्या बाबतींत चौकशी करून हा प्रश्न मिटविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्यांना अपयश आलें. त्या वेळीं गांधीजी असें म्हणाले होते, कीं " भारत स्वतंत्र झाला म्हणजे एका क्षणांत हा प्रश्न निकालांत काढितां येईल." त्यांचें हें म्हणणें आज खरें ठरलें आहे –फरक एवढाच कीं त्यांचा एक क्षण सहा वर्षांचा ठरला.

अशा प्रकारें सर्व अडचणींचें निवारण होऊन २८ मे, १९५३ रोजीं ह्या कायद्यानुसार नेमण्यांत आलेल्या समितीकडे ह्या मंदिराची व्यवस्था आली. त्या वेळीं बुद्धगया मंदिराचे अध्यक्ष महंत हरिहर गिरी ह्यांनीं असें जाहीर केलें, कीं " पांच पांडवांचें मंदिर, हवनकुंड आणि धर्मशाळा एवढी व्यवस्था मीं नवीन व्यवस्थापक समितीकडे सोंपवीत आहें. हें मंदिर साऱ्या जगाच्या आदरास पात्र आहे. नव्या व्यवस्थेखालीं त्याची भरभराट होईल. त्यायोगें हिंदु व बौद्ध लोकांमध्यें समजूतदारपणा व सहानुभूति यांचें नवीन युग निर्माण होईल व भगवान् बुद्धाच्या व इतर महापुरुषांच्या पवित्र स्मृतीचें तें एक केंद्र बनेल, अशी मीं अंतःकरणापासून आशा करितों."

ज्या बुद्ध मंदिराच्या प्राप्तीसाठीं गेलीं आठ वर्षें श्री. अनगारिक धर्मपाल आणि 'महाबोधि सोसायटी' ह्यांनीं खटपट चालविली होती, तें हें मंदिर उत्तर-भारतांतील एक अत्यंत सुंदर मंदिर आहे. कित्येक शतकें तें जंगलांत दडून पडलें होतें. त्याच्या

सभोंवतालची जमीन खूप उंच (सुमारें पंधरा फूट) आहे. ह्यामुळें हें मंदिर एखाद्या मोठ्या खड्ड्यांत असल्यासारखें भासतें. पावसाळ्यामध्यें शेजारून वाहणाऱ्या निरंजरा नदीचें पाणी देवळांत शिरूं नये, म्हणून मंदिराभोंवतीं हा बांध जाणून-बुजून घालण्यांत आला होता असें म्हणतात. ह्या मंदिराची उंची १७० फूट आहे. देवळाच्या गाभाऱ्यांत भूमिस्पर्शमुद्रेमध्यें मांडी घालून बसलेल्या गौतम बुद्धाची सुंदर मूर्ति आहे. मंदिराच्या वर जाण्यास पायऱ्या असून वरच्या बाजूस दोन कोंपऱ्यांत बोधिसत्त्वाच्या दोन सुबक मूर्ती आहेत. आम्ही तेथें गेलों त्या वेळीं ह्या मूर्तींनाही भगव्या कफन्या घालून हिंदु बनविण्यांत आलेलें होतें आणि तेथील पुजारी त्यांच्यासंबंधीं कांहीं काल्पनिक दंतकथाही सांगत होता. मंदिरावरून आजू-बाजूचें दृश्य फार मनोरम दिसतें. मंदिराच्या सभोंवतीं भक्कम फरसबंदी असून मंदिराच्या बाहेरील भिंतीच्या कोनाड्यांतून लहान-लहान बुद्धमूर्ती आहेत. मंदिरांतील मूर्तीचें तोंड पूर्वेस आहे. ज्या वेळीं भगवान् बुद्ध ज्ञानप्राप्तीच्या तपस्येसाठीं बसले होते, त्या वेळी ते अगदीं ह्याच अवस्थेंत होते असें म्हणतात.

ज्या पिंपळाच्या झाडाखालीं बसून शाक्यसिंह गौतमानें तपश्चर्या केली व बोधि (ज्ञान) प्राप्त करून घेतली, त्याला बोधिवृक्ष असें म्हणतात. आजही ह्या ठिकाणीं तो बोधिवृक्ष दाखविण्यांत येतो. परंतु तो मूळचा बोधिवृक्ष नसून १८७० सालीं कनिंगहॅमनें येथील डागडुजी सुरू केली असतां मूळचा जुना वृक्ष उन्मळून पडल्यामुळें त्यानें नवीन लाविलेलें तें झाड आहे. हें झाड मंदिराच्या पश्चिमेस असून तें सुमारें १०० फूट उंच आहे.

भारत हा जसा धार्मिक सहिष्णुतेबद्दल प्रसिद्ध आहे, तसाच धार्मिक माथेफिरूपणाबद्दलही कांहीं कमी प्रसिद्ध नाहीं. बौद्ध, जैन, हिंदु (अर्थात् वैदिक), मुसुल्मान, आर्य, अनार्य यांच्या हाणा-माऱ्यांचीं व खुनशीपणाचीं अनेक उदाहरणें आपल्या इतिहासांत आहेत. ह्या बोधिवृक्षाच्या नशिबींही पहिल्यापासून लोकांच्या रोषाला बळी पडण्याचें लिहिलेलें दिसतें. फाहियान ह्यानें आपल्या प्रवासवर्णनांत असें लिहिलें आहे, कीं "सम्राट् अशोक आपल्या पूर्वायुष्यांतील पापांच्या प्रायश्चित्तासाठीं व चित्तशुद्धीसाठीं नेहमीं

बोधिवृक्षाच्या दर्शनाला जात असे. त्याच्या राणीला जेव्हां हें कळलें, तेव्हां ती अत्यंत क्रुद्ध झाली आणि अशोकाच्या गैरहजेरींत तिनें तें झाड आपल्या नोकरांकडून तोडवून टाकिलें. राजानें जेव्हां हें दृश्य पाहिलें, तेव्हां त्याच्या मनावर इतका परिणाम झाला, कीं तो त्याच ठिकाणीं बेशुद्ध होऊन खालीं पडला. पुढें तो शुद्धीवर आल्यानंतर त्यानें त्या झाडाच्या बुंध्याभोवतीं विटांचा पार बांधविला आणि त्याच्या मुळाशीं शेकडों घागरी गायींचें दूध घालण्याची व्यवस्था केली. तो जमिनीवर पडून राहिला आणि झाडाला अंकुर फुटेपर्यंत न उठण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. त्यानें प्रतिज्ञा करतांच त्या झाडाच्या बुंध्यांतून अंकुर फुटूं लागले. तेव्हांपासून आजपर्यंत तें झाड निदान दहा 'चांग' तरी उंच वाढलें आहे."

कांहीं ठिकाणीं असें लिहिलेलें आढळतें, कीं स्वतः अशोकानेंच बौद्धधर्माची दीक्षा घेण्यापूर्वीं हें झाड तोडून टाकलें होतें. परंतु तें मेलें नाहीं. पुढें त्यानें बौद्धधर्म स्वीकारल्यानंतर त्याची कन्या संघमित्रा हिनें मूळ बोधिवृक्षाची एक फांदी सिलोनमधील अनुराधापुर ह्या ठिकाणीं नेऊन लावली. आज दोन हजार वर्षांनंतरही त्या ठिकाणीं ती फांदी भल्या मोठ्या वृक्षाच्या रूपानें उत्तम स्थितींत आहे.

बंगालचा हिंदु राजा शशांक ह्यानेंही हा बोधिवृक्ष तोडून टाकला होता. परंतु त्या वेळींही त्याचा नाश होऊं शकला नाहीं. कारण त्याच्या मुळांतून पुनः नवीन वृक्ष जन्मास आला.

बुद्धमंदिर आणि बोधिवृक्ष ह्यांच्या दरम्यान बोधिवृक्षाखालीं ७ फूट ५ इंच लांब, ४ फूट १० इंच रुंद आणि ३ फूट उंच अशी एक काळी शिळा आहे. ह्या शिळेवर बसून भगवान् गौतमांनीं तपश्चर्या केली व त्यांना ज्ञान लाभलें, असें समजलें जातें. ह्यामुळें ती शिळा व तें स्थान सर्वांत अधिक पवित्र समजलें जातें. ही शिळा म्हणजे सुप्रसिद्ध वज्रासन होय. जवळच असलेल्या महंताच्या समाधीजवळ एक गोल दगड आहे. हा दगड मूळ वज्रासनाचाच एक भाग आहे, असें समजलें जातें. मंदिराच्या डागडुजीच्या वेळीं महंतानें तो तेथून हलवला असें म्हणतात.

ह्या वज्रासनावर बसून तपस्या करीत असतां 'मारा' नें (ऊर्फ सैतानानें) त्या आसनावर आपला हक्क सांगून सिद्धार्थाशीं भांडण आरंभिलें. परंतु आपण जन्मो-जन्मीं केलेल्या सत्कृत्यांमुळें आपल्याला तें आसन प्राप्त झालेलें आहे, म्हणून आपण तें मुळींच सोडणार नाहीं, असें गौतमानें माराला निक्षून सांगितलें. त्यावर मारानें त्याला आपलें म्हणणें खरें आहे हें सिद्ध करण्याचें आव्हान देऊन साक्षीदार आणण्यास सांगितलें. परंतु त्या वेळीं गौतमाला कोण साक्षीदार मिळणार ? म्हणून तो जमिनीकडे बोट दाखवून म्हणाला. " ही भूमिच माझा साक्षीदार ! " त्याबरोबर एक भयंकर भूकंप झाला आणि मार पराभूत होऊन पळून गेला. मनुष्याच्या हृदयांतील वासना, कुप्रवृत्ति आणि चांगल्या गोष्टींच्या विनाशासाठीं खटपट करण्याची दुष्टबुद्धि ह्या सर्वांचें प्रतीक म्हणून 'मार' ह्या काल्पनिक पात्राचा उल्लेख बौद्ध वाङ्मयांत आढळतो. अशा प्रकारें सर्व वासनांवर विजय मिळवल्या-नंतरच बुद्धास ज्ञान (बोधि) प्राप्त झालें. ह्या मंदिरांतील बुद्धाची मूर्ति बसलेली असून तिनें आपलें बोट भूमीकडे केलेलें आहे. त्या मूर्तीजवळच अनगारिक धर्मपाल ह्यांनीं जपानहून आणलेली बुद्धाची चंदनाच्या लाकडाची एक सुंदर मूर्ति आहे.

राजगृहांतील अर्धा दिवस

राजगृह, नालंदा व पावापुरी

'रात्र थोडी आणि सोंगें फार' अशी माझी स्थिति झाली होती. 'सर्वोदय समाजा'च्या कामानिमित्त मला बिहारला जावें लागलें, तेव्हां तेथें पाहाण्यासारखीं स्थळें कोणतीं आहेत ह्याची चौकशी करतां राजगृह, नालंदा व पावापुरी ह्यांचीं नांवें मला सांगण्यांत आलीं. पैकीं पहिलीं दोन नांवें तर शाळेंत शिकत असतां

इतिहास-वाचनांत येऊन गेलेलींच होतीं. ह्यामुळें प्रथम त्या दोन स्थळांना भेट द्यावी आणि वेळ उरल्यास पावापुरी पाहून घ्यावी, असें मीं ठरविलें. माझ्याजवळ दोनच दिवस शिल्लक होते.

पोंचण्यास विलंब

वस्तुतः नीट योजना ठरवून ह्या स्थळांना भेटी दिल्या, तर दोन दिवसांत व्यवस्थितपणें सर्व कांहीं पाहातां येतें. परंतु ज्यांच्या सल्ल्यावर अवलंबून मीं कार्यक्रम ठरविला, त्यांनाच नीट माहिती नव्हती. ह्यामुळें पाटण्यापासून ६६ मैल अंतरावर असलेल्या राजगीर गांवीं पोंचण्यास मला ९ तास लागले. सकाळीं १० वाजतां मी घरांतून बाहेर पडलों होतों, तो सायंकाळीं ७ वाजतां राजगीरला पोंचलों.

'राजगृहा' चें लोपलेलें वैभव

येथें तुम्हीं 'राजगृह' हा संस्कृत शब्द उच्चारलात, तर त्यापासून फारच थोड्या लोकांना बोध होईल. कारण सर्व लोक ह्या गांवाला 'राजगीर' असेंच म्हणतात. आणि 'बख्तियारपुर बिहार लाईट रेल्वे' ही (B. B. L. R.) तुम्हांला राजगीरकुंड ह्या नांवाचेंच तिकीट देईल. आणि त्यांत चूक तरी काय आहे ? राजगृहाचें कोणतें वैभव तेथें आतां शिल्लक उरलें आहे ? बुद्ध, महावीर, बिंबिसार, अजातशत्रु ह्या महान् पूर्वजांचें नांव उच्चारावें अशी कोणती पुण्याई आज ह्या अदृश्यप्राय नगरींत उरली आहे ? त्यापेक्षां ज्या कारणासाठीं, ज्या गरम पाण्याच्या कुंडासाठीं लोक आणि विशेषतः रोगी ह्या ठिकाणीं येतात, त्या कुंडाशींच ह्या स्टेशनाचें नांव जोडणें अधिक प्रामाणिकपणाचें नव्हे काय ?

गल्ली-बोळांतून जाणारी आगगाडी

आम्ही पाटण्याहून दुपारीं साडेअकरा वाजतां 'स्टेट ट्रान्सपोर्ट' च्या बसनें निघून पन्नास मैल दूर असलेल्या बिहारशरीफ ह्या गांवीं अडीच वाजतां पोहोंचलों. घरीं व गाडींत सर्वजण अगदीं छातीवर हात ठेवून सांगत होते, कीं तुम्ही काळजी

कशाला करतां ? बिहारकडून (म्हणजे बिहारशरीफ गांवाहून) वाटेल तितक्या मोटारी, टांगे तुम्हांला घेऊन जाण्यास तयार असतील. परंतु प्रत्यक्ष जागेवर जाऊन चौकशी केली तेव्हां कळलें, कीं साडेचार वाजतां जाणारी रेल्वे हेंच ज्यास्तींत ज्यास्त लवकर जाणारें वाहन आहे. म्हणून त्याच गाडीनें आम्ही राजगीरला गेलों. ही रेल्वे आपल्याकडील ' बार्शी लाइट रेल्वे ' पेक्षांही रद्दी आहे. तिला फक्त दोन किंवा तीनच डबे असतात. सामान ठेवायला बर्थ नाहींत, कीं धोक्याच्या प्रसंगीं ओढण्याची सांखळी नाहीं. एखादी वस्तु खालीं पडली, तर तुम्ही खालीं उतरून ती खुशाल घेऊन परत येऊं शकतां. मुंबईच्या ट्रामगाड्यांपेक्षांही ह्या आगगाडीचा वेग कमी असतो. बिहारशरीफ ते राजगीर हें १५ मैल अंतर तोडण्यास ह्या गाडीनें दोन तास घेतले, ह्यावरून हिच्या वेगाची कल्पना येईल.. ह्यामुळें जरी ही गाडी वाटेंत लागणाऱ्या गांवांच्या गल्ली-बोळांतून जात असली, तरी मुलांना तिची अजिबात भीति वाटत नाहीं व एखादी गंमत असावी त्याप्रमाणें तीं धावत्या गाडीला शिवून जातात. कुंपण अथवा प्लॅटफॉर्म ह्यांची स्टेशनला जरूर असते, ही गोष्ट ह्या रेल्वेला मान्य नाहीं. ह्यामुळें तिकिटें तपासण्याचें काम गाडींतच केलें जातें. इतकें असून भाडें मात्र जबरदस्त, म्हणजे मैलास ८ पै प्रमाणें (इतर रेल्वेचें इन्टर क्लासचें) घेतलें जातें.

जपानी मंदिरांत मुक्काम

आम्ही राजगीरला पोंचलों, तेव्हां सूर्यास्त होऊन अंधाराचें साम्राज्य पसरूं लागलें होतें. महाराष्ट्रापासून आम्ही सुमारें हजार मैल दूर पूर्वेकडे होतों. ठरल्याप्रमाणें आम्ही तेथील स्टेशनपासून अर्धा मैल दूर असलेल्या जपानी बौद्ध मंदिरांत मुक्कामास पोंचलों.

स्वामी विश्वानंद

ह्या मंदिराचे बंगाली व्यवस्थापक स्वामी विश्वानंद हे मोठे आस्थेवाईक, प्रेमळ व आतिथ्यशील संन्यासी आहेत. त्यांच्या मुस्लिमविरोधी व जपानानुकूल हालचालींमुळें युद्धकाळीं इंग्रज सरकारनें त्यांना तुरुंगांत डांबून ठेवलें होतें.

तेथून सुटून आल्यापासून ते ह्या जपानी पद्धतीच्या मंदिराची व्यवस्था पाहात आहेत. हे गृहस्थ बौद्ध भिक्षु असले, तरी हिंदु धर्माचे कट्टे पुरस्कर्ते आहेत; कारण बौद्ध धर्म हा हिंदु धर्माचाच एक पोटविभाग आहे असें ते मानतात. स्वामी विवेकानंद व रामकृष्ण परमहंस ह्यांचे ते परम भक्त आहेत. हिंदुमहासभेचे बॅ. वि. दा. सावरकर ह्यांच्याशीं त्यांची फार जुनी मैत्री आहे. ज्या वेळीं सावरकर अंदमानमध्यें शिक्षा भोगीत होते, तेव्हां स्वामी विश्वानंद सरकारी पी. डब्ल्यू. डी. मध्यें नोकरी करीत होते. त्या कामाच्या निमित्तानें ते अंदमानला गेले असतां तुरुंगामध्यें त्यांची सावरकरांशीं भेट झाली होती. त्यानंतरही त्यांची मैत्री अखंड राहिली. 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा' चे श्री. गोळवलकरगुरुजी व बंगाल-बिहारमधील कार्यकर्ते ह्यांच्याशींही त्यांचा परिचय आहे. ह्यामुळें महाराष्ट्रीय व्यक्तीबद्दल त्यांच्या मनांत एक आत्मीयतेची भावना निर्माण झाली आहे, असें माझ्याशीं त्यांनीं केलेल्या प्रेमळ वागणुकीवरून मला वाटलें.

महाराष्ट्रीयांविषयीं आदर

बागेंतील हिरवळीला जेव्हां ते पाणी घालूं लागले, तेव्हां मी त्यांना म्हणालों, "मला हें काम फार आवडतं. मला थोडा वेळ हें काम करूं देतां का?" त्यावर ते खूष होऊन म्हणाले, "छे: छे:! आज तुम्ही पाहुणे आहांत. तुम्हीं कांहींही काम करतां कामा नये. तुम्ही महाराष्ट्रीय लोक अत्यंत कामसू असतां, हें मला माहीत आहे. तुमच्यासारखे व्यवस्थित, टाप-टिपीचे नि कष्टाळू लोक मला अन्यत्र पाहावयास मिळाले नाहींत. तुम्हां लोकांच्या कर्तबगारीबद्दल माझ्या मनांत नितान्त आदर आहे."

ह्या स्तुतीला पात्र आहोंत काय?

त्यांच्या ह्या स्तुतीला आम्ही मराठे कितपत पात्र आहोंत, हें ज्याचें त्यानेंच ठरवावें. परंतु जगभर हिंडून आलेला एक परप्रांतीय बौद्ध भिक्षु आपल्या प्रांताबद्दल असे प्रशंसेचे उद्गार काढतो, ह्याचा मला अभिमान वाटला, हें कबूल केलें पाहिजे. अर्थात् ज्या पक्षाच्या व मताच्या महाराष्ट्रीय लोकांवरून

त्यांनीं हें मत बनविलें आहे, त्यांच्या जमातींतील मी नाहीं, हें त्यांना सांगणें, मला अप्रशस्त वाटलें.

ग्रामीण विद्यापीठाची योजना

त्यांच्या त्या जपानी मंदिराच्या आवारांत एक विद्यालय असून त्याची जबाबदारीही स्वामीजींवर आहे. ह्या विद्यालयांत केवळ पुस्तकी शिक्षण न देतां शरीरश्रम, हस्तव्यवसाय, कारागिरी, वगैरे जीवनोपयोगी शिक्षण दिलें जातें. ह्या विद्यालयाची व्याप्ति वाढवून त्या ठिकाणीं एक ग्रामीण विद्यापीठ स्थापन करण्याचा त्यांचा विचार आहे व त्यासाठीं शंभर-सव्वाशें एकर जमीन मिळविण्याच्या ते खटपटींत आहेत.

वास्तु आणि शिल्प

ज्या जपानी मंदिराचे ते व्यवस्थापक आहेत, तें मंदिर दुसऱ्या महायुद्धापूर्वी कांहीं जपानी मंडळींनीं बांधलें आहे. त्याची रचना जपानी पद्धतीनें करण्यांत आली आहे आणि आंतील मूर्ति व तिच्या समोरील आरास जपानी आहे. हंड्या-झुंबरांप्रमाणें लटकणारे दिवे, वगैरे सारें सामान वस्तुतः लाकडी आहे, परंतु त्यावर अश्या खुबीनें रंगीत कागद चिकटवले आहेत, कीं तें पितळेचें असल्याचा भास होतो. येथें एक लहानसा नगारा असून सकाळ-संध्याकाळ कांहीं मंत्र म्हणत तो वाजवणें हीच उपासना समजली जाते. बुद्धाच्या मूर्तीसमोरच विवेकानंद व रामकृष्ण ह्यांच्या लहान तसबिरी ठेवलेल्या आहेत.

सतधारा

राजगृहाची आधुनिक प्रसिद्धि, येथील गरम पाण्याचे झरे व कुंड ह्यांमुळें आहे. कांहीं वर्षांपूर्वी डॉक्टर जगदीशचन्द्र बसू ह्यांनीं ह्या पाण्यावर प्रयोग करून तें ' रेडिओॲक्टिव्ह ' असल्याचें सिद्ध केलें आहे. तेव्हांपासून ह्या स्थानाकडे लोकांची रीघ लागूं लागली आहे. स्वतः डॉक्टर बसू कित्येक वर्षें नियमानें येथें येऊन राहात असत.

आम्ही सकाळीं उठून सूर्योदयापूर्वींच त्या झऱ्यावर गेलों. जपानी मंदिरापासून ते झरे सुमारें तीन फर्लांगांवर असतील. थंड-गार वारें मंद-मंद वाहात होतें ह्यामुळें अंगावर गुलाबी कांटा उठत होता. अश्या वेळीं गरम पाण्याचें स्नान म्हणजे मोठी चैनच होती. ह्या झऱ्यांना 'सतधारा' असें नांव आहे. हा शब्द 'शतधारा' ह्या शब्दाचा अपभ्रंश असावा. कारण जरी प्रत्यक्षांत गोमुखांतून वाहाणारे दहा-बाराच झरे दिसत असले, तरी इतरत्र अनेक लहान-लहान झरे आढळतात. पुरुष व स्त्रिया ह्यांच्या स्नानाची वेग-वेगळी व्यवस्था असून, कपडे धुण्यासाठीं स्वतंत्र सोय आहे. ह्या झऱ्याचें पाणी इतकें कढत आहे, कीं गरम पाण्याची सवय नसलेल्याचें अंग भाजूनच निघावें. गोमुखांतून येणाऱ्या पाण्यानें प्रथम अंग धुवून घ्यायचें आणि मग खालच्या बाजूस असलेल्या केदारकुंडांत स्नान करायचें अशी पद्धत आहे. ह्या कुंडांमध्यें सुमारें छातीइतकें खोल पाणी आहे. तळाशीं वाळू असून खालून गरम पाण्याचे फवारे वर येत असतात. ह्यामुळें तळपाय भाजतील कीं काय असें वाटतें. ह्या पाण्यांत फार वेळ स्नान केल्यास अपाय होतो असें तेथील भटजींनीं सांगितल्यामुळें मनसोक्त डुंबण्याची इच्छा असूनही थोड्याच वेळांत बाहेर यावें लागलें. वर येऊन पुन्हा गोमुखांतून येणाऱ्या झऱ्यांच्या खालीं बसून अंग धुतलें आणि पुसून कपडे करूं लागलों, तेव्हां अंगांतून घाम निघूं लागला व सारें शरीर अगदीं हलकें वाटूं लागलें. प्रवासाचा सारा शीण नष्ट झाला आणि मन व शरीर ताजें-तवानें झालें.

प्राचीन राजधानीचें आरोग्यकेंद्रांत रूपान्तर

येथील झऱ्यांच्या व कुंडांच्या पाण्यांत स्नान केल्यानें सारे चर्मरोग, संधिवात, वगैरे आजार बरे होतात, अशी समजूत असल्यामुळें दूर-दूरहून लोक येथें येऊन राहातात व नियमानें स्नान करितात. ह्यामुळें एके काळीं महान् सम्राटाची राजधानी म्हणून प्रसिद्ध असलेलें हें स्थान आतां आरोग्यकेंद्र म्हणून प्रसिद्धीस येऊं लागलें आहे. ह्या झऱ्यांजवळ प्राचीन तपोदाराम (तपोवन) होतें आणि त्या ठिकाणीं भगवान् बुद्ध (इ. स. पू. ५६३ ते ४८३) नेहमीं येऊन राहात असत असा उल्लेख प्राचीन ग्रंथांतून आढळतो.

पांच टेकड्यांनीं वेढलेलें राजगृह

गरम झऱ्यावर स्नान करण्याचा मुख्य कार्यक्रम आटपल्यानंतर आम्ही जवळच्याच टेकडीवर चढलों आणि तेथून जुन्या राजगृहाची जागा पाहून घेतली. जुनें राजगृह पांच टेकड्यांच्या मध्यभागीं वसलेलें होतें. कांहीं लोकांच्या मतें टेकड्यांची संख्या पांच नसून सात आहे. सर्व टेकड्या एक-मेकींना जोडल्यासारख्या असल्यामुळें त्यांची संख्या निश्चित करणें सोपें नाहीं. 'महाभारता' मध्यें ह्या टेकड्यांचीं नांवें वैभार, वराह, वृषभ, ऋषिगिरि आणि चैत्यक अशीं दिलेलीं असून सध्या त्यांना वैभार, विपुल, रत्न, छट्ठा, शैल, उदय आणि सोना अशीं नांवें आहेत. सध्या ह्या ठिकाणीं जमिनीच्यावर कांहींही भग्नावशेष दिसत नाहींत. ओसाड जंगलच सर्वत्र पसरलेलें आहे. ह्यामुळें कधीं-काळीं ह्या ठिकाणीं महान् सम्राटाची राजधानी असेल अशी शंकाही येत नाहीं. स्वामी विश्वानंद मला म्हणत होते, "तुम्ही जर आजच्या दिवस इथें राहाल, तर इथून चार-पांच मैल अंतरावर भगवान् बुद्धांच्या ध्यानाची जागा आहे, ती मी तुम्हांला नेऊन दाखवीन. इतरही अनेक महत्त्वाचीं ठिकाणं आहेत. परंतु त्यासाठीं डोंगर-दऱ्या तुडवीत पुष्कळ चालावं लागेल." माझी इच्छा तर होती; परंतु मुलींच सवड नसल्यामुळें आम्हीं त्या स्थानाचें विहंगावलोकन करण्यावरच समाधान मानिलें.

राजगृहाचा पूर्वेतिहास

ह्या ठिकाणीं ब्रह्माचा चौथा पुत्र वसु ह्यानें प्रथम राजधानी वसविली. त्यानंतर बृहद्रथानें व त्याच्या वंशजांनीं येथें राज्य केलें. त्याच्याच वंशांत जरासंध होऊन गेला. इतिहासकालामध्यें सम्राट् बिंबिसारानें (इ. स. पू. ५४३ ते ४९१) ह्या ठिकाणीं राज्य केलें. त्याचा मुलगा अजातशत्रु (इ. स. पू. ४९१ ते ४५९) बापाला कैद करून व ठार मारून गादीवर बसला. त्यानें जुन्या राजगृहाच्या बाहेर एक नवें राजगृह वसवलें आणि त्याच्या भोवतीं एक प्रचंड तट उभारला. ह्या तटाची लांबी सुमारें ३ मैल असून रुंदी १५ ते १८ फूट व उंची ११ फूट होती. आजही ह्या तटाचे अवशेष ठिक-ठिकाणीं पाहावयास मिळतात. येथील

उत्खननामध्यें इ. स. पूर्वी दुसऱ्या शतकांतील प्राचीन वस्तु मिळाल्या आहेत. ह्यांतील कांहीं मूर्ति, वगैरे नालंदाच्या म्यूझियममध्यें ठेवलेल्या आहेत.

महाराष्ट्रीय बिहारी भटजी

येथील केदारकुंडामध्यें स्नान करीत असतां तेथील बिहारी पंड्यानें माझी चौकशी केली. मी महाराष्ट्रीय आहें असें कळतांच तो मला म्हणाला, " माझं इथलं नांव जरी बलदेव पंडा असं असलं, तरी वस्तुतः आम्ही महाराष्ट्रीयच आहोंत. माझं खरं नांव मुरलीधर उपाध्ये असं आहे. आतां इथें आमचीं फार थोडीं कुटुंबं उरलीं आहेत, ह्यामुळें मुलां-मुलींचीं लग्नं करणंही अशक्य होऊन बसलं आहे. ह्या बाबतींत तुम्ही महाराष्ट्रांतील लोक आम्हांला कांहीं मदत कराल का? आमच्या मुलींचीं लग्नं महाराष्ट्रांत झालीं, तरच हा प्रश्न सुटेल. परंतु तिकडील लोक आमच्या मुली करून घेत नाहींत. शिवाय आमची संख्या घटल्यामुळें इतर लोक आम्हांला इथून हुसकावून लावतील अशी भीति निर्माण झाली आहे. ह्या बाबतींत तुम्ही काय करूं शकाल?" मी त्यांना म्हणालों, "तुम्ही बिहारी लोकांचे रीति-रिवाज, पडदा, हुंडा, वगैरे गोष्टी स्वीकारल्या आहेत. मराठी भाषा तुम्हांला येत नाहीं. अश्या स्थितींत इथल्या समाजाशीं एकरूप होण्यांतच तुमचं कल्याण आहे. तरी पण तशी खास अडचण असेल, तर तुम्ही महाराष्ट्रांत येऊन विचारविनिमय करा. तुमची भिक्षुकी वृत्ति नष्ट झाली, तर मला मुळींच दुःख होणार नाहीं. तुम्ही जर बुद्धिमान् असाल, तर इतर कोणत्याही क्षेत्रांत गेलांत तरी कर्तबगारी करून दाखवाल. तेव्हां ही भीति मनांतून काढून टाका." त्यानंतर त्यांनीं देवळांत असलेलें आपलें छोटेंसें ग्रंथालय मला नेऊन दाखविलें. त्यांत संस्कृत, हिंदी, इंग्रजीचीं सामान्य पुस्तकें दिसलीं. सतधारेजवळ शिवमंदिर, संध्यादेवीमंदिर, विष्णुपद, वगैरे देवळें आहेत. येथील टेकड्यांवरून दिसणारें जुन्या राजगृहाचें दृश्य फारच सुंदर दिसतें.

सर्व धर्मांचें तीर्थस्थान

पहाटे झोपेंतून जागा झालों, तो दूरच्या मशिदींतून येणारी बांग कानांवर पडली. पहाटेच्या निःस्तब्धतेंत प्रार्थनेसाठीं देण्यांत आलेलें तें निमंत्रण

कानांना अत्यंत मधुर लागलें आणि लक्ष्यांत आलें, कीं आज राजगृह हें सर्व धर्मांचें तीर्थक्षेत्र बनलें आहे. भगवान् महावीर स्वामींनीं राजगृह व नालंदा ह्या ठिकाणीं चौदा पावसाळे घालविले होते आणि जैनांचे विसावे तीर्थंकर मुनि सुव्रत ह्यांची जन्मभूमि राजगृह होय, असें समजलें जातें. ह्यामुळें जैन लोक ह्या स्थानाला पवित्र मानतात. बिहारचे महान् मुस्लिम संत मखदूम शाह शरफुद्दीन हे ह्या ठिकाणीं निवान्तपणें ध्यान व तप करण्यासाठीं बारा वर्षें राहिले होते आणि हजरत मुहम्मद येथें येऊन गेले होते, अशी समजूत मुसलमानांमध्यें असल्यामुळें ते लोकही ह्या स्थानास पवित्र मानतात. अशा प्रकारें हिंदु, बौद्ध, जैन व मुसलमान धर्मीयांचें हें तीर्थक्षेत्र बनलें आहे.

गरम झऱ्याच्या पाण्यानें स्नान करून आम्ही जपानी मंदिरांत परतलों, तों न्याहारी तयार होती. गरम-गरम पराठे (तुपांत तळलेली चपाती) व भाजी समोर दिसल्याबरोबर आम्हीं त्यांवर ताव मारला आणि स्वामीजींचे आभार मानून निघालों. परंतु ते आम्हांला पोंचवायला वाटेंतील ब्रह्मी बुद्धमंदिरापर्यंत आले. हें ब्रह्मी मंदिरही सुंदर असून येथील आरास ब्रह्मदेशीय पद्धतीची आहे. त्यांतील लाकडी वस्तूंवरील सोनेरी काम मोठें प्रेक्षणीय आहे. येथें एक ब्रह्मी भिक्षुणी राहात असते.

रेंगाळणाऱ्या मनानें निरोप घेतला

अशा प्रकारें रात्रीं ७ वाजल्यापासून सकाळीं ७ वाजेपर्यंतचा अर्धा दिवस आम्हीं ह्या प्राचीन नगरीच्या सान्निध्यांत घालविला आणि जुन्या स्मृतींचा दरवळणारा सुगंध बरोबर घेऊन रेंगाळणाऱ्या मनानें, परंतु झप-झप चालणाऱ्या पावलांनीं स्टेशनवर पोंचलों. तेथून आठ वाजतां गाडी सुटली. तिच्यांतून आम्ही आठ मैल दूर असलेल्या नालंदा शहराचे अवशेष पाहायला गेलों. गाडीही आमच्या मनाप्रमाणेंच रेंगाळत, लळत-लोंबत चालली होती. आम्हांला वाटलें, “ ह्या प्राचीन नगरीपासून दूर जाण्याचं हिच्याही जिवावर आलं आहे असं दिसतं. कशी-बशी नाइलाजानें चालली आहे बिचारी ! ”

नालंदा हसतीव सर्वनगरीः

लहानपणीं हिंदुस्थानच्या इतिहासांत बौद्धकालीन नालंदा विद्यापीठाचें वर्णन वाचीत असतां भारताच्या प्राचीन गौरवाच्या कल्पनेनें हृदय किती आनंदित झालें होतें ! पूर्वजांच्या कर्तबगारीचें शब्दचित्र नजरेसमोरून जात असतां छाती अभिमानानें कशी फुलून गेली होती ! परंतु कधीं-काळीं ह्या नालंदा नगरीला भेट देण्याचें, तिचें दर्शन घेऊन पुनीत होण्याचें, भाग्य आपल्याला लाभेल, अशी कल्पना मात्र मनाला कधीं शिवली नव्हती. ज्याप्रमाणें स्वर्गाचें नुसतें वर्णनच वाचायचें असतें, त्याचें प्रत्यक्ष दर्शन कधींच घडायचें नसतें, त्याप्रमाणें महाराष्ट्रापासून हजारों मैल दूर असणाऱ्या महात्मा गौतम बुद्धाच्या विहारभूमींतील पवित्र स्थळांचें दर्शन घडणें ही शक्य कोटींतील गोष्ट आहे, असें कधीं वाटलें नाहीं.

प्रस्थान

परंतु बिहारमधील चांडिल ह्या गांवीं 'अखिल भारतीय सर्वोदय समाजा'चें जें वार्षिक संमेलन झालें, त्याला उपस्थित राहावें लागलें आणि त्यामुळें बिहारमधील कांहीं प्रसिद्ध स्थळांना भेटी देण्याची संधि लाभली.

अपरिचित प्रांतांतील ऐतिहासिक स्थळें पाहणें मोठें अडचणीचें होतें, असा माझा अनुभव आहे. आपल्याला असें वाटतें, कीं त्या-त्या भागांतील लोकांना त्या स्थळांसंबंधीं जरूर ती माहिती असणारच; म्हणून आपण प्राथमिक तयारी न करतां बाहेर पडतों आणि प्रत्यक्ष अनुभव असा येतो, कीं त्या स्थळांसंबंधीं आपल्याला जेवढी माहिती असते, तेवढीदेखील तेथील स्थानिक लोकांना नसते आणि मग आपले हाल कुत्रा खात नाहीं.

चांडिलहून आम्ही पटना (पाटणा) ह्या बिहारच्या राजधानीस गेलों आणि तेथून सकाळीं ११ च्या सुमारास 'स्टेट ट्रान्स्पोर्ट'च्या बसनें निघून पन्नास मैल

दूर असलेल्या बिहारशरीफ ह्या शहरीं २-३० ला पोंचलों. येथील एस. टी. च्या वेळा येथील मित्रांना नक्की माहीत नसल्यामुळें पहिली बस थोडक्यांत चुकली, ती चुकल्यामुळें तिला जोडून असलेली आगगाडीही चुकली व सबंध दिवस वायां गेला. त्या वेळीं तेथें स्टेट ट्रान्स्पोर्ट (बिहार राज्य सर्व्हिस) नुक्तीच सुरू झाली होती, ह्यामुळ तिची घडी नीटशी बसलेली नव्हती. खुद्द पाटण्यामध्येंही ह्या संस्थेचें ऑफीस अद्यापि सुसज्ज झालेलें नव्हतें. रस्त्याच्या कडेला, गटाराच्या कांठीं बसूनच गाड्या सोडण्याचें काम नियंत्रक करीत होते. गाडी वाटेंत कोठें थांबवावी, किती उतारू घ्यावेत, ह्यासंबंधीं कांहीं बंधन अद्यापि मान्य झालेलें दिसलें नाहीं.

बिहार-शरीफ

आपल्यापैकीं अनेकांनीं बिहारमधील हिंदु-मुस्लिम दंग्याच्या वेळीं वर्तमानपत्रांमध्यें बिहार-शरीफ ह्या शहराचा उल्लेख वाचला असेलच. ह्या गांवांत मुसलमानांची वस्ती बरीच असल्यामुळें पूर्वीं येथें वारंवार दंगे होत असत. स्वराज्यानंतर मात्र देशांतील इतर भागांप्रमाणें येथील दंगे बंद झाले आहेत. येथील लोक 'बिहार-शरीफ' एवढें सबंध नांव न उच्चारतां फक्त 'बिहार' एवढेंच नांव वापरतात. ह्यामुळें जेव्हां एखादा गृहस्थ म्हणतो, कीं "मी बिहारला चाललों आहें," तेव्हां परप्रांतांतून आलेल्या माणसाला मोठी गंमत वाटते.

येथून ७ मैलांवर नालंदा नांवाचें एक रेल्वे स्टेशन आहे. रेल्वेच्या बरोबरीनेंच मोटाररस्ताही जातो. ह्या स्टेशनापासून सुमारें दीड मैलावर प्राचीन नालंदा विश्वविद्यालयाचे अवशेष आहेत. आम्ही रात्रीं राजगृह येथेंच वस्तीला होतों. ह्यामुळें परत बिहार-शरीफला न येतां वाटेंत नालंदा येथें उतरलों. राजगृह व बिहारशरीफ ह्यांच्या बरोबर मध्यावर नालंदा स्टेशन आहे. भग्नावशेषांपर्यंत जाण्यासाठीं टांगेही मिळतात. परंतु आमच्याजवळ सामान फार थोडें होतें आणि सकाळची हवाही आल्हाददायक होती, ह्यामुळें आम्ही चालतच त्या ठिकाणीं गेलों. रस्ता सुंदर, डांबरी आहे आणि त्याच्या दोहों बाजूंस मोठ-मोठे वृक्ष आहेत. ह्यामुळें उन्हाचा त्रास झाला नाहीं.

नालंदा विश्वविद्यालय

ह्या ठिकाणीं दोन गोष्टी पाहाण्यासारख्या आहेत. एक म्हणजे विश्वविद्यालयाचे अवशेष आणि दुसरी म्युझियम. रस्त्याच्या डाव्या बाजूस अवशेष-विभाग आहे आणि उजव्या बाजूस आधुनिक पद्धतीच्या इमारतींत वस्तुसंग्रहालय आहे. उन्हें कडक होण्यापूर्वीं हिंडून-फिरून घेणें योग्य होईल, असा विचार करून, आम्ही प्रथम अवशेष पाहावयास गेलों.

अगदीं जवळ जाईपर्यंत ह्या ठिकाणीं कांहीं असेल अशी कल्पनाही येत नाहीं. ह्याचा अर्थ ह्या विद्यापीठाच्या आस-पासची भूमि पुष्कळच वर आलेली आहे. ह्या भूमीच्या खालीं किती शहरें, किती नगरें, किती इमारती गाडलेल्या असतील ह्याची कांहींच कल्पना येत नाहीं. जवळ जाऊन लहानशा दरवाजानें विद्यापीठाच्या आवारांत प्रवेश केल्यानंतर मात्र अल्लाउद्दिनाच्या जादूच्या साहाय्यानें एखाद्या काल्पनिक महालांत प्रवेश करावा, तसें वाटतें आणि समोरचा विशाल व भव्य स्तूप पाहून छाती दडपून जाते. सुमारें ७०–८० फूट उंच असलेल्या त्या ऐस-पैस स्तूपावर चढून एकूण स्थानाचें विहंगावलोकन केलें, कीं विद्यापीठाच्या आराखड्याची कल्पना येते. हा इतका उंच स्तूप एकाच वेळीं अथवा एकाच व्यक्तीनें बांधलेला नसून वेग-वेगळ्या वेळीं वेग-वेगळ्या राजांनीं थरांवर थर चढविले आहेत. इतिहासज्ञांचें तर असेंही मत आहे, कीं आज जो स्तूप जमिनीच्या वर दिसतो, तितकाच जवळ-जवळ जमिनीच्या खालींही आहे !

प्रचंड छात्रालयें

नालंदा विश्वविद्यालय हें हिंदु-विश्वविद्यालय वगैरेसारख्या आधुनिक युनिव्हर्सिटींप्रमाणें विद्यार्थ्यांच्या राहाण्या-जेवण्याची सोयही असलेलें असें होतें. वर ज्या मुख्य स्तूपाचा उल्लेख केला आहे, त्याच्या समोरच्या बाजूस दक्षिणोत्तर दहा विहारांचे अवशेष खोदून काढण्यांत आलेले आहेत. प्रत्येक विहार म्हणजे जणूं एक स्वयंपूर्ण छात्रालयच आहे. प्रशस्त अंगण, अष्टकोनी

विहीर, ऐस-पैस पडव्या आणि सभोवतीं लहान-लहान खोल्या, असें त्यांचें स्वरूप आहे. आजच्या जमान्यांतील पाश्चात्य देशांत आढळणाऱ्या अवाढव्य छात्रालयांच्या मानानें हीं छात्रालयें फारशीं मोठीं वाटणार नाहींत; परंतु सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वीं, जेव्हां पाश्चात्य जगामध्यें सर्वत्र अंधःकार पसरलेला होता, अश्या वेळीं केवळ ज्ञानार्जनासाठीं – वैभवाचें प्रदर्शन करण्यासाठीं नव्हे – इतक्या भव्य इमारती आपल्या देशांतील राजांनीं बांधविल्या, ही खास अभिमानास्पद गोष्ट आहे. ह्या विहारांमध्यें कित्येक ठिकाणीं महिरपीचे दरवाजे आढळतात. ह्यावरून त्या काळीं वास्तुकलेनें पुष्कळच प्रगति केली असली पाहिजे, असें अनुमान निघतें. जमिनीच्या खालून जाणाऱ्या मोऱ्याही येथें पाहावयास मिळतात. ह्या विहाराच्या समोरच्या बाजूस लहान-मोठे चैत्य व स्तूप ह्यांचे अवशेष पाहावयास सापडतात.

कालनिर्णय

नालंदा शहराचा उल्लेख अडीच हजार वर्षांच्याही पूर्वींपासून आढळतो. महावीर स्वामी आणि भगवान् बुद्ध ह्यांच्या उदयापूर्वीं हें शहर भरभराटीस आलेलें असावें, असें इतिहाससंशोधकांचें मत आहे. कारण महावीर स्वामी आणि गौतमबुद्ध ह्यांनीं ह्या शहरांत अनेक पावसाळे काढल्याचा उल्लेख त्या-त्या पंथाच्या धर्मग्रंथांत आढळतो आणि ह्यामुळें जैन व बौद्ध लोक ह्या शहरास पवित्र तीर्थक्षेत्र मानतात. तेव्हांपासून तेराव्या शतकापर्यंत म्हणजे दोन हजार वर्षेपर्यंत ह्या ठिकाणीं वेग-वेगळ्या वंशांनीं राज्य केलें. तेराव्या शतकांत बख्तियार खिलजीनें ह्या धार्मिक व सांस्कृतिक केंद्रावर हल्ला चढवून त्याची धूळधाण उडविली. तेव्हांपासून इंग्रजांच्या अमदानीपर्यंत ह्या स्थानाकडे कोणाचेंच लक्ष्य गेलें नाहीं. जीं दोन हजार वर्षें ह्या नगरीनें वैभवांत घालविलीं, त्या अवधींत ही येथील इमारतींची पडझड झाली असणें स्वाभाविक आहे. ह्यामुळें येथील विहार व स्तूप ह्यांचे अनेक थर एक-मेकांवर चढलेले दिसतात. एक विहार पडला, कीं त्यावरच दुसरा बांधायचा, असा क्रम दिसून येतो. ह्यामुळें कित्येक ठिकाणीं आठ वेळां विहार बांधल्याचे पुरावे सापडतात. कांहीं काळपर्यंत नालंदा हें राजगृहाचेंच उपनगर समजलें जात असे.

ज्ञानवैभवाची चुणूक

प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संग ह्यानें हिंदुस्थानमध्यें इ. स. ६३० पासून ६४५ पर्यंत भ्रमण केलें होतें. सम्राट हर्षवर्धनाच्या काळीं तो नालंदा येथें येऊन बरेच दिवस राहिला होता. त्यानें ह्या नगरीचें जें उत्कृष्ट वर्णन केलें आहे, तें वाचून मन आश्चर्यानें थक्क होतें. तो एके ठिकाणीं लिहितो, "येथील संघारामांत (भिक्षुनिवासांत) जे दहा हजार साधु निवास करतात, ते सर्व महायान पंथाचे अनुयायी आहेत ; परंतु अठरा बौद्धागम, वेद आणि इतर आगम ह्यांचें अनुशीलन ते करीत असतात...येथील साधूंचें आचरण अत्यंत शुद्ध असतें. ह्यामुळें गेल्या ७०० वर्षांत, नालंदा विश्वविद्यालय सुरू झाल्यापासून, कोणीही अपराधी निघाला नाहीं. येथें रात्र-दिवस महान् गूढ विषयांवर शास्त्रार्थ चालू असतात; ह्यामुळें तरुण व वृद्ध ह्यांच्या ज्ञानांत वृद्धि होत असते. ज्यांचें ज्ञान फक्त त्रिपिटकापर्यंतच मर्यादित असतें, त्यांना लाजेनें मान खालीं घालावी लागते. ह्या महाविहारांत भारतवर्षांतील वेग-वेगळ्या प्रांतांतून शास्त्रप्रेमी विद्वान् शास्त्रार्थासाठीं येत असतात. परंतु शास्त्रार्थामध्यें भाग घेण्यापूर्वीं त्यांची परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा नालंदाचे द्वारपाल घेत असतात. जोंपर्यंत ह्या द्वारपालांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरें मिळत नाहींत, तोंपर्यंत विद्वानांना शास्त्रार्थामध्यें भाग घेण्याची परवानगी दिली जात नाहीं. सुमारें ८० टक्के लोक ह्या द्वारपालांच्या अवघड प्रश्नांचीं उत्तरें देऊं शकत नाहींत; ह्यामुळें त्यांना निमूटपणें आल्या पावलीं परत जावें लागतें. उरलेल्या २० टक्के लोकांनाही प्रत्यक्ष शास्त्रार्थामध्यें पराजित होण्याची भीति वाटत असतेच; परंतु जे कोणी ह्या सर्व चक्रांतून तावून-सुलाखून बाहेर पडतात, त्यांना यश, कीर्ति, वगैरे सर्व प्रकारचे लाभ होतात."

उत्खननांत मिळालेल्या वस्तु

नालंदा विद्यापीठाचें उत्खनन चालू असतां त्यांतून मातीच्या हजारों मुद्रा सापडल्या आहेत. त्या मुद्रांवर धर्मचक्रप्रवर्तनाचें चित्र आहे. मध्यभागीं धर्मचक्र आणि दोहों बाजूंस बसलेलें एकेक हरिण, हें नालंदा

महाविद्यालयाचें बोधचिन्ह असावें असें म्हणतात. त्याखेरीज धातूच्या, पाषाणाच्या व इतरही प्रकारच्या अनेक मूर्ति येथें सापडल्या आहेत. त्यांतील कित्येक मूर्ति अगदीं नवीन तयार केल्याप्रमाणें व सजीव भासतात. कांशाच्या बुद्ध मूर्तींकडे पाहिलें असतां त्या जणूं आतां बोलणारच आहेत, असा भास होतो. त्यांच्या चेहेऱ्यावर शांतरसाचें साम्राज्य विलसत आहे. येथें सापडणाऱ्या मूर्तींमध्यें महात्मा बुद्धाची भूमिस्पर्श अवस्थेतील मूर्ति प्रेक्षकांचें लक्ष्य विशेष आकर्षून घेते. सिद्धार्थाला ज्या अवस्थेंत ज्ञानप्राप्ति झाली, त्या अवस्थेची द्योतक अशी ही मुद्रा समजली जाते. ज्ञानप्राप्ति होण्यापूर्वी भगवान् बुद्ध जेव्हां मांडी घालून बसले, तेव्हां त्यांनीं असा दृढ संकल्प केला होता, कीं जोंपर्यंत 'बोधि' अथवा संपूर्ण ज्ञान प्राप्त होत नाहीं, तोंपर्यंत मी येथून हलणार नाहीं. भूमीला स्पर्श करून ते म्हणाले होते, "हे भूमि! जर मी पापी नसेन, तर मला हें ज्ञान प्राप्त होईल. माझ्या पुण्य व पाप ह्यांची साक्षिणी तूं आहेस." ह्या दृढ किंवा वज्र-संकल्पामुळें ह्या आसनाला वज्रासन असेंही म्हणतात.

पदार्थसंग्रहालय

उत्खननांतून मिळालेल्या ह्या साऱ्या वस्तु एका सुसज्जित इमारतींत ठेवलेल्या आहेत. नालंदाचे अवशेष पाहून परतलों आणि शांतपणें ह्या पदार्थसंग्रहालयांतील वस्तु पाहून घेतल्या. इमारतीच्या दाराशींच मातीचा एक मला मोठा हांडा ठेवलेला आहे. पूर्वींच्या काळीं लोक त्यांत धान्य ठेवीत असत. त्या हांड्याची उंची सुमारें दीड पुरुष आहे. एखादी मोठी कणगीच म्हणायची. अनेक तोट्या असलेलीं मातीचीं भांडींही येथें पाहावयास मिळालीं. नागराज, द्वारपाल, वगैरे नाना प्रकारच्या मूर्ति येथें आहेत. त्यांतील कांहीं राजगृहाच्या उत्खननांतून सापडलेल्या आहेत. राजगृह येथें स्वतंत्र म्यूझियम नाहीं, ह्यामुळें तेथील अवशेष पाहावयाचे असल्यास नालंदालाच यावें लागतें.

'नालंदा हसतीव सर्वनगरीः'

म्युझियम पाहून आम्ही भारावलेल्या मनांनीं व थकलेल्या पावलांनीं परत फिरलों. मन फिरून-फिरून दोन हजार वर्षांपूर्वीच्या काळांत प्रवेश करीत होतें

आणि नालंदाच्या उत्खननांत मिळालेल्या राजा यशोवर्म्याच्या शिलालेखांतील हा श्लोक पुन:पुनः उच्चारीत होतें :

> यासावूर्जितवैरिभूप्रविगलद्दानाम्बुपानोल्लस-
> न्माद्यद्भृङ्गकरीन्द्रकुम्भदलनप्राप्तश्रियांभूभुजाम् ।
> नालन्दा हसतीव सर्वनगरीः शुभ्राभ्रगौरस्फुर-
> चैत्यांशुप्रकरैस्सदागमकलाविख्यातविद्वज्जना ॥

अर्थ– आपल्या शुभ्र, उंच चैत्यांच्या किरणसमूहांच्या द्वारें नालंदा मोठ-मोठ्या राजांच्या नगरींकडे पाहून जणूं हसत आहे. जेथें प्रसिद्ध धुरंधर विद्वान् वास करतात, अश्या हिच्या उंच प्रासादांच्या व विहारांच्या पंक्ति ज्या ठिकाणीं विद्याधर राहातात अशा सुमेरु पर्वताप्रमाणें शोभून दिसतात.

जुना जमाना आणि नवा काळ ह्यांचीं चित्रें एकमेकांत मिसळून एक नवेंच दृश्य डोळ्यांसमोर उभें राहात होतें आणि ज्या कमलनालांच्या वैपुल्यावरून ह्या नगरीला नालंदा असें नांव पडलें, त्या कमलनालांनींच जणूं सारें मानस भरून गेलें होतें.

पावापुरीचें जलमंदिर

जैनांचें पवित्र क्षेत्र

हिंदुस्थानांतील जैनांच्या तीर्थक्षेत्रांचें अध्ययन ही एक अत्यंत महत्त्वाची व मनोरंजक गोष्ट ठरेल. जैन धर्म हा जरी हिंदु धर्माचाच एक पोटविभाग किंवा पंथ असला, तरी गेलीं दोन-अडीच हजार वर्षें त्यानें आपलें स्वतंत्र अस्तित्व टिकवून धरलें आहे. बौद्ध धर्माप्रमाणें त्याला ह्या देशांतून आपलें चंबू-गवाळें आवरावें लागलेलें नाहीं आणि आज तर देशांतील अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांत जैनपंथीय लोक अग्रेसर ठरले आहेत. उत्तर-भारतांत जैनांचीं तीर्थक्षेत्रें असणें स्वाभाविकच आहे; परंतु दक्षिण-भारतांतही श्रवणबेळगोळा, मूडबिद्री, वगैरे ठिकाणीं जैनांचीं पवित्र क्षेत्रें आजही विद्यमान आहेत. ह्याचा एक फायदा असा होतो, कीं वेग-वेगळ्या प्रांतांतील व वेग-वेगळ्या भाषा बोलणारे जैन लोक एकत्र येऊं शकतात आणि प्रांतीयतेच्या वर जाऊन अखिल भारताच्या दृष्टीनें विचार करूं शकतात; आणि ह्यामुळेंच त्यांच्या कर्तबगारीला अफाट वाव मिळालेला आहे.

अश्या ह्या कर्तृत्वसंपन्न वैश्य जमातीचें एक पवित्र क्षेत्र बिहारमध्यें पाटणा (पटना) जिल्ह्यांत पावापुरी येथें आहे. पाटण्याहून नवादा गांवीं जाणाऱ्या डांबरी रस्त्यावर बिहारशरीफ शहरापासून सुमारें आठ मैलांवर (पाटण्यापासून ५८ मैलांवर) पावापुरी नांवाचें खेडें आहे. तेथेंच जैनांचें प्रसिद्ध जलमंदिर आहे. भगवान् महावीरांनीं ह्या ठिकाणीं देहत्याग केला व त्यांना येथें अग्निसंस्कार करण्यांत आला, असें मानण्यांत येतें; ह्यामुळें धार्मिक दृष्ट्या ह्या स्थानाला अत्यंत महत्त्व आहे. जेथें महावीरांनीं देहत्याग केला, तें स्थान पावापुरी खेड्यांत आहे. त्या ठिकाणीं एक देऊळ बांधण्यांत आलेलें आहे, परंतु त्यांत कांहीं विशेष नाहीं. ज्या ठिकाणीं त्यांना अग्निसंस्कार करण्यांत आला, त्या ठिकाणीं मात्र एक अत्यंत सुंदर

असें संगमरवरी जलमंदिर उभारण्यांत आलें आहे. जैनेतर प्रवासी मुख्यतः हें जलमंदिर पाहाण्यासाठींच पावापुरीस जात असतात.

सुंदर, टुमदार मंदिर

राजगृह व नालंदा ह्या प्राचीन स्थानांपासून जवळच पावापुरी हें ठिकाण असल्याचें समजतांच तेथें जाण्याचा मीं निर्णय केला. बिहारशरीफहून ' स्टेट ट्रान्स्पोर्ट सर्व्हिस ' च्या बसनें पावापुरीला जावें, असें मला सांगण्यांत आलें होतें. परंतु आदल्या दिवशीं नालंदा स्टेशनवर कांहीं प्रवासी मला भेटले होते, त्यांनीं मला अगदीं बजावून सांगितलें, " तुम्ही मोटारीवर विसंबून मुळींच राहूं नका. येथील बस सर्व्हिस अत्यंत अनियमित आहे आणि नवादाहून परत येणाऱ्या गाडींत जागा मिळेलच असं नाहीं. काल आम्हांला पावापुरीहून बिहारपर्यंत तंगड्या तोडीत चालत यावं लागलं. तुम्ही टमटम (टांगा) किंवा रिक्षा करून पावापुरीस जा. "

त्या गृहस्थांचा उपदेश शिरसावंद्य मानून आम्ही सायकल-रिक्षा करून पावापुरीस गेलों. सकाळीं राजगृह व नालंदा येथें खूप पायपीट करून आम्ही थकून गेलों होतों. शिवाय ऐन दुपारीं एक वाजण्याच्या सुमारास आम्ही बिहारला (बिहार हें बिहारशरीफचें संक्षिप्त रूप असून त्या भागांत हेंच ज्यास्त प्रचलित आहे) पोंचलों होतों. अश्या वेळीं रिक्षांतून ७-८ मैल जाणें कांहीं सुखदायक नव्हतें. परंतु कसेंही करून त्या दिवशीं रात्रीं पाटण्याला पोंचणें मला भाग होतें. कारण दुसऱ्या दिवशीं पहाटे पाटण्याहून गयेला जाण्याचा कार्यक्रम निश्चित झालेला होता. म्हणून त्या तळपत्या उन्हांत डांबरी रस्त्यावरून प्रवास करण्यास आम्ही तयार झालों. अर्थात् रस्त्याच्या कडेला बऱ्यापैकीं झाडें असल्यामुळ फारसा त्रास झाला नाहीं.

बिहारपासून पावापुरीपर्यंत मोटारनें पावणे-सात आणे पडतात. माझ्याबरोबर तिवारी नांवाचे एक बिहारी गृहस्थ होते. म्हणजे आम्हां दोघांना जाण्या-येण्यास एकूण १ रुपया ११ आणे खर्च आला असता. शिवाय, मोटार-रस्त्यापासून सुमारें मैलभर चालावें लागतें; त्यांतही वेळ व श्रम खर्ची पडले असते. म्हणून जाण्या-येण्याचे ३ रुपये घेऊन रिक्षावाला येण्यास तयार झाला, तेव्हां आम्हांला

तो फार महाग वाटला नाहीं आणि आम्ही एका तासांत रिक्षानें पावापुरीस पोंचलों. तेथील सुंदर जलमंदिर पाहून आमचा सारा शीण दूर झाला.

श्रीमंतीचें वैभव, ऐश्वर्याचें प्रदर्शन

जैन जमात मुख्यतः वैश्यवर्णीय आहे; ह्यामुळें त्यांच्यांत संपत्तीला महत्त्व अधिक आहे. तसें पाहिल्यास बाह्य संपत्तीची, भांडवलशाहीची प्रतिष्ठा ही गोष्ट सर्वच जमातींत व सर्व जगभर अनादिकालापासून चालत आलेली आहे. ह्यामुळें ह्या बाबतींत अमूक एका जमातीला नांवें ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. परंतु जेथें श्रीमंत लोक वरचेवर व अधिक संख्येनें जातात, तेथील पुजारी, व्यवस्थापक व नोकर-चाकर गरिबांकडे पूर्णपणें दुर्लक्ष्य करतात; किंबहुना त्यांची अवहेलना करतात, असा अनुभव येतो. ह्यांत त्यांचा कांहीं दोष आहे असें नव्हे. ज्या समाजांत श्रीमंती हेंच वैभव समजलें जातें, तेथें अशी वृत्ति निर्माण न झाली तरच आश्चर्य. आम्हांलाही ह्या वस्तुस्थितीचा अनुभव पावापुरीस आला. आमच्या पूर्वी आगऱ्याचे एक मोठे शेठ तेथें आलेले होते. त्यांच्या दिमतींत तेथील मंडळी इतकी गुंतून गेली होती, कीं आमच्याकडे लक्ष्य देण्यास कोणाला सवडही झाली नाहीं.

येथील मंदिरांतही ऐश्वर्याचें प्रदशन पाहून डोळे दिपतात. वस्तुतः एका विशाल सरोवराच्या मध्यभागीं वसलेल्या ह्या टुमदार मंदिराचें दृश्य पुरेसें मनोहर आहे. त्याला बाह्य भपक्याची मुळींच जरूर नाहीं. परंतु देवळांतील सोन्या-चांदीचीं उपकरणीं, मखमलीचें छत आणि इतर भपका इकडेच सामान्य लोकांचें मन आकर्ित होतें. ह्या जलमंदिरांत महावीरांच्या पादुका ठेवण्यांत आलेल्या आहेत. ह्या मंदिरापर्यंत जाण्यास संगमरवरी फरशी असलेला प्रशस्त पूल बांधण्यांत आलेला आहे. सारें सरोवर कमलाच्या वेलींनीं भरलेलें आहे. त्या वेळीं तरी आम्हांला फुलें दिसलीं नाहींत; परंतु पृष्ठभागावर पानांची दाटी खूप झालेली होती. पाणी अत्यंत अस्वच्छ, हिरवें-गार दिसत होतें. त्यांतच कांहीं लोक आंघोळ करीत असलेले पाहून अंगावर शहारे आले. मनांत विचार आला, 'ह्या देवळाच्या व्यवस्थेपायीं व संपत्तिसंरक्षणाच्या हेतूनें जो पैसा खर्च केला जातो, त्यापैकीं थोडा पैसा वापरून जर हें सरोवर स्वच्छ करण्यांत येईल, तर किती चांगलं होईल!

जलविहार तर करतां येईलच, पण नुसतं पाहूनही मन प्रसन्न होईल.' अर्थात् माझी ही सूचना ऐकण्याइतकी फुरसत कोणाजवळ नाहीं, हें मला पुरेसें माहीत आहे.

बक्षिसीचें राज्य

ज्या माणसानें आम्हांला जलमंदिर दाखविलें, त्याला आम्हीं थोडीशी बक्षिसी दिली ; परंतु त्याला ती अगदींच क्षुल्लक वाटली. कारण तेथें आलेल्या जैन शेठजींनीं गांवांतील मंदिरासाठीं शंभर रुपये, जलमंदिरासाठीं एक्वीस रुपये व नोकरांसाठीं चार रुपये दिले होते. मला पावापुरीसंबंधीं पुस्तकें व छायाचित्रें हवीं होतीं, म्हणून तेथील लोकांना मीं विचारलें, "इथें पुस्तकं व चित्रं मिळतील का ?" तेव्हां त्यांच्यापैकीं एक्जण म्हणाला, "मिळतील ना! परंतु मी तुमच्याबरोबर असल्याशिवाय तुम्हांला तीं मिळणार नाहींत. हे शेठजी गेले, कीं मी तुमच्याबरोबर येऊन त्या माणसाशीं गांठ घालून देतों." ह्यामुळें ते शेठजी तेथून जाईपयत मला अर्धा-पाऊण तास थांबावें लागलें. त्यानंतर तो गृहस्थ मला घेऊन गेला आणि ज्याच्याजवळ पुस्तकें व चित्रें होतीं, त्याच्याशीं त्यानें माझी गांठ घालून दिली. त्या गृहस्थाजवळ मला हवें असलेलें पुस्तक अथवा चित्रेंही मिळालीं नाहींत, त्यामुळें एक मामुली चित्र घेऊन मी परत फिरलों ; इतक्यांत मला तेथें घेऊन गेलेला माणूस मला म्हणाला, "साहेब, माझी बक्षिसी ?" मी आश्चर्यानें त्याच्या तोंडाकडे पाहातच राहिलों. वस्तुतः ह्या कामासाठीं त्याला एक मिनिटही द्यावें लागलें नव्हतें. सहज जातां-जातां त्यानें माझी चित्रवाल्याशीं गांठ घालून दिली होती. त्याचा तो लोभीपणा पाहून मला खूप राग आला. परंतु मला लवकर परतावयाचें असल्यामुळें मी त्याच्याशीं हुज्जत न घालतां हातीं आलेलें नाणें त्याच्या हातीं टाकून तेथून सटक्लों. अथात् ह्या सर्व बाबतींत नोकरांचाच दोष असेल, असें मी मानीत नाहीं. त्यांच्या चरिताथाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांनीं ती नीट पूर्ण न केल्यामुळेंच बहुधा त्यांना हें लाजिरवाणें जिणें कंठावें लागत असलें पाहिजे.

पाटण्यास परत

पावापुरीचीं मंदिरें पाहून आम्ही मुख्य रस्त्यावर आलों. इतक्यांत नवादाहून पाटणा शहरीं जाणारी बस तेथें आली. चौकशी करतां तिच्यामध्यें जागा असल्याचें

समजलें. आतां आमच्यापुढें एक पेचप्रसंग निर्माण झाला. रिक्षाचें भाडें वसूल करण्यासाठीं रिक्षांतून बिहारशरीफपर्यंत जावें, तर नंतर बिहारपासून बस मिळण्याची व पाटण्याला वेळेवर पोंचण्याची शाश्वती नव्हती. रिक्षा तसाच सोडून द्यावा, तर त्याचें पुरें भाडें द्यावें लागून, शिवाय बसलाही भाडें द्यावें लागणार होतें. परंतु वेळेचें महत्त्व अधिक असल्यामुळें एका क्षणांत मीं निर्णय केला आणि रिक्षावाल्यास ठरल्याप्रमाणें तीन रुपये देऊन परत जाण्यास सांगितलें आणि बसमध्यें बसलों. मंदिराच्या पुजाऱ्यांनीं व नोकरांनीं पुरेशी बक्षिसी न मिळाल्यामुळें जरी आम्हांला मनांतल्या मनांत लाखोली वाहिली असली, तरी ह्या अनपेक्षित फायद्यानें रिक्षावाला मात्र खूष झाला आणि त्याच्या खुषीनें आम्हीही आनंदित झालों. ऐन उन्हाच्या वेळीं दोन शरीरें वाहून नेणें वस्तुतः त्याच्या जिवावरच आलें असलें पाहिजे; परंतु पोटाखातर तो तयार झाला होता. परत जातांना तो रिकामा रिक्षा घेऊन आरामांत शीळ घालीत गेला, कीं पैशाच्या लोभानें वाटेंत मिळालेल्या 'शिटा' त्यानें घेतल्या, हें कळण्यास मार्ग नाहीं !

रांचींतील आठ दिवस

सांची कीं रांची ?

आपला देश एवढा अफाट व विस्तीर्ण आहे, कीं अमुक एक स्थान कोठें आहे, हें सुशिक्षित माणसालाही चटकन् सांगतां येत नाहीं.

ह्यामुळें आपल्या मनांत निष्कारणच अनेक भ्रम निर्माण होत असतात. सिलोन देश हिंदुस्थानच्या थेट दक्षिणेस कन्याकुमारीपासून सरळ रेषेंत आहे असा एक भ्रम कांहीं नकाशांवरून माझ्या डोक्यांत ठाण मांडून बसला होता. पुढें प्रत्यक्ष कन्याकुमारीला गेल्यानंतर हा भ्रम दूर झाला आणि सिलोन हिंदुस्थानच्या दक्षिणेस नसून आग्नेय कोपऱ्यांत आहे असें दिसून आलें. अशाच प्रकारचा एक घोटाळा सांची व रांची ह्या दोन ठिकाणांच्या बाबतींतही माझ्या डोक्यांत झालेला होता. हीं दोन्ही ठिकाणें एकच आहेत, असें कित्येक दिवस वाटत होतें. परंतु दोन वर्षांपूर्वी सारिपुत्र व मोग्गलायन ह्यांच्या अस्थींचा जो सोहळा सांचीला झाला, त्या वेळीं हा भ्रम पुष्कळसा दूर झाला आणि सांची हें मध्य-भारतांत भोपाळजवळ असून रांची हें बिहारमध्यें आहे हें लक्ष्यांत आलें. तरीपण रांचीं हें एखादें बंदर असावें, अशा प्रकारची भावना—कां कोण जाणे—मनामध्यें घर करून बसली होती. अखेर बिहारमधील चांडिल ह्या गांवीं झालेल्या ‘ सर्वोदय समाजा ’च्या संमेलनाचा अहवाल तयार करण्यासाठीं रांचीला मुक्काम ठोकावा लागला, तेव्हां सगळे घोटाळे दूर होऊन डोक्यांत प्रकाश पडला. बिहार सरकारची उन्हाळी राजधानी म्हणून हें शहर इकडे प्रसिद्ध आहे. नेहमींची राजधानी जें पाटणा शहर त्यापासून हें दक्षिणेस सुमारें सव्वाशें मैल दूर आहे. ह्याच्या आजू-बाजूस आदिवासी प्रदेश असल्यामुळें इंग्रजांनीं हा भाग संरक्षित प्रदेश ठरवला होता. येथें कसलीही राजकीय

चळवळ करणें अशक्य होतें. ह्यामुळें स्वराज्य मिळेपर्यंत ह्या भागांत कसलीच राजकीय जागृति झालेली नव्हती. ह्या भागांत समुद्रसपाटी-पासून २२०० फूट उंचावर असलेलें एवढें मोठें पठार अन्यत्र नसल्यामुळें युरोपियन लोकांनीं येथें आपली वसाहतच उघडली होती. ह्यामुळें ह्या जिल्ह्यांतील रस्ते उत्कृष्ट, डांबरी आहेत. शेकडों मैल पसरलेल्या डांबरी रस्त्यांचें इतकें मोठें जाळें अन्यत्र क्वचितच पाहावयास मिळेल.

आपल्याला रोमन (इंग्रजी) लिपींतून आपल्या देशांतील नांवें वाचावीं लागतात, ह्यामुळें मेरठचें ‘ मीरत ’, मुंबईचें ‘ बंबई ’, पुण्याचें ‘ पूना ’, हावडाचें ‘ हौरा ’, तिरुविदांकुरचें ‘ त्रावणकोर ’, कुळेंचें ‘ कोलेम ’ अशीं गमतीदार रूपें आपण करतों. जेव्हां झाँसीचा झांशी, साँचीचा सांची व राँचीचा रांची असा उच्चार आपण करतों, तेव्हां तेथील लोकांना तो ऐकून हसूं येतें. राँचीमधील अनुस्वार अगदीं कोमल आहे.

सुमारें सव्वा लाख लोकवस्ती असलेलें हें शहर दहा मैलपर्यंत पसरलेलें आहे. तसें पटना शहरही अनेक मैल लांब पसरलेलें आहे, परंतु पाटण्याला रुंदी जवळ-जवळ नाहींच. सगळीं घरें अरुंद रस्त्याच्या कडेला दाटी-वाटीनें कशीं-बशीं जीव धरून बसल्यासारखीं वाटतात. परंतु रांचींतील घरें एक-मेकांपासून प्रशस्तपणें दूर वसलेलीं व आरामशीर आहेत. दोन वेग-वेगळ्या विभागांमध्यें पुष्कळ अंतर आहे; एवढेंच नव्हे, तर दोन भागांच्या दरम्यान शेती-वाडीही पसरलेली आहे. ह्यामुळें लहान-लहान उपनगरांचें हें शहर बनलें आहे असें वाटतें. येथील सगळे रस्ते डांबरी व भरपूर रुंद आहेत. येथील म्युनिसिपालिटीला सुमारें सव्वाशें-दीडशें मैल लांबीच्या रस्त्यांची निगा ठेवावी लागते, ह्यावरून ह्या शहराच्या विस्ताराची कल्पना येईल. बिहारमधील इतर ठिकाणांच्या मानानें येथील हवा थंड असते असें म्हणतात; परंतु आमच्या मुक्कामांत मात्र आम्हांला त्या थंडीचा अनुभव आला नाहीं.

रांची हिल

येथें पाहाण्यासारखें काय आहे, असें जर तुम्ही येथील मंडळींना विचाराल, तर ते सांगतील, " शहराजवळच्या दोन टेकड्या आणि वेड्यांचं इस्पितळ हींच प्रेक्षणीय स्थळं आहेत." आणि त्यांचें हें म्हणणें कांहीं खोटें नाहीं. शहराच्या एका टोकास असलेली रांची हिल् व दुसऱ्या टोकास असलेली टागोर हिल्. दोन्ही सुंदर आहेत. ह्यांपैकीं रांची हिल् ही ज्यास्त उंच असून तिच्यावर जाण्यासाठीं पुण्याच्या पर्वतीसारख्या व्यवस्थित पायऱ्या बांधण्यांत आलेल्या आहेत. ह्यामुळें टेकडी चढतांना त्रास होत नाहीं. १९४२ सालीं लोकांनीं ह्या टेकडीवर राष्ट्रीय झेंडा चढवला होता. (ही गोष्ट तेथील लोक मोठ्या अभिमानानें सांगतात.). परंतु सरकारनें तो नंतर काढून टाकला होता. पुढें १९४७ सालीं १४ ऑगस्ट रोजीं रात्रीं १२ वाजतां मोठ्या इतमामानें ह्या ठिकाणीं तो झेंडा फडकवण्यांत आला. ह्या शहरांतील सर्वांत उंच जागा हीच असल्यामुळें राष्ट्रीय ध्वज फडकवण्याचा मान तिलाच मिळणें योग्यच होतें. तेथें हवा खाण्यास येणाऱ्या लोकांना बसण्यासाठीं बाकें ठेवण्यांत आलीं आहेत. एक मारुतीचें, एक महादेवाचें व एक देवीचें अशीं तीन देवळेंही वर आहेत. कर्नल ऑस्ले ह्यानें विश्रांतीसाठीं बांधलेल्या 'समर हाऊस'चें महादेवाच्या देवळांत रूपान्तर झालें आहे. मारुतीच्या देवळांतील मारुतीला झुपकेदार काळ्या-भोर मिश्या आहेत. तो मिशाळ मारुती पाहून गंमत वाटते. ह्या टेकडीवरून आसमंतांत पसरलेल्या रांची शहराची शोभा फार सुंदर दिसते. अधून-मधून विखुरलेल्या गर्द झाडींतून डोकावणारीं घरें व लुकलुकणारे दिवे मोठे मोहक वाटतात. तांबड्या-पिवळ्या शेतांमधून जाणारे डांबरी रस्ते काळ्या-भोर नागांप्रमाणें सळसळत आहेत असा भास होतो; आणि सरकारी नोकरांसाठीं बांधण्यांत आलेली टुमदार कॉलनी बगीच्यांतील टवटवीत फुलांप्रमाणें लक्ष्य वेधून घेते.

टागोर टेकडी

टागोर टेकडी शहराच्या मुख्य भागापासून थोडी दूर आहे. उंचीलाही फारशी नाहीं. परंतु तिच्यांतील नैसर्गिकपणा मला मोहक वाटला.

ह्या टेकडीच्या मध्यावर टागोर कुटुंबाचा एक बंगला आहे. विश्वकवि रवीन्द्रनाथ ठाकूर हे ह्या टेकडीवर अनेक दिवस राहून गेले होते, ह्यामुळें हिला टागोर हिल् असें नांव पडलें. तिचें पूर्वीचें नांव मोराबादी हिल् असें होतें. तेथें मोठ-मोठ्या प्रचंड शिळा एक मेकींवर रचून जणूं एक ढिगाराच बनवला आहे असें वाटतें. वर जाण्यास पुरेसा मार्ग नाहीं. सामान्य डोंगरावर चढल्याप्रमाणें चढून जावें लागतें. परंतु त्यामुळें एक वेगळाच आनंद अनुभवास येतो. टेकडीच्या माथ्यावर एक चबुतरा बांधण्यांत आलेला आहे. येथें बसून अस्तास जाणाऱ्या सूर्याचें दर्शन घेणें हें जीवनांतील एक महान् सुख समजलें पाहिजे. रवीन्द्रनाथ ठाकूर ह्या चबुतऱ्यावर बसून निसर्गाचें ध्यान करीत असतील ह्या कल्पनेनें त्या स्थानाबद्दल मनामध्यें एक वेगळीच आत्मीयता निर्माण केली. ह्या टेकडीपासून जवळच ‘ रामकृष्ण मिशन ’ चा आश्रम आहे.

आझाद हायस्कूल

हीं दोन स्थळें जरी प्रेक्षणीय असलीं, तरी माझ्या मनांत त्यांच्याबद्दल विशेष जिव्हाळा निर्माण झाला नाहीं. कारण माझ्या डोक्यांत रांची नांव ज्या महान् व्यक्तीच्या नांवाशीं निगडित झालेलें होतें, त्यांच्या निवासस्थानाचें दर्शन मला अधिक महत्त्वाचें वाटलें. अनेक वर्षांपूर्वी मीं असें वाचलें होतें, कीं पहिल्या महायुद्धाच्या वेळीं मौलाना अबुल कलम आझाद ह्यांना इंग्रज सरकारनें रांचीला चार वर्षें नजरबंद करून ठेवलें होतें. १९१८ ते १९२२ पर्यंत मौलानासाहेब येथें होते. ते ज्या खोपटांत राहात असत, त्या जागीं आतां मोठी इमारत बनली आहे. परंतु त्यांनीं तेथें स्थापन केलेली ‘ मदरसा इस्लामिया ’ (इस्लामी धर्माचें शिक्षण देणारी शाळा) मात्र चांगल्या स्थितींत आहे. तेथें सध्या ‘ आझाद हायस्कूल ’ नांवाची इंग्रजी शाळाही चालते. ज्या मशिदीमध्यें मौलानासाहेब/ नमाज पढत व लोकांना कुराणाचा अर्थ समजावून सांगत, ती मशीदही आम्हीं पाहिली. हिंदु-मुस्लिम ऐक्याचें जें दर्शन १९२० सालीं जगाला झालें, त्या संदर्भांत मीं ह्या स्थळांकडे पाहिलें, तेव्हां मला मोठी धन्यता वाटली. त्यानंतर परिस्थिति बदलून सारें वातावरण विषमय झालें खरें, परंतु आमच्या राष्ट्रीय जीवनांत मैत्रीचा व

प्रेमाचा जो मधुर कालखंड येऊन गेला, त्याची स्मृति म्हणून मला ह्या स्थानाचें महत्त्व विशेष वाटलें.

वेड्यांच्या इस्पितळांत बंगाली कवि

मौलाना आझादांप्रमाणेंच दुसरें जें नांव ह्या शहराशीं निगडित होऊन माझ्या मनांत स्थायी बनलें होतें, तें म्हणजे बंगालचे सुप्रसिद्ध राष्ट्रीय कवि काजी नझरुल इस्लाम ह्यांचें. कविसम्राट् रवीन्द्रनाथ ठाकुरांनंतर बंगाली भाषेचा महान् कवि म्हणून आजही ज्यांचें नांव दोन्ही बंगालमध्यें घेतलें जातें, त्या काजी नझरुल इस्लामना वेड लागल्यामुळें रांचीच्या वेड्यांच्या इस्पितळांत ठेवण्यांत आलें असल्याचें मीं वाचलें होतें. ह्यामुळें रांचीला जाण्याचें ठरतांच बंगालच्या ह्या बंडखोर कवीचें दर्शन घ्यावयाचा मीं मनाशीं निश्चय केला. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं तुरुंगवास, उपासमार अश्या हाल-अपेष्टा सहन करणाऱ्या, इंग्रजी सत्तेविरुद्ध व सामाजिक नि आर्थिक विषमतेविरुद्ध बंड करण्यास लोकांना प्रवृत्त करण्यासाठीं तलवारीप्रमाणें लेखणी गाजविणाऱ्या ह्या भावनाप्रधान कवीच्या नशिबीं आपला प्रिय भारत स्वतंत्र झाल्याचें पाहाणें नसावें, जिवंत असूनही त्याचा अनुभव घेतां येऊं नये, ह्यापरता दैवदुर्विलास तो कोणता ? अर्थात् मनांत असाही एक विचार येऊन गेला, कीं नझरुलला फाळणीपूर्वींच वेड लागलें, हें एका परीनें बरेंच झालें; नाहींतर नंतरच्या कत्तली त्याला पाहवल्या नसत्या आणि ज्या हिंदु-मुस्लिम ऐक्यासाठीं त्यानें प्राणपणानें धडपड केली, त्याचा असा भयंकर शेवट झालेला पाहून त्याला अतोनात वेदना झाल्या असत्या आणि कदाचित् नंतर त्याला आजच्यापेक्षां भयानक वेड लागलें असतें. आज पाकिस्तानी जनता जरी नझरुलला आपला महाकवि समजून त्याचा उदो-उदो करीत असली, तरी नझरुल मात्र कधींच पाकिस्तानांत गेलेला नाहीं आणि त्याची कविताही पाकिस्तानला पचण्यासारखी नाहीं, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

त्या इस्पितळांतील शहाणे

महाराष्ट्रांत जसें ठाणें, तसें बिहारमध्यें रांची येथील वेड्यांचें इस्पितळ अत्यंत प्रसिद्ध आहे.

थंड हवेचें ठिकाण असल्यामुळ युरोपियन व श्रीमंत बंगाली वेडेही येथें येतात. रांची शहरापासून पांच मैलांवर काँके ह्या नांवाचा जो भाग आहे, तेथें हें इस्पितळ आहे. ह्याला आतां 'मानसिक चिकित्सालय' असें हिंदी नांव देण्यांत आलें आहे. ह्याचे भारतीय व युरोपियन असे दोन विभाग असून ते एकमेकांपासून पुष्कळच दूर आहेत. युरोपियन विभागांत हल्लीं युरोपियन फार थोडे उरले आहेत. बहुतेक सर्व श्रीमंत व प्रतिष्ठित हिंदी लोकच सध्या तेथें आहेत. ह्यामुळें युरोपियन व भारतीय असे विभाग नांवालाच असून ते वस्तुतः श्रीमंत व गरीब असेच आहेत. भारतीय विभागांत आम्हांला कोणासच भेटायचें नव्हतें, म्हणून आम्हीं फक्त युरोपियन विभागच पाहिला. तेथें आक्रमक वेडे फारसे दिसले नाहींत. फक्त त्यांच्या डोळ्यांवरूनच, म्हणजे डोळ्यांतील थंडपणा पाहून, ओळखायचें, कीं ते वेडे आहेत; बाकी दुसरें कांहीं साधन नाहीं. सुतारकाम, विणकाम, चित्रकला, ह्या विभागांत काम करणारे वेडे पाहिले, कीं ह्यांना वेडे कां म्हणायचें तेंच कळत नाहीं. विशेषतः वेड्या चित्रकारांचीं कांहीं चित्रें इतकीं उत्कृष्ट व अव्वल दर्जाचीं आहेत, कीं तीं तेथें ठेवलीं आहेत, म्हणूनच तीं वेड्यांनीं काढलीं, आहेत असें समजावें लागतें.

थोडा वेळ इकडे-तिकडे फेर-फटका मारून आम्ही नझरुल इस्लामना पाहाण्यास गेलों. इस्पितळाच्या तटाच्या बाहेरील बाजूस, स्वतंत्र बंगल्यांत त्यांची सोय करण्यांत आलेली होती. त्यांच्यासोबत त्यांची धर्मपत्नी व पुतण्या हीं होतीं. त्यांची पत्नी हिंदु असून इतक्या वर्षांनंतरही तिनें आपला धर्म सोडलेला नाहीं, ह्यावरून कवीच्या सहिष्णुतेची कल्पना येते. नवऱ्याच्या वेडाचा धक्का तिच्याही डोक्याला बसला आहे, ह्यामुळें ती अर्धमिष्टाप्रमाणें पडून असते, असें मीं ऐकलें होतें. परंतु आम्ही गेलों त्या वेळीं ती पडल्यापडल्या लेखन-वाचनाचें काम करीत होती. आम्हीं सुपरिंटेंडेंटकडून खास परवानगी मिळवली होती, ह्यामुळें कवीच्या पुतण्यानें खिडकीचें दार उघडून आम्हांला कवीचें दर्शन घडवलें. व्यवस्थित तुळतुळीत दाढी करून, केस मागें परतवून, कविवर्य पलंगावर मांडी घालून बसले होते. आम्हीं त्यांना नमस्कार केला. परंतु त्यांनीं त्याला प्रत्युत्तर दिलें नाहीं.

त्यांचा चेहेरा अगदींच निर्विकार, थंड दिसला. सावळा रंग, भरदार शरीर व नमुनेदार बंगाली डोळे, असें थोडक्यांत त्यांचें वर्णन करतां येईल. डोक्याच्या पुढच्या भागांत टक्कल पडूं लागलें आहे. त्यांना पाहातांच मला उर्दूचे आजचे सर्वश्रेष्ठ कवि जोश मलीहाबादी ह्यांची आठवण झाली. अर्थात् त्यांच्यांत तसें कांहीं साम्य नाहीं, परंतु ठेंगू शरीर व टक्कल पडलेलें डोकें, ह्यांमुळें मला त्यांची आठवण झाली असावी. दोन मिनिटें नझरुलना पाहिल्यानंतर आम्ही तेथून निघालों. श्री. नझरुल इस्लाम हे कांहीं बोलत नाहींत. घुम्याप्रमाणें गप्प बसून राहातात. सुभाषबाबूंच्या बंगाली भाषेचा हा बंडखोर कवि असा निरुपयोगी होऊन पडलेला पाहून मन विषण्ण झालें आणि त्या विषण्णतेचें ओझें मनावर घेऊनच आम्ही परत फिरलों.

दोन वैशिष्ट्यपूर्ण बंगले

काँकेच्या पागलखान्याकडे ऊर्फ मानसिक चिकित्सालयाकडे जातांना वाटेंतील टेकडीवर दोन मजेदार बंगले दिसतात. ह्यांतील एक बंगला आगबोटीच्या आकाराचा असून दुसरा विमानाच्या आकाराचा आहे. हे आकार इतके हुबेहूब साधले आहेत, कीं दुरून पाहिल्यास हे बंगले नसून खरोखरीची आगबोट व विमान आहे असा क्षणभर भास होतो. खालीं काळा फत्तर असलेल्या टेकडीवर हे बंगले कसे बांधले असतील ह्या कल्पनेनें मन थक्क होतें.

बिहारची जाति-समस्या

बिहारची झळ दिल्लीला

ता. १८ एप्रिल, १९५४ रोजीं सायंकाळीं बिहारमधील बोधगया ह्या जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्रीं 'सर्वोदय संमेलना'च्या निमित्तानें आलेल्या पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंचें एक जाहीर भाषण झालें. त्यांत बिहारमधील जातीयवादाचा उल्लेख करून ते म्हणाले, "जातीयवादाचं जितकं हिडीस स्वरूप बिहारमध्यें दिसून येतं, तितकं अन्यत्र कुठेंच आढळत नाहीं. ही जातीयवादाची आग इतकी प्रखर आहे, कीं तिचे चटके आम्हांला दिल्लींत जाणवत असतात. तरी कृपा करून हें जातीयतेचं विष तुम्ही आपल्या शरीरांतून त्वकर काढून टाका."

अशा प्रकारें बिहारमधील जातीयवाद हा अखिलभारताच्या चिंतेचा विषय बनलेला आहे. जातीयतेच्या उच्चाटनासाठीं सनातनी समाजाविरुद्ध बंड करणाऱ्या भगवान् गौतम बुद्धाच्या कर्मभूमींत ह्या विसाव्या शतकामध्यें जातीयतेनें इतकें थैमान घालावें ह्यापेक्षां अधिक दुर्दैवाची गोष्ट कोणती? डॉक्टर राजेंद्रप्रसाद व बाबू जयप्रकाश नारायण ह्यांच्यासारखे साधुचरित पुढारी अथवा महापंडित राहुल सांकृत्यायन व डॉक्टर अमरनाथ झा ह्यांच्यासारखे थोर विद्वान् ज्या बिहारनें भारताला दिले, त्याच बिहारला आपली जातिसमस्या न सोडवल्याबद्दल इतरांकडून उपदेशाचे घोट घ्यावे लागावेत, हा दैवदुर्विपाकच नव्हे तर काय?

बिहारी जातीयवादाचें स्वरूप

भारतांतील प्रत्येक प्रांतांत ह्या ना त्या स्वरूपांत जातीयवाद अस्तित्वांत असल्याचें आपणांला दिसून येतें. दक्षिण-भारतांत त्याचें स्वरूप ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादांतून

व्यक्त होतें; कारण दक्षिणेंतील ब्राह्मण विद्येच्या बाबतींत खूप पुढारलेला आहे आणि त्या ज्ञानाच्या जोरावर तो आजपर्यंत इतर जमातींचें नेतृत्व करीत आला आहे. हें नेतृत्व जोंपर्यंत ज्ञानात्मक व आध्यात्मिक स्वरूपाचें होतें आणि ब्राह्मणाला ऐहिक सुख-संपत्तीचा मोह जडला नव्हता, तोंपर्यंत त्याची प्रतिष्ठा कायम राहिली व त्याच्या नेतृत्वाविरुद्ध कोणाला तक्रार करावीशी वाटली नाहीं. परंतु जेव्हां ब्राह्मणानें आपलें ज्ञान हें भौतिक ऐश्वर्यप्राप्तीचें एक साधन बनविलें आणि तो नांवाचा ब्राह्मण राहून व्यवहारांत व्यापारीपेशा वैश्य, क्षत्रिय अथवा नोकरपेशा शूद्र बनला, तेव्हां त्याच्या नेतृत्वाला तडा गेला आणि इतर जमातींनीं त्याच्याविरुद्ध बंड पुकारलें. ह्यांतूनच ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद निर्माण झाला. ह्या वादाचा निकाल समाधानकारकपणें लावायचा असेल, तर ब्राह्मणानें आपल्या वांशिक श्रेष्ठत्वाचा तरी त्याग केला पाहिजे किंवा ऐहिक ऐश्वर्याचा लोभ तरी सोडला पाहिजे. त्याप्रमाणें जेथें ब्राह्मणवर्ग सत्तास्पर्धेतून बाहेर पडला, तेथें त्याच्या विरुद्ध असलेलें वातावरण निवळूं लागलें असा अनुभव येत आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रामध्यें निवडणुकांच्या अथवा इतर सत्तास्पर्धेतून ब्राह्मणांनीं अंग काढून घेतांच येथील जातीय वातावरण पुष्कळच निवळलें, असा अनुभव आला आहे.

परंतु उत्तर-भारतांत ब्राह्मणाचें वर्चःस्व असें कधींच नव्हतें. ह्याला कारण कदाचित् गौतमबुद्ध व महावीर ह्या अवैदिकांची शिकवण हेंही असेल किंवा ब्राह्मणांमधील ज्ञानोपासनेचा अभाव हेंही असूं शकेल. तेथें ब्राह्मण हा अनेकदा शूद्रापेक्षांही मागासलेला आढळतो. आपल्याकडे येणारे पुरभैये हे उत्तर-भारतांतील ब्राह्मण आहेत व ते स्वतःला पंडित म्हणवून घेतात, हें आपणांपैकीं अनेकांना माहीत नसेल. त्यांना पाहिल्यानंतर हे लोक ब्राह्मण असतील हें आपणांला खरेंही वाटणार नाहीं. परंतु अशा प्रकारचे ब्राह्मण उत्तर-भारतांत सर्वत्र सापडतात, ह्यांत शंका नाहीं. तेव्हां जेथें ब्राह्मण इतका मागासलेला आहे, तेथें त्याच्याविरुद्ध कोणाच्याही मनांत असूया निर्माण होण्याऐवजीं कींवच उत्पन्न होणें ज्यास्त साहजिकच आहे.

अशा प्रकारें बिहारच्या राजकारणांतून ब्राह्मण हा आपोआपच गळून पडतो. ह्या प्रदेशांत कांहीं ठिकाणीं ब्राह्मण हा बहुसंख्य आहे, ह्यामुळें निवडणुकांमध्यें

ब्राह्मण उमेदवार निवडून येऊं शकतो. परंतु अशा ब्राह्मणांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच असते. अर्थात् सत्तेचा समतोल (Balance of Power) राखण्याच्या कामीं ह्या संख्येचा उपयोग होऊं शकतो. ह्यामुळें ब्राह्मण अल्पसंख्य असूनही मंत्रिमंडळांतील एखादी जागा तो सहज पटकावूं शकतो.

भूमिहार व रजपूत ह्यांच्यांतील संघर्ष

बिहारमध्यें सध्या चार जमाती विशेष प्रमुख मानल्या जातात : भूमिहार, रजपूत, कायस्थ व ब्राह्मण. आजपर्यंत तेथें कायस्थांचें वर्चःस्वच प्राधान्येंकरून होतें. परंतु आतां बहुमताची लोकशाही सुरू झाल्यापासून कायस्थ व ब्राह्मण मागें पडले आणि भूमिहार व रजपूत ह्यांचें प्रस्थ वाढलें. भूमिहार व रजपूत हे दोघेही शेतकरी पेशांतीलच ; परंतु भूमिहार हे स्वतःला ब्राह्मण म्हणवतात आणि जानवें वगैरे घालून आपलें ब्राह्मणत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांच्यांत सधन जमीनदारांची संख्याही पुष्कळ आहे आणि शिक्षणाचा प्रचारही खूप आहे. रजपूत स्वतःला क्षत्रिय म्हणवीत असले, तरी त्यांचा पेशाही शेतकीचाच आहे व त्यांच्यांतही पैसा व शिक्षण ह्यांचें प्रमाण पुष्कळ आहे. ह्यामुळें ह्या दोन जमातींमध्यें सत्तास्पर्धा सदैव चालू असते. प्रादेशिक काँग्रेसमध्यें हे दोन्ही गट तुल्यबल आहेत ; ह्यामुळें जो गट ब्राह्मण-कायस्थांची मदत मिळवूं शकेल, तो तेथें सत्तारूढ होऊं शकतो. बिहारचे सध्याचे मुख्यमंत्री श्रीकृष्णसिंह हे भूमिहार गटाचे नेते असून, अर्थमंत्री श्री. अनुग्रहनारायण सिंह हे रजपूतांचे पुढारी आहेत. हे दोघेही साठीच्या आस-पासचे वृद्ध गृहस्थ आहेत ; परंतु सत्तेचा हव्यास दोघांनाही सारखाच दिसतो. श्रीकृष्णसिंहांनीं इतर गटांचा पाठिंबा मिळवून आपलें आसन स्थिर करून घेतलें आहे आणि त्यांना उखडून टाकून मुख्यमंत्रिपद मिळविण्याच्या कारवाया करण्यांत अनुग्रहबाबू गुंतलेले असतात. त्यांच्या ह्या मारामाऱ्यांना काँग्रेस हायकमांडचे लोकही विटून गेले आहेत.

काँग्रेस-जनांच्या ह्या अंतर्गत लाथाळ्यांमुळें प्रत्यक्ष कार्याची मात्र भयंकर हानि होते. उदाहरणार्थ, भूदानयज्ञाच्या कामीं हातभार लावण्याची ह्या दोन्ही गटांना इच्छा आहे ; परंतु त्याचें श्रेय फक्त आपल्याच गटाला मिळावें ह्या हेतूनें दुसऱ्या

गटाचा पुढारी भूदानासाठीं जमीन मागण्यास गेला असतां, त्याला जमीन मिळूं नये, म्हणून त्याच्या विरुद्ध गटाचे लोक प्रयत्न करीत असतात. कामाचें वाटोळें झालें तरी हरकत नाहीं, परंतु दुसऱ्या जमातीला श्रेय मिळतां कामा नये, अशी धडपड सर्वत्र दिसून येते.

नोकऱ्यांतील वशिलेबाजी

ह्या जातीयवादाचें सर्वांत भेसूर स्वरूप सरकारी नोकऱ्यांच्या वेळीं दिसून येतें. तसें पाहिल्यास आपल्या मुंबई प्रदेशांतही लायक ब्राह्मणाला सरकारी नोकरी मिळणें दिवसें-दिवस अशक्य होत चाललें आहे. परंतु ही परिस्थिति ओळखून येथील ब्राह्मण तिच्यांतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशी स्थिति दक्षिण-भारतांतही पुष्कळ प्रमाणांत आढळते. परंतु येथें फक्त ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर एवढाच भेद मुख्यत्वेंकरून केला जातो. बिहारमध्यें उमेदवाराची जातच नव्हे, तर पोटजातही पाहिली जाते. ज्या मंत्र्याकडे जें खातें असेल, त्या खात्यांत त्या मंत्र्याच्या जातीच्या माणसालाच नोकरी मिळायची, असा जणूं अलिखित नियमच तेथें बनून गेला आहे. ह्यामुळें लायकी हा मुद्दा गौण बनून, जात हा मुख्य व एकमेव मुद्दा बनला आहे. अशाप्रमाणें सरकारी नोकऱ्यांतून वशिलेबाजीचा अगदीं बुजबुजाट झाला आहे. एकदा जातीयवादाचा स्वीकार केला, कीं तो कोणत्या थराला घेऊन जातो, ह्याचें उदाहरण म्हणून बिहारकडे बोट दाखवतां येईल. तेथें माणसाचें मूल्य माणूस ह्या नात्यानें करण्यांत न येतां त्याच्या जातीवरून केलें जातें. ह्या सर्वांत गमतीची गोष्ट अशी, कीं बहुसंख्य असलेली गवळी अथवा गुराखी जमात ह्या सत्तास्पर्धेत कोठेंच दिसत नाहीं. ही जमात शिक्षण व पैसा ह्यांत मागासलेली असल्यामुळें तिला कोणी विचारीतच नाहीं. आणि एक प्रकारें ब्राह्मणेतरांतील ब्राह्मण समजले गेलेले व पुढारलेल्या वर्गांचे लोकच सर्व राजकारण खेळवीत आहेत आणि बहुसंख्य जनता असहायपणें सर्व पाहात आहे.

एक मजेदार अनुभव

जातीयवादांतून निघालेलें उच्च-नीचतेचें व सोवळ्या-ओवळ्याचें प्रस्थही येथें पदो-पदीं दृष्टोत्पत्तीस येतें. ह्या बाबतींत मला स्वतःला आलेला एक अनुभव मोठा

मजेदार आहे. गया स्टेशनवरील एका हॉटेलांत मी गेलों आणि तेथें पुरी-भाजी खाल्ली. त्यानंतर हात धुण्यासाठीं उठलों. लोकांच्या हातांवर पाणी घालणारा मुलगा त्या वेळीं कोठें तरी कामानिमित्त गेला होता, म्हणून मीं डाव्या हातानें त्याचें तें भांडें घेऊन हात धुतला आणि लस्सी पिण्यासाठीं म्हणून परत जागेवर येऊन बसलों. इतक्यांत तेथें काम करणाऱ्या इतरांचें लक्ष्य माझ्याकडे गेलें आणि जणूं एखादा भयंकर अपराध घडला असावा अश्या नजरेनें ते एक-मेकांकडे पाहूं लागले. आपापसांत त्यांची कांहीं कुजबूजही झाली आणि तो मुलगा तेथें येतांच त्यानें माती घेऊन तें भांडें स्वच्छ घासून धुवून टाकलें. त्या सगळ्याचा कांहीं अर्थच माझ्या ध्यानांत येईना. त्या लोकांना विचारावें, तर नसता प्रसंग ओढवण्याची भीति, म्हणून मीं जणूं कांहीं आपण पाहिलेंच नाही अशा प्रकारें गप्प बसलों व पैसे देऊन बाहेर पडलों. नंतर मीं इतर बिहारी मित्रांना ह्यासंबंधीं विचारलें, तेव्हां ते म्हणाले, "कदाचित् त्यांना तुमच्या जातीविषयीं शंका आली असावी."

"म्हणजे मी हरिजन असेन असं त्यांना वाटलं असेल, असंच कीं नाहीं?" मीं स्पष्ट सवाल केला.

"तेंही शक्य आहे. परंतु तुम्ही पायजमा घालतां, त्यामुळें तुम्ही मुसलमान असाल, अशीही शंका त्यांना आली असावी. इथें कोणताही हिंदु पायजमा घालीत नाहीं. तो धोतर तरी नेसतो किंवा सुटा-बुटांत असला तर पँट तरी घालतो. इथले मुसुलमानच मुख्यतः पायजमा वापरतात. ह्यामुळें त्याला आपलं भांडं विटाळल्याचा संशय आला असणं शक्य आहे."

दुसरे एक मित्र म्हणाले, "आमच्याकडे जेवतांना दोन्ही हात वापरतात. ह्यामुळें जेवणाऱ्या प्रत्येक माणसाचे दोन्ही हात खरकटे आहेत, असं गृहीत धरण्यांत येतं. तुम्हीं जरी डावा हात खरकटा केला नसला, तरी तो खरकटाच होता असं धरून त्यांनीं आपलं भांडं शुद्ध करून घेतलं."

तिसरे एक मित्र म्हणाले, "आमच्याकडे डावा हात हा अपवित्र मानला जातो. ह्यामुळें त्या हातानें पाण्याला स्पर्श केल्यास तें पाणी व भांडं विटाळतं, असा

समज आहे. जेवतांनाही तुम्हांला अनेक लोक उजव्या हातानेंच पाणी पितांना दिसतील. ”

अशा प्रकारें तिघांनीं तीन अर्थ लावले. परंतु तिन्हींचें तात्पर्य एकच होतें, कीं तें भांडें विटाळलें होतें, अपवित्र झालें होतें !

आपल्यापेक्षां इतरांना तुच्छ अथवा कमी प्रतीचें लेखण्यांत कांहीं दोष आहे, पाप आहे ह्याची कल्पना भारतवर्षामध्यें फारच थोड्यांना असेल. परंतु आपल्या ह्या मनोवृत्तीचें जाहीर प्रदर्शन हॉटेलसारख्या सार्वजनिक ठिकाणीं प्रत्यक्ष त्या व्यक्तीच्या डोळ्यांसमोर करण्याचा निगरगट्टपणा कदाचित् बिहारखेरीज इतरत्र पाहावयास मिळणार नाहीं. ह्या वृत्तीमुळें तेथील प्रत्येक जमात म्हणजे जणूं एक स्वतंत्र राष्ट्रच आहे. प्रत्येक जण दुसऱ्याला तुच्छ लेखतो. आपण एका भारतमातेचीं लेकरें आहोंत, ही जाणीव कोणाच्याच वागणुकींतून दिसून येत नाहीं.

कामें कशीं करून घेतलीं जातात ?

ह्या जातीयवादाच्या आधारावर सरकारी मंत्र्यांकडून आपलीं कामें कशीं करवून घेतलीं जातात, ह्याचा एक मोठा मजेदार अनुभव पाटण्याच्या एका मित्रानें मला सांगितला. ते म्हणाले, “ आमच्या इथें मंत्र्याकडून एखादं काम करवून घ्यायचं असलं, तर त्यासाठीं कचेरींत जाऊन कांहीं फायदा नाहीं. मंत्र्याच्या बंगल्यावरच तुम्हांला गेलं पाहिजे. तुम्ही कचेरींत कांहीं काम करा अथवा न करा. तुम्ही जर नियमितपणें आपल्या खात्याच्या मंत्र्याच्या बंगल्यावर जाऊन हजेरी लावलीत, तर तुमची नोकरी व बढती निश्चित झाली म्हणून समजा. अर्थात् त्यासाठीं देखील तुम्ही त्या मंत्र्याच्या जातीचे असणं आवश्यक आहे. माझा एक अनुभव मी तुम्हांला सांगतों : कचेरीच्या मार्फत जेव्हां माझं कांहीं काम होईना, तेव्हां मी एका मंत्र्याच्या बंगल्यावर जाऊन हजर झालों. तेथें जाऊन पाहतों, तों लोकांची ही गर्दी ! त्या ठिकाणीं एक मजेदार दृश्य मला दिसलं. एक चांगला धडधाकट व सुखवस्तु गृहस्थ एका पायावर उभा राहून, गळ्यांतील जानवं सदऱ्याबाहेर लोंबत ठेवून, दोन्ही हात जोडून, कंबरेंत वाकून, कितीतरी वेळ मंत्र्यासमोर उभा होता. मंत्रिमहाशयांनीं हातांतील काम संपल्यावर त्या गृहस्थाकडे एक कृपाकटाक्ष टाकला आणि विचारलं,

'काय काम आहे तुझं ?' तो नम्रपणें उद्गारला, 'सरकार, निवडणुकीच्या वेळीं आमच्या इथें आपण आलां होतां; त्यानंतर पुन्हा आलां नाहींत, म्हणून दर्शन करण्यासाठीं आलों होतों. काम-बीम कांहीं नाहीं.' अशा प्रकारें एक-दोनदा उडवा-उडवीचीं उत्तरं दिल्यानंतर त्यानें आपलं खरं काम सांगितलं. मुलाची बदली त्याच्या गांवापासून दूर झाली होती, ती रद्द करून पुन्हा त्याला आपल्या गांवींच नेमण्यांत यावं, ह्यासाठीं खटपट करण्याकरतां तो आला होता. त्याचं काम करून देण्याचं आश्वासन मंत्र्यानें दिल्यानंतर त्याच्या पायाची धूळ आपल्या मस्तकाला लावून तो गृहस्थ निघून गेला. अर्थात् त्यानें आपलं जानवं बाहेर काढून आपण भूमिहार असल्याबद्दल मंत्र्याची खात्री आधींच पटवून दिली होती, हें तुमच्या लक्ष्यांत आलं असेलच."

मंत्र्यांच्या बाबतींत कांहीं लोक किती दीनता व लाचारी दाखवतात ह्याचें एक उदाहरण ह्या मित्रांनीं सांगितलें. ते म्हणाले: "मंत्र्याकडून काम करवून घ्यायचं असलं, तर हे लोक किती खालीं उतरतात हें पाहाण्यासारखं आहे. एका गांवचे एक आमदार आहेत. ते अत्यंत अनीतिमान् म्हणून बदनाम आहेत. परंतु आपली आमदारी कायम टिकावी, ह्यासाठीं आपल्या गांवीं येणाऱ्या मंत्र्याचे पाय धुवून तें पाणी सर्व लोकांसमक्ष तीर्थ म्हणून ते स्वतः पितात व इतरांनाही प्यावयास लावतात. अशा प्रकारें मंत्र्यावर दडपण येतं आणि पुन्हा पुढील खेपेस त्यांना तिकीट मिळतं." सदर गृहस्थांचें नांव-गांवही माझ्या मित्रांनीं मला सांगितलें होतें.

जातीयवादांतून निघालेलें शिवा-शिवीचें व बाह्य कर्मकांडाचें प्रस्थही येथें बरेंच मोठें आहे. देवघरच्या पंड्यांनीं आचार्य विनोबा भावे ह्यांच्यावर हरिजनांसमवेत मंदिरांत प्रवेश करण्याच्या प्रयत्नाबद्दल कसा अमानुष हल्ला चढवला होता, हें आपणांपैकीं अनेकांच्या स्मरणांत अजून ताजें असेल. शेंडी-जानव्याचें प्रस्थही येथें भयंकर आहे! शेंडी-जानवें नसणारा माणूस हिंदु कसा राहूं शकतो, ह्याचें कोडें बिहारी लोकांना सुटत नाहीं. ह्या शेंडी-जानव्याच्या पाशांतून कम्युनिस्ट पुढारीही सुटलेले नाहींत. माझ्या एका कम्युनिस्ट मित्राच्या गळ्यांतील जानव्याकडे बोट दाखवून मीं

त्यांना विचारलें, " काय हो, तुम्ही कम्युनिस्ट आहांत, नव्हे, त्यांचे बौद्धिक पुढारीही आहांत. तर मग ह्या जानव्याची अडगळ तुम्हीं कशाला ठेवली आहे ? " ह्यावर ते उद्गारले, " माझा कांहीं जानव्यावर विश्वास नाहीं; परंतु माझ्या मावशीनें मोठ्या प्रेमानें मला हें घालायला दिलं आहे, म्हणून मी हें घालतों. शिवाय आम्ही लोकांमध्यें आमच्या मताचा प्रचार करायला गेलों असतां आमच्या गळ्यांत जानवं नसेल, तर लोक आम्हांला धर्मभ्रष्ट समजतात आणि आमच्या वाऱ्यालाही उभे राहात नाहींत. म्हणून इच्छा नसतांही आम्हांला अनेकदा हें ढोंग करावं लागतं. "

" म्हणजे ह्याचा अर्थ असा, कीं जनता तयार नाहीं म्हणून पुढारी रूढीच्या चाकोरींतून सुटत नाहींत आणि पुढारीच रूढिग्रस्त आहेत म्हणून जनतेला जुनी चाकोरी सोडण्याची इच्छा होत नाहीं. अशा प्रकारें हें दुष्ट चक्र कधीं संपणारच नाहीं. " मी त्यांना म्हणालों.

" तुमचं म्हणणं खरं आहे. सध्या तरी आम्हांला ह्या परिस्थितींतून सुटण्याचा कांहीं मार्ग दिसत नाहीं. " त्यांनीं प्रांजळपणें कबूल केलें.

सारांश, ज्यांच्याकडून क्रांतिकारक उपायांची अपेक्षा करायची, त्या कम्युनिस्टांनींच जातीयवादापुढें हार खाल्ली आहे. ह्यामुळें बिहारची जाति-समस्या सुटण्याचा सध्या तरी कांहीं मार्ग दिसत नाहीं. हा प्रश्न निव्वळ शिक्षणानें सुटणारा नाहीं; कारण शिक्षित समाजही ह्या जातिवादापासून मुळींच अलिप्त नाहीं. त्यासाठीं एखादा महात्मा ज्योतिबा फुले किंवा कर्मवीर अण्णासाहेब शिंदे किंवा कर्मवीर भाऊराव पाटील ह्यांच्यासारखा एखादा क्रान्तिकारी सुधारकच बिहारला हवा आहे.

बिहारची स्त्री-समस्या

स्त्रियांना छत्रीची जरूर काय ?

मार्च महिन्यांतील प्रसंग. उन्हाळा नुक्ताच सुरू झालेला होता. बिहारमध्यें भूदानयज्ञाच्या प्रचारासाठीं गेलेल्या एका महाराष्ट्रीय विदुषीला छत्रीची गरज भासूं लागली, म्हणून ती आपल्या पित्याबरोबर पटना (पाटणा) ह्या बिहारच्या राजधानीच्या शहरीं छत्र्यांचीं दुकानें धुंडाळूं लागली. त्या पिता-पुत्रींनीं सारें पाटणा शहर पालथें घातलें, परंतु त्यांना 'लेडीज अंब्रेला' अर्थात् 'बायकांची छत्री' कांहीं मिळाली नाहीं. दुकानदारांनाही हें विचित्र गिऱ्हाईक पाहून गंमत वाटली. अखेर एक्जण त्यांना म्हणाला, "तुम्हांला बिहारमध्यें बायकांची छत्री मिळणारच नाहीं."

"कां रे बाबा ? असं ठामपणें तूं कसं सांगूं शकतोस ?" त्यांनीं त्याला विचारलें.

"कारण बिहारमधील स्त्रीला छत्रीची कधीं गरजच पडत नाहीं. इथें स्त्री ही एक पडद्याआड लपवून ठेवण्याची वस्तु आहे. मजूर जमातींतल्या स्त्रियांना छत्री लागत नाहीं आणि वरच्या जमातींतील स्त्री कधीं घराबाहेर पडून पायांनीं चालत जाणार नाहीं. मग छत्रीची गरजच काय उरली ?"

ही घटना अगदीं ताजी आहे. ती ऐकल्यावर बिहारमधील स्त्रीबद्दल अधिक माहिती :मिळवण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली आणि जस-जशी माहिती मिळत गेली, तस-तशी मनांत शंका येऊं लागली, कीं आपण विसाव्या शतकांत वावरत आहोंत, कीं मुसल्मानी अमदानींत आहोंत ?

बायकांना बाथरूम कशाला हवी ?

बिहारमध्यें भूदान यज्ञाच्या प्रचारार्थ ज्या महाराष्ट्रीय व दक्षिण-भारतीय मुली व स्त्रिया हिंडत आहेत, त्यांची सर्वांत मोठी अडचण म्हणजे स्नानगृहांचा अभाव.

आपल्याकडे नदीच्या कांठीं असणाऱ्या वाई, नाशिक, वगैरे गांवीं स्त्रियांनीं नदीवर जाऊन तेथें उघड्यावर स्नान करण्याची प्रथा नाहीं असें नाहीं; परंतु मोठ्या शहरांत वाढलेल्या सुशिक्षित मुलींना (कारण विनोबांबरोबर असणाऱ्या मुलींत पदवीधर व प्राध्यापक तरुणीही आहेत) आस-पास पुरुष वावरत असतांना उघड्यावर स्नान करणें महासंकट वाटत असल्यास नवल काय ? त्यांना बंदिस्त स्नानगृहांत स्नान करण्याची सवय असल्यामुळें त्यांची फार कुचंबणा होते. त्यांनीं बिहारच्या लोकांना जेव्हां आपली अडचण सांगितली, तेव्हां ते आश्चर्यानें त्यांच्याकडे पाहातच राहिले. कांहींजण स्पष्ट म्हणाले, "देशकार्य करणाऱ्या मुलींना हे श्रीमंती चोचले कशाला ? ही तर निव्वळ चैनीची बाब आहे !"

न्हाणीघर ही चैनीची बाब ! आपल्याला हें वाचून हसूं येईल. पण बिहारच्या मित्रांनीं तो आरोप अगदीं गंभीरपणें केला होता ; कारण त्यांच्याकडे स्त्रियांसाठीं स्नानाची स्वतंत्र अशी सोय नसते. नदीवर, विहिरीवर किंवा तळ्यावर वाटेल तितके लोक असले, तरी स्त्रिया उघड्यावर स्नान करतात. आतां कोणाला अशी शंका येईल, कीं इतकी जबरदस्त पडदा-प्रथा असतांना ह्या बायका बाहेर कश्या पडतात ? त्याचें उत्तर असें, कीं पडदा तोंड लपवण्यासाठीं असतो; त्यामुळें स्नान करतांनाही सबंध चेहेरा झाकून ठेवला, कीं पडद्याचें रक्षण झालें. ह्यावरून मला एक युरोपियन प्रथा आठवली. युरोपांत म्हणे, स्त्रियांच्या पायांच्या टांचा पुरुषांच्या नजरेस पडूं देत नाहींत. इतर सारें शरीर विवस्त्र राहूं शकेल, परंतु टांचा सदैव झाकलेल्या हव्यात. अर्थात् हल्लीं ह्यांत किती तथ्यांश असेल, हें मी सांगूं शकत नाहीं. परंतु पडदा पद्धत ह्या बाबतींतील दुसरें टोक आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

दुसरें एक कारण असें, कीं रोजच्या रोज स्नान करणें आवश्यक आहे, ही गोष्ट तेथील स्त्रियांना मान्य नाहीं. सटी-सहामाही, सणावारी दोन तांब्ये अंगावर म्हणजे अंगावरील कपड्यांवर ओतून घेतले कीं झालें. तेंही स्वच्छतेसाठीं नव्हे, तर पुण्यसंचयासाठीं ! कडक थंडीच्या दिवसांत काय स्थिति असेल ह्याची कल्पनाच

करणें बरें! अश्या स्थितींत रोजच्या रोज स्नान करूं इच्छिणाऱ्या महिलांवर तेथील लोकांनीं चैनबाजीचा आरोप केल्यास काय आश्चर्य?

सर्व जाती-जमातींची तीच स्थिति

ही स्थिति बिहारमधील कांहीं मागासलेल्या जातींपुरतीच मर्यादित आहे, असें समजण्याचें कारण नाहीं. प्रत्येक जमातींत हेंच दृश्य नजरेस पडतें. बाबू राजेंद्र-प्रसाद आणि बाबू जयप्रकाश नारायण ह्यांच्यासारखे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पुढारी ज्या कायस्थ जातींतून निर्माण झाले, त्या कायस्थांनींही पडद्याच्या बाबतींत कांहीं प्रगति केलेली नाहीं. राजेंद्रबाबू राष्ट्रपति ह्या नात्यानें देशभर हिंडत असतात, परंतु त्यांच्यासमवेत त्यांच्या सौभाग्यवतींना कोणीं पाहिलें आहे काय? किंबहुना त्या पति-पत्नींचा एकत्र फोटोही पाहावयास मिळत नाहीं. बिहारच्या सर्वश्रेष्ठ पुढाऱ्याच्या घरीं जर इतका पडदा, तर इतरांच्या बाबतींत दुसऱ्या कोणत्या स्थितीची अपेक्षा बाळगावी? श्री. जयप्रकाशजींच्या पत्नी श्रीमती प्रभावतीदेवी अनेक वर्षें सेवाग्रामला गांधीजींजवळ राहिल्या असल्यामुळें त्या मात्र पडदा पाळीत नाहींत.

'निदान डोक्यावरून पदर तरी घेत जा.'

महाराष्ट्रीय मुली बिहारमध्यें हिंडतात, तेव्हां त्यांना मोठे गमतीदार अनुभव येतात. एकदा एक तरुणी रस्त्यानें चालली असतां एक वयस्क गृहस्थ तिच्याजवळ आला आणि तिरस्कारानें तिच्याकडे पाहात म्हणाला, " तुम्हांला कांहीं लाज, शरम आहे कीं नाहीं?"

ती मुलगी चकित झाली. आपलें काय चुकलें असावें, ह्याचा विचार करीत तिनें आपले कपडे जरा ठीक-ठाक करण्याचा प्रयत्न केला आणि नम्रपणें विचारलें, " काय झालं? माझ्या हातून कांहीं चूक घडली का?"

" चूक? साधी चूक नव्हे, घोडचूक! तूं चांगली गरती बाई दिसतेस नि डोकं उघडं टाकून रस्त्यानें जातेस? तुला कांहीं वाटत नसलं, तरी आम्हां पुरुषांना

बघायला लाज वाटते. तुला पडद्यांत वावरायचं नसलं, तरी निदान डोक्यावरून पदर तरी घेत जा!" तो गृहस्थ गंभीरपणें म्हणाला.

"अस्सं, अस्सं!" असें म्हणत ती मुलगी हसत-हसत पुढें निघून गेली.

काय, बायका चष्मा घालतात?

भूदानासाठीं खेडो-पाडीं हिंडणाऱ्या कांहीं मुली कॉलेजांत शिकणाऱ्या (एक तर नागपुरच्या कॉलेजांत प्राध्यापिकेचें काम केलेली) असल्यामुळें त्यांच्यापैकीं अनेकींना चष्मा लावावा लागतो. ह्या गोष्टीचें तेथें किती आश्चर्य करण्यांत येतें! पुष्कळ वेळां लोक त्यांना विचारतात, "तुम्ही बायकाच आहांत ना? मग तुम्हांला चष्मा काय करायचाय्? तुम्हांला लिहिण्या-वाचण्याची जरूर काय?" अनेक लोक एवढ्यावरच न थांबतां त्या मुलींजवळ येतात आणि त्यांच्या डोळ्यांवरील चष्मा चाचपून पाहातात. जणूं स्त्रीला चष्म्याची जरूर असते, ह्यावर त्यांचा विश्वासच बसत नाहीं.

त्यांचें तें वागणें पाहिलें, कीं आपण अव्वल इंग्रजी अमदानींत इंग्रज बायकांकडे कोणत्या नजरेनें पाहात असूं, ह्याची चांगली कल्पना येते. युरोपियन स्त्री म्हणजे आपल्याला एक आश्चर्य वाटत होतें. इतक्या स्वातंत्र्यांत वावरणारी स्त्री साध्वीपतिव्रता असूं शकेल, ह्यावर आपला विश्वास बसत नव्हता आणि ह्यामुळेंच तिच्याविषयीं आपल्या अंतःकरणांत एकप्रकारची अनुदार वृत्ति निर्माण झाली होती. तशीच कांहींशी स्थिति आज बिहारी समाजाची आहे. पडद्यांतून बाहेर पडलेली स्त्री मनानें व शरीरानें पवित्र असूं शकेल, ह्यावर त्याचा विश्वास बसत नाहीं आणि म्हणूनच पुष्कळ वेळां अश्या स्त्रियांच्या बाबतींत तो फारच अनुदार व असभ्य वागतो, असा अनुभव आहे.

रूढीविरुद्ध बंडाची तयारी नाहीं

स्त्री पडद्यांतून बाहेर पडली तर भ्रष्ट होईल, अशी प्रामाणिक भीति बाळगणाऱ्यांची गोष्ट सोडून देऊं; परंतु ज्यांना ही पडदा-पद्धति अयोग्य वाटते, तेही तिच्याविरुद्ध बंड करण्यास तयार होत नाहींत, ही एक मोठी आश्चर्याची गोष्ट आहे.

ह्या बाबतींत येथील कार्यकर्त्यांशीं चर्चा करण्याचा प्रयत्न केल्यास ते उत्तर देतात, " तुमचं म्हणणं बरोबर आहे; परंतु जुन्या लोकांची समजूत कशी पटणार? आम्ही आमच्या बायकांना पडद्यांतून बाहेर काढलं, तर सनातनी मंडळी आमच्यावर बहिष्कार घालतील आणि मग जें राजकीय कार्य आम्ही आज करीत आहोंत, तेंही आम्हांला करतां येणार नाहीं. म्हणून हा प्रश्न काळावर सोपवून आम्ही गप्प बसतों. अहो, पूर्वीपेक्षां आतां कितीतरी सुधारणा झाली आहे. हल्लीं बायका पडद्यांतूनच सिनेमाला जाऊं लागल्या आहेत, ही काय कमी महत्त्वाची गोष्ट आहे? होईल हळू-हळू सर्व कांहीं व्यवस्थित ! "

आपल्याकडील कांहीं सनातनी मंडळी अस्पृश्यता निवारण्याच्या बाबतींत जी भूमिका घेतात, तशीच येथें पडद्याच्या बाबतींत लोकांकडून घेतली जाते. शहरांत राहाणाऱ्या मध्यमवर्गीय लोकांच्या बायका बहुधा खेड्यांतून आपल्या सासरींच राहातात. ह्यामुळें एक प्रकारें त्यांच्या आर्थिक नाड्या सनातनी लोकांच्याच हातांत असतात; म्हणून त्यांच्याविरुद्ध बंड करण्यास ते तयार होत नाहींत आणि एकजण रूढीची गुलामी निमूटपणें सहन करतो हें पाहून इतरजणही त्याचेंच अनुकरण करतात. अश्या स्थितींत एखादी तेजःस्वी महिला निर्माण होऊन तिनें हा प्रश्न आपल्या हातीं घेतला, तरच तो सुटण्याची कांहीं शक्यता आहे.

बाहेरील स्त्रियांना होणारा त्रास

ह्या पडदापद्धतीचा उपद्रव बिहारमधील बायकांना जो होत असेल तो असेल, पण बाहेरून जाणाऱ्या स्त्रियांना मात्र त्याचा वेगळ्याच प्रकारें त्रास होतो. तो असा, कीं उघड्या माथ्यानें हिंडणारी स्त्री तेथें एक प्रेक्षणीय वस्तु समजली जाते. एखादी मुलगी रस्त्यानें जाऊं लागली, कीं साऱ्या नजरा तिच्याकडे रोखल्या जातात आणि मग त्या मुलीला अगदीं चोरट्यासारखें होतें. ह्या नजरांत निव्वळ कुतूहलच असतें असें नव्हे, तर एक प्रकारचा तिरस्कार, हेवा, बुभुक्षुपणा, उल्लूपणा ह्यांचें मिश्रण असतें. त्यांत पुन्हा त्या स्त्रीबरोबर एखादा पुरुष (मग तो तिचा भाऊ का असेना !) असेल, तर मग त्या नजरांतील उपहास विचारायलाच नको. हा अनुभव पाटणा शहरांत मीं स्वतःच घेतला, ह्यामुळें त्यांतील कटुता माझ्या मेंदूपर्यंत

जाऊन पोंचली आहे. आमच्याकडे महाराष्ट्रांतही स्त्रियांकडे आधाशी नजरेनें पाहाणारे गल्लो-गल्लीं आढळतात, ह्यांत शंका नाहीं, परंतु ते बहुधा हलक्या दर्जाचे किंवा मवाली ह्या सदरांत मोडणारे असतात. ह्यामुळें त्यांच्याकडे आपण लक्ष्य देत नाहीं. परंतु पाटण्याला जे लोक आमच्याकडे रोखून पाहात होते, ते चांगले सुशिक्षित व सभ्य समजले जाणारे होते. ह्यामुळें तें दुःख अधिक. बिहारमध्यें ख्रिश्चन किंवा बंगाली स्त्रिया अधून-मधून दृष्टीस पडतात, परंतु त्यांची संख्या मुख्यतः शहरांत व तीही अगदीं तुरळक आहे. शिवाय त्या बायका खूप श्रीमंत आणि उच्च स्थानीं असल्यामुळें मध्यवमर्गीय स्त्रियांना भासणारी अडचण त्यांना सहसा त्रास देत नसावी.

बिहारमध्यें पडदा-पद्धति असल्यामुळें स्त्रियांच्या बाबतींत पुरुषांमध्यें एक प्रकारचा बुजरेपणा व त्या अनुषंगानें येणारा सभ्यपणा भरपूर असेल, अशी माझी कल्पना होती. परंतु तेथें काम करणाऱ्या मुलींनीं जे अनुभव सांगितले, त्यांवरून ती चुकीची होती, असें आढळून आलें. त्यांच्या स्वतःच्या बायका घरच्या पेटींत बंद असल्यामुळें ते जणूं चेकाळल्यासारखे होतात आणि रस्त्यानें जाणाऱ्या मुलीला धक्का देण्याची एकही संधि दवडीत नाहींत, असें मला सांगण्यांत आलें. बायकांना पडद्यांत ठेवणारे पुरुष इतर जातीच्या स्त्रियांच्या बाबतींत असभ्य बनतात हा अनुभव कांहीं अंशीं मुसलमानांच्या बाबतींतही आपणांला आलेला ह्याहे.

बायका बदलतात वा हरवतात

ह्या पडदा-पद्धतीमुळें कांहीं गमतीदार घटनाही घडून येतात. उदाहरणार्थ, लग्नाच्या वरातींची गल्लत झाली, कीं पुष्कळश्या नवऱ्या बदलतात किंवा हरवतात. गृहप्रवेशाचा एखादा मुहूर्त असतो, त्या दिवशीं शेकडों वधू गृहप्रवेश करतात. परंतु वधूचा चेहरा कोणीं पाहिलेला नसतो, ह्यामुळें गर्दीमध्यें एका वराची वधू भलत्याच घरांत जाते. रवींद्रनाथ ठाकुरांच्या 'नौका डूबी' ह्या कादंबरीची घटना अशाच एका प्रसंगावर आधारलेली आहे, हें आपणांपैकीं अनेकांना माहीत असेल. परंतु ह्याहीपेक्षां आश्चर्याची गोष्ट म्हणजे लग्नानंतरही अनेक वर्षेंपर्यंत नवऱ्याला

आपल्या बायकोचा चेहेरा दिसत नाहीं. दिवसा तर ती त्याच्यासमोर येणारच नाहीं, परंतु रात्रींही जेव्हां त्यांची भेट होते, तेव्हां दिवा मालवण्याची प्रथा असल्यामुळें चार स्त्रियांच्या घोळक्यांत बसलेली अमूक एक स्त्री आपली बायको आहे, असें कोणताही नवरा छातीठोकपणें सांगूं शकत नाहीं.

दिवसें-दिवस क्षयाचें वाढतें प्रमाण

ह्या परिस्थितीचा सामाजिक परिणाम जो कांहीं होत असेल तो वेगळा, परंतु स्त्रीच्या प्रकृतीवर मात्र ह्याचा फारच वाईट परिणाम होतो. पडद्यांत राहाणाऱ्या बहुतेक स्त्रिया पांढुरक्या, फिक्कट दिसतात. त्यांच्यांत क्षयरोगाचें प्रमाण तर दिवसें-दिवस वाढतच आहे. पूर्वीच्या काळीं ग्रामप्रधान संस्कृतीमध्यें कदाचित् हा दोष लक्ष्यांत आला नसेल, परंतु आतां खुल्या हवेच्या अभावामुळें स्त्रियांमध्यें ह्या रोगाचा प्रसार झपाट्यानें होत आहे, असें म्हणतात. पडदा-प्रथा फक्त अशिक्षितांतच आहे असें समजण्याचें कारण नाहीं. चांगल्या सुशिक्षित घराण्यांतही ही प्रथा अजून मूळ धरून बसली आहे. पदवीधर स्त्रियांनाही पडद्याच्या बाहेर पडण्याची हिंमत होत नाहीं आणि मग त्यांना आंतल्या आंत तडफडत बसावें लागतें.

स्त्रीची राखण करीत बसावें लागतें

महाराष्ट्रांत अनेक वर्षें राहिलेले एक बिहारी गृहस्थ परवां पाटण्याला भेटले. गप्पा-गोष्टी चालू असतां ते मला म्हणाले, " महाराष्ट्राच्या मोकळ्या वातावरणांतून इथें आल्यामुळें माझा जीव कसा गुदमरून जात आहे. पाटण्यासारख्या शहरांतही प्रत्येक बिऱ्हाड हा एक किल्ला बनलेला आहे आणि दुसरा पुरुष आपल्या पडद्यांतील बायकोकडे तर पाहात नाहीं ना, ह्या संशयानें प्रत्येक पुरुष पछाडलेला असतो. माझी बायको पडदा पाळीत नाहीं, ह्यामुळें तर आम्ही ज्यास्तच अविश्वासार्ह बनलों आहोंत. हें सर्व पाहिलं, कीं वाटतं, पुन्हा आपण महाराष्ट्रांतच जावं. महाराष्ट्रांत स्त्री ही सखी आहे, जीवनाची जोडीदारीण आहे, साथीदारीण आहे. आमच्या प्रांतांत ती एक जोखीम आहे. जड-जवाहिराप्रमाणें तिची राखण करीत बसणं एवढंच पुरुषाचं काम."

बिहारला आगरकर हवेत

ह्या पद्धतीमुळें बिहारचें अर्धांग लुळें होऊन पडलें आहे. कोणतेंही सामाजिक कार्य अथवा सुधारणा तेथें मूळ धरूं शकत नाहीं. आपल्या गुलामीच्या शृंखला तोडण्यासाठीं बिहारी स्त्री आंतल्या आंत तडफडत आहे, परंतु तिला साहाय्य करणारा आगरकर किंवा कर्वे तेथें नाहीं, ह्यामुळें ती कांहीं करूं शकत नाहीं. राजकीय कार्याबरोबर सामाजिक सुधारणा झाल्या नाहींत, तर काय भयंकर परिस्थिति ओढवते, ह्याचें जिवंत उहाहरण म्हणून बिहारकडे बोट दाखवतां येईल. आपल्याकडे समाजसुधारकांची परंपराच निर्माण झाली. वेळप्रसंगीं राजकारणांतील जहाल पंथीयांचाही रोष व उपहास सहन करून त्यांनीं आपलें असिधाराव्रत चालू ठेवलें आहे. त्यामुळें आपणांला समाजसुधारणेची किंमत कळत नाहीं. परंतु राजेंद्रप्रसाद आणि जयप्रकाश नारायण ह्यांच्यासारखे पट्टीचे राजनीतिधुरंधर लाभले असूनही बिहार सामाजिक बाबतींत इतका मागासलेला राहिला आहे, ह्याचें शल्य बिहारी पुरुषाच्या मनाला कितपत बोचतें हें सांगणें कठीण आहे. परंतु बिहारी स्त्री मात्र ह्यापुढें केव्हांही बंड करून उठण्याचा संभव आहे. फक्त तिला कोणीतरी आधार देणारा हवा. वस्तुतः समाजवादी व कम्युनिस्ट पक्षाच्या लोकांनीं ह्या बाबतींत हिंमत धरून पुढें झालें पाहिजे. परंतु सामाजिक प्रश्नांना हात घातल्यास आपणांला मतें मिळणार नाहींत, आपल्या राजकीय झेंड्याखालीं लोक जमणार नाहींत, ह्या भीतीनें तेही कांहीं करीत नाहींत, इतकेंच नव्हे, तर बहुसंख्य राजकीय कार्यकर्ते आपल्या स्त्रियांना पड्यांतच ठेवतात आणि ह्या बाबतींत त्यांच्याशीं कोणी वादविवाद करूं लागला, तर मौन धारण करतात. म्हणून जोंपर्यंत राजकीय इभ्रतीची व लोकशाही पद्धतीनें मिळणाऱ्या मतांची तमा न बाळगतां तत्त्व म्हणून स्वतःचें सारें जीवन स्त्रियांच्या उन्नतीसाठीं समर्पित करणारे 'आगरकर' बिहारला लाभणार नाहींत, तोंपर्यंत बिहारी स्त्री दास्यांतून सुटेल अशी आशा वाटत नाहीं.

बिहारची भाषा-समस्या : १

डॉ. अमरनाथ झा ह्यांची चिठ्ठी

' उर्दूके अदीब ' (उर्दू साहित्याचा इतिहास) ह्या माझ्या पुस्तकाला सुप्रसिद्ध विद्वान् डॉक्टर अमरनाथ झा ह्यांची प्रस्तावना मला हवी होती. त्याकरतां बिहारचे प्रख्यात कम्युनिस्ट कवि श्री. नागार्जुन ह्यांच्यामार्फत मीं प्रयत्न केला होता आणि त्यांच्यामार्फतच मला ती प्रस्तावना मिळाली. त्या प्रस्तावनेसोबत डॉ. झा ह्यांनीं श्री. नागार्जुन ह्यांना लिहिलेली मैथिली भाषेंतील एका ओळीची चिठ्ठी होती. ती वाचून मला मोठी गंमत वाटली. सदर चिठ्ठी अशी होती :

तिथि ९-४-५४ ई.

आशीर्वाद,

' उर्दूके अदीब 'क भूमिका पठा रहलहुं अछि।

अमरनाथ झा

मैथिली भाषेचें स्वतंत्र अस्तित्व

भाषाकोविदांचें असें म्हणणें आहे, कीं मैथिली ही बोली नसून स्वतंत्र भाषा आहे. तिचा खडीबोली हिंदीशीं कांहीं संबंध नाहीं. मागधी अपभ्रंश भाषेपासून मगही, मैथिली, बंगाली, उडिया आणि असामिया ह्या पांच भाषा निघाल्या. त्यांपैकीं फक्त मगही भाषेचा विकास होऊं शकला नाहीं आणि ती लोकगीतें व बोलभाषा ह्यांच्यापुरतीच मर्यादित राहिली. मैथिलीनें मात्र साहित्यिकदृष्ट्या खूपच प्रगति केली आणि तिच्यांत विद्यापतीसारखा महाकवि निर्माण झाला. अवधी भाषेंत तुलसीदास, व्रजभाषेंत सूरदास, बंगालींत कृत्तिवास, तसा मैथिलींत विद्यापति. मिथिला प्रदेशांतील ब्राह्मणांनीं व अन्य उच्च वर्गीयांनीं मैथिलीचा स्वीकार करून

तिच्या विकासाची खटपट सतत चालू ठेविली. आज व्रज, अवधी, बुंदेलखंडी, छत्तीसगढी, वगैरे भाषांना हिंदीनें खाऊन टाकलें आहे. परंतु मैथिलीला पचवण्याची शक्ति मात्र हिंदींत नाहीं. ह्यावरून तिचें स्वतंत्र अस्तित्व सिद्ध होतें.

विश्वविद्यालयाकडून मान्यता

मैथिलीचा भूतकाळ कितीही उज्ज्वल असला, तरी इंग्रजांच्या अमदानींत तिला राजमान्यता मात्र मिळूं शकली नाहीं. त्यासाठीं गेलीं साठ-सत्तर वर्षें मिथिला-निवासी झगडत आहेत. त्यांच्या प्रयत्नांना सर्व प्रथम १९१९ सालीं यश येऊन त्या वर्षीं कलकत्ता विश्वविद्यालयानें पदव्युत्तर अध्ययनासाठीं मैथिली भाषेला मान्यता दिली. त्यानंतर काशी विश्वविद्यालयानें व पाटणा विश्वविद्यालयानेंही तिला मान्यता दिली; आणि आतां प्राथमिक शाळेपासून एम्. ए., पीएच्. डी. पर्यंत मैथिलीच्या द्वारें कोणालाही आपलें शिक्षण पूर्ण करतां येतें.

मैथिली भाषेस राजमान्यता हवी

परंतु एवढ्यानें काम भागण्यासारखें नव्हतें. बिहार सरकारनें राज्यभाषा म्हणून हिंदीला मान्यता दिल्यामुळें मैथिली भाषेंतून पदवी घेणाऱ्यांना सरकारी नोकरी मिळूं शकत नाहीं. म्हणजे त्यांचें शिक्षण व्यर्थच होतें. म्हणून हिंदीप्रमाणेंच मैथिलीलाही राज्यभाषा म्हणून मान्यता मिळावी अशी खटपट सुरू झाली. कांहीं लोकांना ह्यांत फुटीरपणाचा वास येऊं लागला आणि त्यांनीं मैथिली स्वतंत्र भाषा नसून एक सामान्य बोली आहे व तिनें हिंदीमध्यें विलीन झालें पाहिजे, असा पुकारा करण्यास सुरुवात केली. त्यामुळें मैथिली भाषेचें स्वतंत्र अस्तित्वच धोक्यांत आलें आणि ती भाषा शिकणाऱ्यांच्या पोटाचा प्रश्न अधिक बिकट झाला. ह्यांतूनच स्वतंत्र मैथिली राज्याची कल्पना उदयास आली व हळू-हळू वाढीस लागली.

दरभंगा महाराजांचा पाठिंबा

बिहारमधील गंगेच्या उत्तरेकडील भागांत मैथिलीचें आधिपत्य चालत आलेलें आहे. मुजफ्फरपुर, बेगूसराई, मुंगेर (मोंघीर), भागलपूर, देवघर, पूर्णिया, सहर्षा, विराटनगर, राजविराज, जनकपूर, बीरगंज, सीतामढी, दरभंगा, वगैरे जिल्ह्यांत

आणि शहरांत राहाणारे स्थानिक लोकच नव्हेत, तर बाहेरून येऊन तेथें स्थायिक झालेले बंगाली, मारवाडी, सिंधी, वगैरे व्यापारी, बुद्धिजीवी आणि श्रमजीवी लोकही शुद्ध, स्वच्छ मैथिली बोलतात. आज बिहारचीं राज्यसूत्रें ज्यांच्या हातीं आहेत, ते लोक स्वतंत्र मैथिली राज्याच्या व मैथिलीला महत्त्वाचें स्थान देण्याच्या विरुद्ध आहेत. ह्यामुळें खानेसुमारीच्या वेळीं मैथिलीभाषिकांची नीट शिरगणती होऊं शकली नाहीं. परंतु त्यांची संख्या किमान दोन कोटी तरी असावी असें म्हणतात. सर्वांत प्रथम दरभंगाच्या महाराजांनीं मैथिलीला राजाश्रय दिला व मैथिली कवींचा व साहित्यिकांचा उचित गुणगौरव केला. आजही मैथिली राज्याच्या चळवळीला त्यांचा जोराचा पाठिंबा आहे. ह्यामुळें ह्या चळवळीविरुद्ध असणारे लोक ह्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांना दरभंगामहाराजांचे पित्ये किंवा पगारी एजंट संबोधून त्यांची हेटाळणी करतात. परंतु ह्यांत फारसें तथ्य नाहीं. ह्या आंदोलनाला चालना जरी दरभंगा महाराजांनीं दिलेली असली, तरी आतां जनतेनें व मुख्यतः मध्यमवर्गीयांनींच त्याला उचलून धरलें आहे आणि त्यांच्या पोटा-पाण्याचा प्रश्न त्याच्याशीं निगडित असल्यामुळें त्यांना हा मुद्दा अत्यंत जिव्हाळ्याचा वाटत आहे.

हिंदी भाषा शिकण्यांतील अडचण

बंगाली भाषेप्रमाणेंच मैथिली भाषेंतही पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि एकवचन, अनेकवचन ह्यांची भानगड जवळ-जवळ नाहींच ; ह्यामुळें मैथिलीभाषिकांना बंगाल्यांप्रमाणेंच हिंदी भाषा शिकणें अवघड जातें. शाळा-कॉलेजांतून दहा-बारा वर्षें हिंदीची घोकंपट्टी केल्यानंतरही मिथिलावासीयांना शुद्ध हिंदी बोलतां अथवा लिहितां येत नाहीं. लिंग, वचन, विभक्ति, वगैरे बाबतींत पदोपदीं मैथिली भाषा त्यांच्या तोंडून अथवा लेखणींतून बाहेर पडते; आणि मग 'बिहारी लोक बुद्दू आहेत, त्यांना शुद्ध भाषाही बोलतां येत नाहीं,' अशी हेटाळणी हिंदीवाले करतात. ह्या हेटाळणीपासून बचाव करण्याचा एकच मार्ग आज त्यांना दिसत आहे. तो म्हणजे इतरभाषिकांप्रमाणें हिंदीला संघभाषा म्हणून मान्यता द्यायची आणि आपल्या घरीं मैथिलीला राज्यभाषेचें प्रमुखपद मिळवून द्यायचें.

मैथिलीबाबत तीन विचारप्रवाह

मैथिल राज्याच्या बाबतींत बिहारमध्यें मुख्यतः तीन विचारप्रवाह आढळतात. एक असा, कीं मैथिली हिंदीच्या इतर (व्रज, अवधी, राजस्तानी, वगैरे). बोलींप्रमाणें एक बोली भाषा असून तिनें आपलें स्वतंत्र साहित्यिक अस्तित्व कायम न ठेवतां हिंदीरूपी सागरांत विलीन होऊन जावें आणि पंजाबपासून बंगालपर्यंत एकच खडी बोली हिंदी सिंहासनारूढ व्हावी. 'एक राष्ट्र, एक भाषा' ह्या उद्घोषाला अनुरूप असाच हा विचारप्रवाह आहे. ह्या विचाराला पाठिंबा देणाऱ्यांमध्यें उत्तर प्रदेशांतील साहित्यिक प्रमुख आहेत. बिहारमध्येंही श्रीरामवृक्ष बेनीपुरी, श्री. दिनकर, वगैरे जे साहित्यिक व कवि हिंदी भाषेमध्यें यशस्वी ठरले आहेत, ते ह्याच मताचे आहेत. ज्या साहित्यिकांना हिंदीनें कीर्ति व पैसा मिळवून दिला, त्यांनीं आपल्या मातृभाषेचा पक्ष सोडून राजभाषेचा पक्ष धरला तर त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें मैथिलीचें स्वतंत्र राज्य बनण्यामुळें ज्यांच्या राजकीय सत्तेला 'खो' बसण्याची भीति आहे, असे पुढारी व सध्याचे राज्यकर्ते ह्यांचाही मैथिलराज्याला विरोध आहे. मैथिलीचें राज्य झाल्यास त्यांत मैथिल ब्राह्मणांना अचानक महत्त्व मिळून जाईल आणि मग तेथें भूमिहार व रजपूत ह्यांचें प्राबल्य उरणार नाहीं, अशी कांहीं लोकांना भीति वाटते. म्हणून ही चळवळ ब्राह्मणांची आहे, जनतेला तिच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं, अशी ओरड इतरांनीं करण्यास सुरुवात केली आहे. परंतु लोकशाही काळांत एक-दोन टक्के असणाऱ्या ब्राह्मणांचें राज्य ह्या देशांत कोठेंही प्रस्थापित होऊं शकेल अशी कल्पना करणेंच भ्रमोत्पादक होय. ह्या बाबतींत मैथिल राज्याच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें असें, कीं आज मैथिल राज्य होणार नाहीं ह्या कल्पनेनें भूमिहार पुढारी त्याला विरोध करीत आहेत. परंतु उद्यां ती कल्पना मूर्त स्वरूपांत येण्याचा संभव निर्माण होतांच हेच पुढारी एका रात्रींत आपली पगडी फिरवून आम्हींही मैथिलीभाषीच आहोंत असें म्हणूं लागतील. म्हणून त्यांच्या विरोधाला कांहीं किंमत नाहीं.

ह्याच्या उलट दुसरा विचारप्रवाह कट्टर मैथिलीवाद्यांचा आहे. डॉक्टर श्री जयकांत मिश्र, डॉक्टर श्री लक्ष्मण झा, डॉक्टर श्री सुभद्र झा, महामहोपाध्याय

डॉक्टर श्री उमेश मिश्र, वगैरे बडी बडी विद्वान् मंडळी ह्या पक्षांत आहेत. मैथिली भाषा बोलणारांचें स्वतंत्र राज्य ताबडतोब व अवश्यमेव बनलें पाहिजे, अशी त्यांची मागणी असून त्या दृष्टीनें त्यांच्या हालचाली सुरू आहेत. ह्या लोकांमध्यें हिंदीचा द्वेष इतक्या पराकोटीला गेला आहे, कीं आपण त्याची कल्पनाही करूं शकत नाहीं. हिंदी राक्षसीण असून ती मैथिलीचें नरडें दाबीत आहे, असें ते उघड बोलत असतात आणि एका मैथिलनिवासीयानें दुसऱ्याशीं बोलतांना हिंदाचा वापर मुळींच करतां कामा नये, असा त्याचा कटाक्ष असतो. हिंदीच्या साम्राज्यवादी आक्रमणापासून मैथिलीला वांचवा असा पुकारा ते करीत असतात. दक्षिण भारतामध्येंच हिंदीचा द्वेष भयंकर प्रमाणांत आहे असें आपण समजतों, परंतु बिहारमधील लोकांचा हिंदी-द्वेष पाहून मी तर थक्कच झालों. हा द्वेष कमी करण्याचे प्रयत्न लवकर न झाल्यास त्याचे दुष्परिणाम घडून आल्याशिवाय राहाणार नाहींत.

तिसरा विचारप्रवाह ह्या दोहोंच्या मधील आहे. आपल्याकडील भाषावार प्रांतरचनेच्या पुरस्कर्त्यांची जी भूमिका आहे, तशीच जवळजवळ ह्या पक्षाच्या लोकांची आहे. आंतरप्रादेशिक भाषा म्हणून ते हिंदीला मान्यता देतात आणि सर्व सुशिक्षितांना हिंदी भाषा आली पाहिजे, ही गोष्ट ते कबूल करतात. परंतु मैथिली सामान्य बोली नसून पूर्णपणें विकसित भाषा आहे व तिचें आधिपत्य मैथिल प्रदेशावर राहिलें पाहिजे, ह्या मुद्द्यावर त्यांचा विशेष भर आहे. त्यासाठींच स्वतंत्र मैथिल राज्याची त्यांना आवश्यकता भासते, परंतु मुंबई अथवा मध्यप्रदेश ह्या बहुभाषी राज्यांप्रमाणें बिहारमध्यें मैथिलीला आपल्या विकासाची हिंदीइतकीच समान संधि देण्यांत आली व राज्यकारभारांत तिला मानाचें स्थान दिलें गेलें, तर स्वतंत्र मैथिल राज्याचा आग्रह धरूं नये, असें त्यांचें म्हणणें आहे. बिहारचे लोकप्रिय लोककवि श्री नागार्जुन, डॉ. अमरनाथ झा, विद्यापीठांतील अनेक प्राध्यापक, वगैरे साहित्यप्रेमी विद्वान् ह्या मताचे आहेत. डॉक्टर झा सरकारी यंत्रणेंत अडकलेले असल्यामुळें ते ह्या बाबतींत जाहीरपणें कांहीं बोलूं शकत नाहींत. परंतु कोणत्याही परिस्थितींत मैथिलीचा विकास कुंठित होतां कामा नये, तिचें

स्वतंत्र अस्तित्व कायम राहिलें पाहिजे व तिच्या साहित्याची भरभराट झाली पाहिजे, ह्याविषयीं त्यांना तिळमात्रही संशय नाहीं. ह्या पक्षाचें म्हणणें अत्यंत सयुक्तिक आहे, परंतु साम्राज्यवादाची धुंदी चढलेले हिंदीवाले हें म्हणणें ऐकण्याच्या मनःस्थितींत सध्या नाहींत असें दिसतें. ह्या भाषेच्या प्रश्नावर कम्युनिस्ट विचारवंतांतही किती मतभेद आहे, ही गोष्ट पाहाण्यासारखी आहे. डॉ. रामविलास शर्मा, श्री. नरेंद्र शर्मा, वगैरे कम्युनिस्ट विचारक मैथिलीचें अस्तित्व नाकारून सर्व उत्तरापथाची भाषा हिंदीच झाली पाहिजे असें आग्रहानें प्रतिपादितात, तर श्री. नागार्जुनांसारखे कम्युनिस्ट स्टालिनचा हवाला देऊन, मैथिली ही जनतेची भाषा आहे व म्हणून तिच्याद्वारें राज्यकारभार चालविण्याचा जनतेला हक्क आहे असें ठणठणीतपणें बजावतात. इतकेंच नव्हे, तर एकाच पक्षांत काम करणाऱ्या विद्वानांनीं आपले मतभेद जाहीरपणें चव्हाट्यावरही मांडले आहेत.

मैथिलीचें साहित्य हिंदीपेक्षां सरस

इकडे हा वादविवाद चालू असतां तिकडे मैथिल साहित्यिकांनीं मात्र आपलें कर्तव्य चोख बजावलें आहे. मैथिली भाषेंत नियतकालिकें व पुस्तकें प्रकाशित करण्याचा सपाटा त्यांनीं चालविला आहे आणि आश्चर्याची गोष्ट अशी, कीं प्रा. हरिमोहन झा ह्यांच्यासारख्या विनोदी लेखकाच्या एकेका पुस्तकाच्या सहासहा आवृत्त्या निघाल्या आहेत. श्री. नागार्जुन ह्यांची १९५२ सालीं हिंदीमध्यें सर्वश्रेष्ठ ठरलेली कादंबरी 'बलचनमा' ही प्रथम मैथिली भाषेंतच लिहिली होती. पी. ई. एन्. संस्थेच्या मुखपत्रांत भारतांतील ज्या भाषांच्या साहित्याविषयीं माहिती येते, त्यांत मैथिली हीही एक आहे, हें आपणांपैकीं अनेकांना माहीत असेलच. अशा प्रकारें ह्या भाषेंतील लेखकांनीं तिच्यांत विपुल साहित्य निर्माण करून तिला समृद्ध करण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला आहे. त्या साहित्याचें तुलनात्मक अध्ययन करणाऱ्यांचें असें म्हणणें आहे, कीं मैथिलीचें साहित्य बंगालीपेक्षां मुळींच कमी प्रतीचें नाहीं आणि हिंदीपेक्षां तर तें कांकणभर अधिकच सरस आहे. मैथिली कथां व कादंबऱ्यांचीं भाषांतरें हिंदीमध्यें अत्यंत आवडीनें वाचलीं जातात ह्यावरूनही हीच गोष्ट सिद्ध होत नाहीं काय ?

स्वतंत्र प्रांताची आर्थिक बाजू

ह्या प्रश्नाला एक आर्थिक बाजूही आहे. गंगा नदीनें बिहारला दोन भागांत विभागलें आहे. दक्षिण बिहार आणि उत्तर बिहार. दक्षिण बिहारांत लोखंड, कोळसा, वगैरे खनिज पदार्थ असल्यामुळें तो औद्योगिक दृष्ट्या पुढारलेला व संपन्न आहे. ही गंगा नदी ह्या ठिकाणीं इतकी रुंद झाली आहे, कीं तिच्यावर पूल बांधणें आतांपर्यंत जवळ जवळ अशक्य समजण्यांत येत होतें. शिवाय अधूनमधून ती आपला प्रवाह बदलत असते. ह्यामुळें बांधलेला पूल वाया जाण्याची शक्यताही येथें असते. ह्या सर्व कारणांमुळें आतांपर्यंत गंगेवर पूल बांधण्यांत आलेला नाहीं. उत्तर-दक्षिण बिहारमधील दळणवळण जहाजांतून चालतें. परंतु त्यामुळें खनिज पदार्थांची वाहतूक फार महाग पडते. त्यामुळें उत्तर बिहार सदैव मागासलेला राहिलेला आहे. आमचें राज्य झाल्यास आम्ही गंगेवर पूल बांधूं आणि दक्षिण बिहारप्रमाणेंच आम्हीही औद्योगिक दृष्टया भरभराटीस येऊं अशी आशा मैथिलीच्या लोकांना वाटते. अर्थात् बहुतेक ठिकाणीं भाषावार प्रांत मागणाऱ्यांसमोर आपल्या भागाची आर्थिक उन्नति हा मुद्दा असतोच, त्याप्रमाणें तो येथेंही आहे. म्हणून बिहार सरकारनें गंगेवर पूल बांधून उत्तर बिहारची कोंडी फोडून टाकली आणि मैथिली भाषेंतही राज्यकारभार चालविण्याची सवलत देऊन त्या भाषेंतून शिक्षण घेणाऱ्यांना इतरांप्रमाणें नोकऱ्या देण्यास सुरुवात केली तर ह्या प्रश्नाची उग्रता कमी होईल आणि चळवळींतील कटुता नाहींशी होईल असें वाटतें. आतां गंगेवर पूल बांधण्याचें काम बिहार सरकारनें हातीं घेतलें आहे असें कळतें. त्या पुलाला अनेक कोटि रुपये खर्च येईल असें म्हणतात. तो पुरा होण्यास पांच-सहा वर्षे तरी लागतील. तोंपर्यंत भाषावार प्रांतरचनेच्या बाबतींत भारतानें कांहींतरी निश्चित धोरण ठरविलेलें असेल आणि त्या धोरणाला अनुसरून मैथिलीचाही प्रश्न हातावेगळा करण्यांत येईल, अशी आशा आपण करूं या.

ता. क. आतां हा पूल बांधून झाला आहे. मैथिलीच्या वेगळ्या राज्याचा आग्रह मंद पडला आहे. साहित्य अकादेमीनें मैथिलीला मान्यता देऊन १९६८ सालीं श्री नागार्जुन ह्यांच्या 'पत्रहीन नग्नगाछ' ह्या काव्यसंग्रहाला पारितोषिक देऊन मैथिलीचा गौरव केला आहे.

बिहारची भाषासमस्या : २

सर्वोदयवाद्यांतील भाषिक वाद

गतवर्षीं बिहारमधील चांडिल गांवीं सर्वोदय समाजाचें पांचवें वार्षिक अधिवेशन भरलें होतें. तेथें एक चमत्कारिक प्रसंग अनपेक्षितपणें घडून आला. त्यावरून सर्वोदयवादी व्यक्तिही किती असहिष्णु असूं शकतात, ह्याची कल्पना जशी आली, त्याचप्रमाणें बिहारचा भाषिकवाद किती कठीण आहे व दिवसेंदिवस तो किती उग्र होत आहे, ह्याचीही कल्पना आली.

चांडिल गांव बिहार-बंगालच्या सीमाप्रदेशावरील मानभूम जिल्ह्यांतील असून, तेथील भाषा कोणती, ह्याबद्दल अनेक वर्षें वाद चालू आहे. त्या जिल्ह्याची भाषा बंगाली आहे, म्हणून तो बंगालला जोडावा, अशी बंगालीभाषिकांची इच्छा आहे, पण तेथील बंगाली लोक उपरे असून, तो खरोखरच बिहारचा भाग आहे, असा बिहारी लोकांचा दावा आहे. त्यामुळें आपल्याकडील बेळगांव शहराप्रमाणें ह्या भागांत नेहमीं तंटेबखेडे चालू असतात. मानभूम जिल्ह्यांतून बिहारच्या कायदे-मंडळांत निवडून गेलेल्या एका सभासदानें बंगालींत भाषण करण्यास सुरुवात केली असतां असेंब्लीच्या स्पीकरनें त्याला हरकत घेतली आणि म्हणून त्या सभासदानें असेंब्लींतून सभात्याग केला.

चांडिल संमेलनाच्या वेळी 'मानभूम लोकसेवक संघ' ह्या संस्थेच्या सभासदांनीं मोठा धुमाकूळ उडवून दिला होता. चांडिल गांव बंगालचें असल्यामुळें तेथील सर्व पाट्या नागरी (हिंदी) लिपींत न लिहितां बंगाली लिपींत लिहिल्या पाहिजेत, असा त्यांचा आग्रह होता, परंतु संमेलनासाठीं अखिल भारतांतून लोक येणार असल्यामुळें त्यांना बंगालीऐवजीं नागरी लिपीच अधिक समजूं शकेल, म्हणून तेथें

नागरी लिपीचा उपयोग करण्यांत आला. त्याबरोबर तेथील 'मानभूम लोकसेवक संघा'च्या लोकांचें पित्त खवळलें. त्यांनीं संमेलनाशीं संपूर्ण असहकार्य केलें.

पाक हिंदूंपेक्षांही वाईट स्थिति

लक्षांत ठेवण्याची गोष्ट म्हणजे ह्या संस्थेचे सभासद पक्के राष्ट्रीय वृत्तीचे, एवढेंच नव्हे, तर सर्वोदयवादी व एके काळीं विधायक कार्यांत आघाडीवर असलेले आहेत, परंतु भाषेचा प्रश्न उपस्थित होतांच त्यांचा सारासार विवेक नष्ट झाला आणि त्यांचे पुढारी प्रसिद्ध विधायक कार्यकर्ते श्री. अतुल घोष ह्यांचे चिरंजीव श्री. अरुणचंद्र घोष भर संमेलनांत म्हणाले, "ह्या बिहारी लोकांच्या तडाख्यांत आम्ही इतके कांहीं अडकलों आहोंत, कीं जणू दुसऱ्या पाकिस्तानांत आहोंत असें आम्हांला वाटतें. किंबहुना पाकिस्तानांतील हिंदूपेक्षांही आमची स्थिति वाईट आहे. कारण आमच्यावरील अन्यायाकडे कोणाचें लक्षही जात नाहीं. आमची सर्व बाजूंनीं गळचेपी चालली आहे आणि आमची भाषा कशी नामशेष करतां येईल, ह्याचाच विचार हे बिहारी लोक करीत आहेत." त्यांच्या ह्या सरबत्तीनें खवळून जाऊन संमेलनांत बसलेल्या हिंदीवाल्यांनीं आरडाओरडा करण्यास सुरुवात केली, आणि सर्वोदयवाद्यांच्या सभेला निवडणुकीच्या वेळच्या दंगली सभेचें स्वरूप प्राप्त झालें.

सरहद्दीवर दररोज प्रचार सभा

गतवर्षींच्या त्या घटनेचें चित्र डोळ्यांसमोर ठेवूनच मी ह्या प्रश्नाविषयीं यंदा माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. खानेसुमारीच्या आंकड्यांच्या आधारें कांहीं निर्णय घेतां येईल कीं काय, ह्याचा विचार चालू असतां असें आढळून आलें, कीं ह्या बाबतींत खानेसुमारी करणाऱ्यांनीं जितका तटस्थपणा राखायला हवा, तितका न राखल्यामुळें त्यावरून कांहीं अनुमान काढणें धोक्याचें ठरेल. बंगाली लोकांचे म्हणणें असें, कीं हा भाग आमचाच असल्यामुळें येथें खानेसुमारीचा प्रश्न काढण्याचें कारण नाहीं. बिहारी लोकांचें म्हणणें असें, कीं एके काळीं हा भाग

बंगालला जोडलेला असल्यामुळें व सबंध बिहारभर बंगाली बाबूंची सत्ता चालू राहिल्यामुळें मानभूम जिल्ह्यांत कृत्रिमपणें बंगाली भाषेचा प्रचार करण्यांत आला आहे. तेथील जनतेची इच्छा हिंदी शिकण्याचीच आहे, परंतु त्यांच्यावर जबरदस्तीनें बंगाली शाळा लादण्यांत आल्या आहेत. त्या आतां बंद करण्याचा सपाटा बिहार सरकारनें सुरू केल्यामुळें बंगाल्यांनीं ओरड करण्यास सुरुवात केली आहे. वस्तुतः ह्या भागांत आदिवासी संथाळांची संख्या जास्त आहे आणि त्यांची भाषा हिंदीही नाहीं अथवा बंगालीही नाहीं, परंतु त्यांना कोण विचारतो ? मानभूम जिल्ह्यांत खनिज संपत्ति भरपूर आहे. (टाटानगर ह्याच जिल्ह्यांत आहे.) लोखंड व दगडी कोळसा ह्यांचें हें आगर आहे. ह्यामुळें हा भाग आपल्या ताब्यांत असावा असें बिहारी व बंगाली लोकांना वाटतें. त्यांतूनच ही भाषिक चळवळ निर्माण झाली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. दोन स्वतंत्र राष्ट्रांनीं सरहद्दीसाठीं झगडावें इतक्या प्रखर स्वरूपाचे झगडे ह्या दोन प्रदेशांत चालू आहेत. सरहद्दीवरील भागांत रोज ठिकठिकाणीं सभा होतात आणि अमूक भाग बंगालला अथवा बिहारला जोडावा, ह्या अर्थाचे ठराव जळजळीत शब्दांत पास करण्यांत येतात.

हिंदी माध्यमाबाबत चळवळ

मानभूम जिल्ह्यांतील हायस्कुलांतून शिक्षणाचें माध्यम हिंदी ठेवण्याचा आदेश बिहार सरकारनें दिला आहे व तेथें हळू हळू हिंदीचें प्रस्थ वाढविण्याची खटपट चालू आहे. त्याच्या निषेधार्थ तेथें सध्या एक मोठें आंदोलन चालू असून एके काळीं जिल्हा कॉंग्रेसचे अनुक्रमें अध्यक्ष व मंत्री असलेले श्री. अतुल घोष व श्री. विभूति दासगुप्ता आणि श्रीमती लावण्य प्रभादेवी व लोकसभेचे सदस्य श्री. भजहरि माहातो ह्यांना त्या चळवळीपायीं शिक्षा झाल्या आहेत. माहातो ह्यांना तर हातकड्या घालून व कंबरेला दोरखंडें बांधुन कोर्टांत नेण्यांत आलें होतें. बिहार सरकारच्या ह्या अमानुष वर्तणुकीबद्दल बंगाल प्रादेशिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. अतुल घोष ह्यांनीं कॉंग्रेस वर्किंग कमिटीपुढें निषेध व्यक्त केला, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

हिंदी साम्राज्याशीं मुकाबला करा

ह्या सर्व परिस्थितीला उद्देशून 'प्रवासी' ह्या सुप्रसिद्ध बंगाली मासिकानें आपल्या एप्रिल, १९५४ च्या अंकांत कांहीं संपादकीय टिप्पण्या लिहिल्या आहेत. सदर 'प्रवासी' मासिक 'मॉडर्न रिव्हयू'चें बंगाली भावंड असून कै. रामानंद चट्टोपाध्याय ह्यांनींच तें सुरू केलेलें होतें व त्यांचे चिरंजीव सध्या त्याचे संपादक आहेत. सबंध बंगालमध्यें ह्या मासिकाला फार मान व महत्त्व देण्यांत येतें. त्या दृष्टीनें हीं संपादकीय स्फुटें महत्त्वाचीं आहेत. त्यांपैकीं एका स्फुटांत संपादक श्री केदारनाथ चट्टोपाध्याय लिहितात :

"बंगाली भाषा भारतांतील इतर सर्व भाषांपेक्षां साहित्य व लालित्य ह्या बाबतींत अधिक समृद्ध आहे. आज बंगालीला वाईट दिवस आले आहेत. ह्यामुळें इतर क्षेत्रांप्रमाणें बंगाली भाषाही दारिद्र्य आणि अवहेलना ह्यांच्या तडाख्यांत सापडली आहे. आपण वेळींच सावध झालों नाहीं तर आपला हा महामौल्यवान् ठेवाही आपण गमावून बसूं. मानभूम जिल्ह्यांत बंगाली लोकांवर जे अत्याचार चालू आहेत त्यांनीं जर आमचीं मनें विचलित होत नसतील तर बंगाली लोक 'माणसें' ह्या संज्ञेस पात्र होण्यास लायक नाहींत असेंच म्हणावें लागेल.

मानभूम जिल्ह्यांत बंगाली भाषा आणि बंगाली संस्कृति ह्यांच्या रक्षणासाठीं जे लोक सत्याग्रह करीत आहेत, त्यांच्याबद्दल प्रत्येक बंगाली व्यक्तीच्या मनांत श्रद्धा आहे. आमच्यामध्यें कांहीं स्वाभिमान असेल, रक्ताची ओढ असेल आणि बंगाली जातीच्या (राष्ट्राच्या) भवितव्याविषयीं थोडीही जाणीव असेल तर ह्याच क्षणीं हिंदी साम्राज्याचा मुकाबला करण्यासाठीं आपण कंबरा कसून सक्रीय पुढें झालें पाहिजे."

आदिवासी लोकांत बंगाल्यांचें कार्य

मानभूम जिल्ह्यांत बंगाली भाषेची व भाषिकांची भयंकर गळचेपी चालली आहे. ह्या बाबतींत सर्व बंगाली लोकांचें एकमत आहे. त्यासाठीं बंगालमधील काँग्रेस संघटना आणि काँग्रेस सरकार वेगवेगळ्या मार्गांनीं धडपड करीत आहेत. बिहारी

लोक मात्र बंगाल्यांचे हे नसते उपद्रव आहेत, असें म्हणून त्यांच्या चळवळी दडपून टाकीत आहेत. तेथील आदिवासी संथाळ लोकांमध्यें बंगाली लोकच मुख्यतः कार्य करीत आहेत. ह्यामुळें पुढेंमागें आदिवासींचा पाठिंबा बंगाली लोकांनाच मिळण्याची शक्यता आहे. शिवाय बंगाली लोक अत्यंत चिकाटीचे व जिद्दी असल्यामुळें बिहारला सहजासहजीं मानभूम पचूं देणार नाहींत असें दिसतें.

बंगाली जिल्ह्यावर बिहारचा हक्क

बंगाली लोकांनीं मानभूम जिल्ह्यावर हल्ला चढवितांच बिहारी लोकांनीं दुसऱ्या बाजूनें बंगालवरच प्रतिहल्ला चढविण्यास सुरुवात केली आहे. दार्जिलिंग व जलपैगुरी जिल्हे हिंदी भाषी असून ते अन्यायानें बंगालमध्यें सामील करण्यांत आले आहेत अशी त्यांची तक्रार आहे. ह्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं बिहारी लोकांना आवाहन करण्यांत येत आहे. विशेषतः प्रादेशिक फेररचनेचा विचार करण्यासाठीं कमिशनची नेमणूक झाल्यापासून ह्या प्रचाराला जोर चढला आहे. सरहद्दीवरील गांवांतून जाहीर सभा भरविण्यांत येऊन हा भाग पुन्हा बिहारला जोडावा अशी मागणी करण्यांत येत आहे. ह्या सभांचीं वर्णनें देणारीं लांबलचक बातमीपत्रें सध्या बिहारी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत आहेत. तसेंच ओरिसामध्येंही बिहारचा कांहीं भाग गेला आहे, तो परत मिळावा ह्यासाठीं धडपड सुरू आहे. अशा प्रकारें बंगाल, बिहार व ओरिसा ह्या तीनही प्रांतांच्या सरहद्दीवर भाषिक कटकटी फार मोठ्या प्रमाणांत सुरू झाल्या आहेत.

॥ ॥ ॥

भारताच्या भावनात्मक ऐक्याला
हातभार लावावा हा हे
भ्रमण-लेख लिहिण्यामागील एक हेतु.
आपण सारा भारत
एक असल्याचें बोलतों खरें,
परंतु ह्या भारतांतील विभिन्न प्रदेश
व तेथील रहिवासी ह्यांच्याविषयीं
आपल्याला किती थोडी माहिती असते ?
ही माहिती नसेल, तर आपण
आपल्या देशबांधवांवर प्रेम तरी कसें करणार ?
अशी माहिती आपल्या वाचकांना
मिळवून द्यावी, ह्या हेतूनें मीं देशभर
हिंडतांना जें निरीक्षण केलें,
त्याचें चित्र ह्या भ्रमण-लेखांतून दिसेल.

'भ्रमणा' च्या वाचनानें भारताची
व भारतीय लोकसमूहांची
थोडीबहुत ओळख व्हावी आणि
भारतांतील महत्त्वाचीं स्थळें व
लोकांच्या रीतीभाती ह्यांसंबंधींची
ही माहिती हातोहात मिळावी
हा ह्या 'भ्रमणा' चा प्रमुख हेतु.